**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**खेड (ग्रामीण) (जि.रत्नागिरी) येथील लोटे परिसरातील औद्योगिक कारखान्यांनी रसायनमिश्रित पाणी लोटे परिसरात सोडण्याबाबत**

**सभापती** : आता दिनांक 18 मार्च 2008 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 37418 घेण्यात येईल.

**(१) * ३७४१८ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , डॉ. वसंत पवार :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (ग्रामीण) (जि.रत्नागिरी) येथील लोटे परिसरातील औद्योगिक कारखान्यांनी रसायनमिश्रित पाणी लोटे परिसरात सोडल्यामुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असले व त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होत असल्याचे, जानेवारी, २००८ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, तसेच पोलीस ठाण्यात तक्रार केली असल्याचेही उघडकीस आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. माहे डिसेंबर, २००७ मध्ये स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने मंडळाच्या अधिकाऱ्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३७४१८...

केलेल्या पहाणीमध्ये दोषी आढळून आलेल्या उद्योगांपैकी २ उद्योगांना दि. २२/१२/२००७ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच इतर ८ उद्योगांना उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर यापैकी ७ उद्योगांच्या सुनावणीमध्ये प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुधारण्याबाबत आढावा घेवून व बँक हमी घेवून उत्पादन पुन्हा सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उर्वरित एका उद्योगाकडून कोणताही ठोस प्रस्ताव प्राप्त न झाल्याने बंदचे आदेश कायम आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, खेड (ग्रामीण) (जि. रत्नागिरी) येथील लोटे परिसरातील औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नोटीस बजाविलेले आठ उद्योग कोणते? त्यापैकी आजतागायत बंद केलेल्या प्रक्रिया उद्योगांची नावे काय आहेत? वारंवार होणाऱ्या प्रदूषणावर निर्बंध घालण्यासाठी सी.ई.टी.पी. प्लँट अद्ययावत करण्याचा निर्णय शासन त्वरीत घेणार आहे काय?आणि या प्रदूषणामुळे नुकसान झालेल्यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. 1) मे. घरडा केमिकल्स 2) मे. आय.ए.अँड आय.सी. 3) मे. ए.बी. माऊरी 4) मे. सुप्रिया केमिकल्स 5) मे. इंडियन ऑक्झोनेट 6) मे. दिपक केमटेक्स 7) मे.श्रेया डायकेम 8) मे. कोस्टल फाईन केमिकल्स 9) मे. सुलाखी केमिकल्स 10) मे. रॅलीज इंडिया लि. अशा 10 कंपन्यांना प्रदूषण मंडळामार्फत त्यांनी केलेल्या चुकांबाबत वेळोवेळी नोटीसा दिल्या, आणि काही कारखाने बंद केले, काही कारखान्यांची बँक गॅरंटी जप्त करण्यात आली. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सी.ई.टी.पी. प्लँट ही कंपनी असून त्या कंपनीमार्फत एम.आय.डी.सी. च्या परिसरातील सर्व दूषित पाण्यावर एकत्रितपणे प्रक्रिया करुन व ते शुध्द करुन ते बी.ओ.डी/डि.ओ.डी. लेव्हलमध्ये आणल्यानंतर ते पाणी खाडीत किंवा नदीमध्ये सोडण्याचा प्रस्ताव आहे. लोटे औद्योगिक परिसराला मी स्वत: भेट दिली होती, त्यावेळी त्याठिकाणी सी.ई.टी.पी. प्लँटच्या लोकांना बोलाविण्यात आले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर सौ. रणदिवे)

01-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B-1

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:05

त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, यापुढे जर खाडीतील मासळी मृत झाली आणि त्या कालखंडामध्ये मत्स्य व्यवसाय करणाऱ्या घटकांना मासळी उपलब्ध झाली नाही तर अशा वेळी नोंदीत असलेल्या मच्छिमारांना किमान वेतनाच्या अनुषंगाने या कालखंडातील वेतन द्यावे लागेल. अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे आणि याची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, या परिसरामध्ये झालेल्या प्रदूषणामुळे ज्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांना नुकसान भरपाई देणार आहात काय ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्रासंदर्भात त्यांनी असे कळविलेले आहे की, आम्ही त्यांना नुकसान भरपाई देणार आहोत. म्हणून मी हा प्रश्न विचारलेला आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, एखाद्या परिसरामध्ये अशा प्रकारे प्रदूषणामुळे मासळी मेली असेल तर संबंधित घटकांना नुकसान भरपाई देण्याची आजपर्यंतची परंपरा नाही. परंतु भविष्य काळामध्ये एखाद्या परिसरात असलेल्या औद्योगिक कारखान्यांनी तेथील नदीमध्ये किंवा खाडीमध्ये रसायनमिश्रित पाणी सोडल्यामुळे त्यातील मासळी मेली तर तेथील मच्छिमारांना त्या कालखंडामध्ये मासळी उपलब्ध होणार नाही. अशा वेळी त्या परिसरातील नोंदीत असलेल्या मच्छिमारांना त्या कालखंडासाठी किमान वेतनाच्या अनुषंगाने नुकसान भरपाई द्यावी असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या प्रस्तावाला अंतिम स्वरुप प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व सी.ई.टी.पी. अंतर्गत येणारे जे कारखाने आहेत, रासायनिक प्रक्रिया करणारे जे कारखाने आहेत, त्या सर्वांना ही बाब लागू होणार आहे.

-----

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**नागपूर विणकर सहकारी सुत गिरणीमधील कामगारांना न्याय मिळणेबाबत**

**(11) * 38002 श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक 14 व्या यादीतील अतारांकित प्रश्न क्रमांक 30021 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर विणकर सहकारी सुत गिरणी, नागपूर या गिरणीमधील कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्त देयक व अन्य देयके अद्यापपावेतो देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर सुतगिरणीच्या पूर्नजीवनाबाबत प्रधान सचिव-सहकार, प्रधान सचिव-वित्त, संचालक-वस्त्रोद्योग, जिल्हाधिकारी-नागपूर यांच्या संयुक्त समितीने आपला अहवाल शासनाकडे कधी सादर केला आहे,

(3) असल्यास, सदर सुतगिरणी आधुनिकीकरणाच्या योजनेत शासनाने समाविष्ट न केल्याने गिरणीतील विणकरांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने विचार केला आहे काय,

(4) अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.सतीश चतुर्वेदी** : (1) औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित कामगारांना 50 महिन्यांच्या पगाराच्या रकमेच्या 50% रक्कम तसेच, भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा व्यवस्थापनाच्या अंशदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(2) सदर गिरणीच्या पुनर्रुज्जीवनाबाबत नेमलेल्या समितीने आपला अहवाल मे, 2007 मध्ये शासनास सादर केला आहे.

(3) सहकार अधिनियमामध्ये सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद नाही.

(4) सदरहू प्रकरण सध्या उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयानंतरच आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही सूत गिरणी पुन्हा सुरु होण्याची, पुनरुज्जिवीत होण्याची शक्यता नाही. या सूत गिरणीची जमीन विकली गेलेली आहे. अशा वेळी तेथील कामगारांची कायदेशीररित्या जी देणी द्यावयाची आहेत, त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उदार अंत:करणाने आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट केली तर कामगारांना त्यांची देणी मिळू शकतात. तर त्या बाबतीत माननीय मंत्री महोदय पुढाकार घेतील काय ? या कामगारांना त्यांचे कायदेशीर ड्यूज द्यावेत अशी मागणी करण्यात येत आहे. हे ड्युज देताना 50 टक्के रक्कम दिली आहे, त्यातील काही रक्कम युनियनला मिळते. नागपूरला जी युनियन आहे तेथे श्री.हरीभाऊ नाईक अध्यक्ष आहेत आणि इंटकचा अध्यक्ष म्हणून कामगारांनी मला अध्यक्ष केलेले आहे.पण मला या रकमेतील अडीच टक्के रक्कम क्लेम करावयाची नाही, त्या जागेवर क्लेम करावयाचा नाही. परंतु तेथील 23

. . . .बी-3



ता.प्र.क्र.38002 . . . .

श्री.नितीन गडकरी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामगारांपैकी 22 कामगारांनी मला अध्यक्ष केलेले आहे. या रकमेतील एकही पैसा इतर कोणाला मिळता कामा नये. तर कामगारांना डायरेक्ट चेकने पेमेंट व्हावयास पाहिजे. तेव्हा वैधानिकरित्या पेमेंटच्या बाबतीत ऑऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करावयास पाहिजे. कोणाला ही मध्यस्थ न करता कामगारांना डायरेक्ट चेकने पेमेंट करावे. एम्प्रेस मिलच्या बाबतीत सुध्दा अशाच प्रकारे कामगारांना पैसे देण्यात आलेले आहेत. मॉडेल मिलच्या वेळी मी स्वत:त्याठिकाणी उपस्थित होतो. तर या मिलच्या बाबतीत सुध्दा अशाच प्रकारचा निर्णय घेणार आहात काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मागच्या वेळी आपल्याच दालनामध्ये बैठक झाली होती. त्यामुळे आपल्यालाही याची माहिती आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी एक प्रश्न उपस्थित केला होता. शासनातर्फे हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केलेला आहे. परंतु लिक्वीडेशन नंतरचा जो पिरिएड आहे, तसे पाहिले तर कोर्टाचा निर्णय मानला तर त्याचे दुरगामी परिणाम होणार आहेत. पण सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करण्याबाबत केलेली सूचना मान्य आहे. कारण हाय कोर्टामध्ये निर्णय होण्यास वेळ लागणार आहे. तसेच तेथील काही कामगार रिटायर झालेले आहेत, काही कामगारांचा मृत्यू झालेला आहे. त्यामुळे यासंदर्भात 500-550 कामगारांनी निवेदन दिलेले आहे की, आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करण्यासाठी कामगार तयार आहेत आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब हे युनियनचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे मानवतावादी दृष्टीकोनातून त्यांच्याबरोबर एकत्र बसून, सर्व कामगारांना विश्वासात घेऊन त्यांचे जे लिगल ड्युज आहेत, त्याची व्हॅल्यू 45 कोटीची आहे आणि या जागेची विक्री 81 कोटी रुपयांची झालेली आहे. त्यामुळे पैसे देण्याच्या बाबतीत हरकत नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चतुर्वेदी....... **ता.प्र.क्र : 38002** ........

तेथील कर्मचाऱ्यांचे जे काही डयूज असतील ते देण्यासंबंधी एकत्र बसून निर्णय घेण्याची शासनाची तयारी आहे. युनियनच्या मागणीप्रमाणे 3 टक्के रक्कम देण्याचा निर्णय एम्प्रेस मिल संदर्भात घेण्यात आला होता. साधारणपणे 60 कोटी रुपयांचे वाटप त्यावेळी करण्यात आले होते. त्यावेळी कामगारांना शासनाने डायरेक्ट चेकने पैसे दिलेले होते. आता ती मिल बंद झालेली आहे. तेथील गरीब अशा कर्मचाऱ्यांना डायरेक्ट पैसे देण्याची आपण जी सूचना केलेली आहे ती सूचना मान्य करण्यात येईल. या संबंधी आऊटसाईड कोर्ट सेटलमेंट करुन कामगारांना डायरेक्ट पैसे देण्यास शासनाची तयारी आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर या संबंधी कार्यवाही करण्यात येईल असे मी आपणास सांगू इच्छितो.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, नागपुर में जो युनियन हैं, उनमें विवाद है. वहां इंटक और राष्ट्रीय मिल मजदूर संघ है और श्री हरिभाऊ नाईक और सम्माननीय सदस्य श्री गडकरी उनके नेता है. लेकिन यह युनियन मान्यता प्राप्त है. चूंकि कोर्ट में मामला चल रहा है लेकिन कोर्ट के बाहर अगर सेटलमेंट करना चाहते हैं तो मैं यह जानना चाहता हूं कि जो मान्यता प्राप्त युनियन है क्या उनके पदाधिकारियों को चर्चा करते समय शामिल किया जाएगा ?

श्री सतीश चतुर्वेदी :सभापति महोदय, जैसा मैंने कहा कि डायरेक्ट कामगारों के साथ बातचीत की जाएगी. आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट किया जाएगा. जो लोग बातचीत में शामिल होना चाहते हैं उनको शामिल किया जाएगा. जहां तक मान्यता प्राप्त युनियन को बुलाने की बात है तो उनको बुलाने से कहीं तीन प्रतिशत पैसा देने की अड़चन पैदा न हो जाए. चूंकि कामगारों को उनकी रकम देने की बात है इसलिए जो लोग कामगारों को उनकी रकम देने के पक्ष में है, उन सब को चर्चा में शामिल किया जाएगा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी कामगारांच्या हिताचा व अतिशय योग्य असा निर्णय घेतलेला आहे त्या बद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन व्यक्त करतो. या मिलमध्ये साधरणपणे 853 कामगार आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या या निर्णयामुळे त्यांच्या सर्व आर्थिक अडचणी दूर होण्याची शक्यता आहे. या कामगारांना आता 50





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......... **ता.प्र.क्र** : **38002** ........

कोटी रुपये मिळणार आहेत. मी देखील 750 कामगारांच्या एका युनियनचा अध्यक्ष आहे. आम्हाला देखील या निर्णयामुळे दोन कोटी रुपये मिळणार आहेत. हे सर्व पैसे कामगारांनाच मिळाले पाहिजेत. मला ते पैसे नको आहेत. कामगारांना चेकने पैसे देण्याचा शासनाचा निर्णय अतिशय चांगला आहे. मिलमधील गरीब कामगारांना त्यांचा एक - एक पैसा मिळाला पाहिजे. शासनाने घेतलेला हा निर्णय निश्चितच अभिनंदनास पात्र आहे. त्यामुळे, या निर्णया बद्दल पुन्हा एकदा मी माननीय मंत्री महोदयांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करु इच्छितो. मला या संबंधी आणखी काही प्रश्न विचारावयाचा नाही.

..................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

........3.....

**चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील बोरगांव**
**मोहना येथील बोर्डीनाला प्रकल्पाबाबत**

**(१) * ३८०११ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील बोरगाव-मोहना येथील प्रस्तावित बोर्डी नाला प्रकल्पामध्ये त्या भागातील सुपिक फळबागयुक्त जमीन संपादीत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या विरोधात बोर्डी नाला प्रकल्प संघर्ष कृती समितीच्या वतीने दिनांक १७ डिसेंबर, २००७ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती व मा.मंत्री महोदयांकडे आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**डॉ. सुनील देशमुख,श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) बोर्डीनाला प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनी संपादीत करण्यात येत आहे. त्यातील काही क्षेत्रात फळबाग आहेत.
(२) होय.
(३) प्रकल्पांअंतर्गत येणाऱ्या जमीनी सरळ खरेदीने संपादीत करण्यात येत आहे. संबंधित कास्तकार स्वखुशीने जमीनी देत असून कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.
(४) या प्रकरणी कुठलाही विलंब झालेला नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील बोरगाव मोहना येथे बोर्डीनाला प्रकल्प सुरु करण्यात येत आहे. त्या करिता तेथील सुपिक जमीन संपादित करण्यात येत आहे. ज्या दराने या जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत त्या बद्दल तेथील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. प्रकल्प पूर्ण करावयाचा असेल तर तेथील जमिनी संपादित करीत असताना शेतकऱ्यांना योग्य भाव देणे देखील आवश्यक आहे. खरे म्हणजे या भागात सर्वच ठिकाणी प्रकल्प होत आहेत. त्यामुळे तेथे शेती करीता जमीनच शिल्लक नाही. मला याठिकाणी असे विचारावयाचे आहे की, या प्रकल्पाची खरोखरीच आवश्यकता आहे काय ? प्रकल्प करावयाचा असा शासनाचा हट्टच असेल तर निदान तेथील जमीन संपादित करीत असताना, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य भाव तरी दिला गेला पाहिजे. मिहान प्रकल्पाच्या वेळी तेथील शेतकऱ्यांचे पुनर्वसन कशा

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारे झाले ? मी आपणास सांगू इच्छितो की, माननीय पुनर्वसनमंत्री हे पुनर्वसनाच्या फाईलींवर आठ-आठ महिने सहीच करीत नाहीत. या प्रकल्पासंदर्भात योग्य प्रकारे निर्णय घेऊन तेथील शेतकऱ्यांच्या जमिनींना योग्य भाव मिळवून दिला जाणार आहे काय व या प्रकल्पाच खरोखरीच आवश्यकता आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील चांदूरबाजार तालुक्यातील मोहना बोर्डीनाला प्रकल्प हा अत्यंत महत्वाचा व आवश्यक असा प्रकल्प आहे. या प्रकल्पाकरिता 627 हेक्टर जमीन ही बुडीत क्षेत्रातील संपादित केली आहे, 25 हेक्टर सरकारी जमीन संपादित केली आहे व 12 हेक्टर वन जमीन संपादित केलेली आहे. तसेच या प्रकल्पाकरिता 588 हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यात आली आहे. एकूण 588 खाजगी जमिनीपैकी 300 एकर जमीन सरळ पध्दतीने संपादित करण्याकरिता तेथील शेतकऱ्यांनी मान्यता दिलेली आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, तेथील 140 एकर जमीन सरळ पध्दतीने खरेदी देखील केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी जी कोरडवाहू जमीन आहे ती एक ते सव्वा लाख रुपये प्रती एकर भावाने खरेदी केलेली आहे तसेच बागायती जमिनीला चार ते सव्वाचार लाख रुपये प्रती एकर एवढा चांगला भाव दिलेला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : त्या ठिकाणी संघर्ष समितीने निवेदन दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जे सांगितले ते खरे आहे की, ज्यावेळी लोकांना भाव कमी दिला जातो त्यावेळी या एका गोष्टीमुळे लोकांच्या मनामध्ये तीव्र असंतोष निर्माण होतो. आमचा जिल्हा दुर्दैवाने सर्वात मागे असलेला जिल्हा आहे. पण माननीय मंत्रिमहोदयांनी आणि माननीय राज्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी सरळ पध्दतीने खरेदी सुरु केली. मी स्वत: त्या ठिकाणी सभेला उपस्थित होतो. त्या ठिकाणी सभेमध्ये चार पाच हजार लोक उपस्थित होते. माननीय राज्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. लोकांचे एवढेच म्हणणे आहे की, आमच्यावर कर्ज आहे आणि आमच्या जमिनीला नीट भाव दिला जात नाही. ज्यावेळी त्यांना भाव देण्याची गोष्ट सांगितली आणि शासनाचे परिपत्रक वाचून दाखविले त्यावेळी लोक म्हणाले की, आम्हाला ही गोष्ट कोणी सांगितली नाही. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, शेकडो लोकांनी स्वेच्छेने सरळ खरेदीचे प्रस्ताव शासनाकडे दिलेले आहेत. शासनाला आतापर्यंत केवळ 40 ते 50 हेक्टर जमिनीचीच खरेदी करता आली आहे. ही जमीन अतिशय सुपीक असून फळबागांसाठी चांगली आहे. या वर्षापासून चार ते साडेचार हजार हेक्टर क्षेत्रामध्ये सिंचन होईल आणि त्या ठिकाणी फळबागा लागतील. अशा या प्रकल्पामध्ये माझ्या माहिती प्रमाणे बुडीत क्षेत्रात फक्त 100 ते 120 हेक्टर पर्यंत फळबागांची जमीन जाते ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे 627 हेक्टर बुडीत क्षेत्रापैकी फळबागांचे बुडीत क्षेत्र 54 हेक्टर आहे. लाभक्षेत्रामध्ये फळबागांचे क्षेत्र 817 हेक्टर असून 4126 हेक्टर जमिनीला पाणी मिळाल्यानंतर हे क्षेत्र वाढेल. शेतकऱ्यांच्या मनामध्ये याबद्दल रोष असता तर शेतकऱ्यांनी सरळ खरेदी पध्दतीने जमीन दिली नसती. शेतकरी स्वत: पुढे आले. शासन जमीन खरेदी करीत असताना शेतकऱ्यांच्या मोठ्या रांगा लागलेल्या आहेत. 500 हेक्टरपैकी जवळजवळ 300 हेक्टर जमिनीची खरेदी सरळ पध्दतीने झालेली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38011 .....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भातील प्रकल्पांसाठी ज्या जमिनी संपादित केल्या जातात त्या जमिनी संपादित करुन दहा दहा वर्षे झाली तरीशेतकऱ्यांच्या 7/12 वरुन त्या जमिनी कमी केल्या जात नाहीत. 7/12 वरुन त्या जमिनी कमी न केल्यामुळे शासन 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांना जो कर्जमाफीचा लाभ देते तो लाभ त्यांना मिळत नाही. बुलढाणा जिल्ह्यामध्ये व्याघ्रानाला प्रकल्पासाठी 1991 मध्ये जमिनी संपादित करण्यात आल्या परंतु अजूनही त्यांच्या 7/12 वरुन त्या जमिनी कमी केलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. ज्यावेळी शासन त्या जमिनी संपादित करते त्यावेळी त्या जमिनी 7/12 वरुन कमी करावयास पाहिजे. ज्या ज्या प्रकल्पाच्या ठिकाणी जमिनी घेतल्या असतील त्या 7/12 वरुन वगळण्यात येतील काय आणि तशा प्रकारचे आदेश शासन देणार काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, तात्काळ असे आदेश देण्यात येतील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो प्रश्न विचारला तोच प्रश्न मी पुन्हा विचारतो. त्या ठिकाणी सध्या असलेले बाजार भाव काय आहेत आणि शासन शेतकऱ्यांना कोणत्या भावाने जमिनीचे पैसे देत आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, बाजारभावापेक्षा कमी भावाने जमीन विकत घेतली असती तर शेतकऱ्यांनी स्वेच्छेने जमिनी दिल्या नसत्या. ज्याअर्थी शेतकरी स्वेच्छेने जमिनी देत आहेत त्या अर्थी बाजार भावापेक्षा कमी भाव नाही.

श्री. नितीन गडकरी : तेथील जमिनीचा बाजारभाव काय आहे ?

डॉ. सुनील देशमुख : शासन त्या ठिकाणी एक ते सव्वालाख रुपये प्रती एकर एवढा भाव जमिनीला देत आहे.

श्री. नितीन गडकरी : तेथे जमिनीचा बाजारभाव काय आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, जी जमीन रस्त्याला लागून आहे त्या ठिकाणी वेगळा भाव असतो. यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी असतात. संपूर्ण एरियासाठी एकच रेडीरेकनर नसतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38011...... डॉ.सुनील देशमुख.....

रेडिरेक्नर प्रत्येक विभागाचा वेगवेगळा असतो. रस्त्याला लागून असलेल्या जमिनीची किंमत जास्त असते. रस्त्याच्या आत असलेल्या जमिनीची किंमत कमी असते. त्यामुळे सर्व ठिकाणी एकच रेडिरेक्नर लागू नसतो. पण त्या जमिनीची किंमत कमी मिळत आहे असे तेथील शेतकऱ्यांना वाटले असते तर त्यांनी आपली जमीन दिली नसती.

श्री.नितीन गडकरी : मंत्रिमहोदयांनी माझी एकच विनंती आहे. आपण आता म्हटले की, तेथील शेतकरी आपली जमीन देण्यासाठी धावून येत आहेत. हे मी नव्यानेच ऐकले आहे. त्या जमिनीवर संत्र्याच्या बागा आहेत. या प्रकल्पामुळे 55 एकर जमीन बाधित होणार आहे. संत्र्याच्या उत्पन्नाची आपल्याला देखील माहिती आहे. ते लोक त्या जमिनीतून संत्र्याच्या पिकापासून वर्षाकाठी लाखो रुपयांचे उत्पन्न घेतात. ठीक आहे, त्या जागेवर प्रकल्प होत असल्यामुळे शासनाने त्या लोकांना बोलवावे. त्या लोकांची कृति समिती आहे. त्या समितीचे 100 लोक मला भेटले आहेत. त्या लोकांना समजावून सांगावे. त्यांच्याबरोबर जमिनीच्या किंमतीबाबत चर्चा करुन आपल्याला असलेले स्वेच्छाधिकार वापरुन त्यांना थोडेसे अधिक पैसे द्यावेत. या लोकांच्या शेतीवर कर्ज आहे. त्या शेतक-यांची अवस्था वाईट आहे. म्हणून त्यांना चर्चेसाठी बोलवून सहानुभूतिचा मार्ग काढावा. स्वेच्छाधिकाराचा वापर करुन त्यांना थोडेसे अधिक पैसे मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे काय ?

श्री.अजित पवार : होय.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्या लोकांनी निवेदनामध्ये काही मागण्या केलेल्या आहेत. त्यामुळे मला एकाचवेळी 2-3 प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. हा अनुशेषग्रस्त भागातील हा प्रश्न आहे. हा प्रश्न लागल्यामुळे त्यांचे निवेदन चर्चेला आलेले आहे. त्यांच्या निवेदनातील म्हणणे अगदी रास्त आहे. आम्ही शेतकरी असल्यामुळे आम्हाला शेती करायची आहे, म्हणून आम्हाला लाभक्षेत्रातील जमीन दिली जाईल काय ? अशी पहिली आग्रही मागणी त्या निवेदनात आहे. शासनाच्या निर्णयामध्ये वेगळी तरतूद आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी म्हटलेले खरे आहे. विदर्भातील एका प्रकल्पासाठी 1965 साली प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकल्पामुळे बाधित क्षेत्रातील लोकांना द्यावयाच्या जमिनीबाबतची मुदत 1991 मध्ये संपली आहे. त्यावेळी आम्हाला कोणी सांगितलेच नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अप्पर वर्धा प्रकल्पाबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी बैठक घेतली आहे, त्याबाबत मी नोटीस न दिल्यामुळे मी आता प्रश्न विचारत नाही. त्या लोकांच्या प्रमुख 2-3 मागण्या आहेत. बुडीत क्षेत्रामध्ये जाणा-या जमिनीच्या बदल्यात लाभक्षेत्रातील जमीन त्यांना मिळवून दिली पाहिजे. लाभक्षेत्रातील जमीन मिळविण्यासंबंधीचा शासन निर्णय आहे. त्या जमिनीचे भाव काय असतात, त्याची पध्दती कशी असते हे त्यांना कळविण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अप्पर वर्धा प्रकल्प्रस्तांच्या बाबतीत झाले तसे याही प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत होण्याची शक्यता आहे. त्याबाबत ही व्यवस्था केली जाईल काय असा माझा प्रश्न आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 1, दिनांक 14.3.2001, या अन्वये बुडित क्षेत्रातील जमिनीच्या बदल्यात लाभक्षेत्रात द्यावयाच्या जमिनीचे क्षेत्र ठरवून दिलेले आहे. जसे बाधित परिमंडळातून संपादित केलेल्या प्रकल्पबाधित व्यक्तीच्या जमिनीचे क्षेत्र समजा 28 आर पेक्षा अधिक नसेल तर त्यांना प्रकल्प बाधित व्यक्तीस मंजूर करावयाच्या परिमंडळातील जे क्षेत्र असते ते 40 आर पेक्षा कमी नसावे आणि 80 आर पेक्षा जास्त नसावे. 80 आर पेक्षा अधिक परंतु 2 हेक्टर पेक्षा अधिक नसलेले त्याचे क्षेत्र असेल त्याला 80 आर पेक्षा कमी नसलेले परंतु 1 हेक्टर 20 आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र देय आहे. तसेच 2 हेक्टरपेक्षा अधिक परंतु 3 हेक्टर 20 आर पेक्षा त्याचे अधिक नसलेले त्याचे क्षेत्र असेल तर 1 हेक्टर 20 आर पेक्षा कमी नसलेले परंतु 1 हेक्टर 60 आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र देय आहे आणि 3 हेक्टर 20 आर पेक्षा अधिक क्षेत्र बुडित क्षेत्रात गेले असेल तर त्याला जास्तीत जास्त 1 हेक्टर 60 आर एवढे क्षेत्र देय आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : मंत्रिमहोदयांनी जी.आर.ची माहिती दिली आहे. ही माहिती त्यांना कळवून त्या विषयाच्या मागण्या नोंदविल्या पाहिजेत. अप्पर वर्धा प्रकल्पाबाबत मंत्रिमहोदयांना बैठक घेऊन प्रकल्पग्रस्तांना आता माहिती द्यावी लागली आहे. शासन निर्णयाप्रमाणे त्यांच्या वाटयाला येणा-या जमिनी लाभ क्षेत्रात देण्यासारख्या जमिनी शिल्लक होत्या. पण 1991 मध्येच त्याची मुदत

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संपली होती. त्याबाबत कोणीच ऐकत नव्हते. शासनाने त्यांचे ऐकल्यामुळे परवा दोन कास्तकारांचे अर्ज आले आहेत. ही माहिती कळवून त्यांच्या मागण्या नोंदविल्या जातील काय ? महाराष्ट्रात शिल्लक असलेल्या अनुशेषापैकी अमरावती विभागात 77 टक्के अनुशेष आहे आणि विदर्भामध्ये शिल्लक असलेल्या अनुशेषापैकी 99.23 टक्के अनुशेष एका अमरावती विभागात आहे. त्यामध्येही सर्वात जास्त अमरावती जिल्हयात आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38011...) (प्रा. बी.टी.देशमुख

सभापती महोदय, हा प्रकल्प 2 किंवा 3 वर्षामध्ये निश्चितपणे पूर्ण होईल असे सांगण्यामध्ये काय अडचण आहे ? अडचण नसेल तर तसे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील काय ? अडचण असेल तर ती कोणती हेही माननीय मंत्री महोदय सांगतील काय ?

डॉ. सुनील देशमुख : नियोजनाप्रमाणे हा प्रकल्प मे 2011 पर्यन्त पूर्ण करावयाचा आहे. परंतु त्याच्याही एक वर्ष आधी म्हणजे 2010पर्यन्त हा प्रकल्प आम्ही पूर्ण करु. बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या जमिनीवर शेतक-यांनी कर्ज घेतलेले आहे व इलेक्ट्रिक बिल थकीत आहे. आता शेतक-यांचे कर्ज माफ झालेले आहे. या जमिनीचा मोबदला देताना त्या जमिनीवरील कर्ज कापून मोबदला दिला जाईल अशी शेतक-यांच्या मनामध्ये शंका होती. ती शंका दूर केलेली आहे. ज्याप्रमाणे इतर शेतक-यांचे कर्ज माफ करण्यात आलेले आहे त्या प्रमाणे या शेतक-यांचेही कर्ज माफ करुन त्यांना जमिनीचा पूर्ण मोबदला दिला जाणार आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठवाड्यातील वसमत तालुक्यासह जिल्ह्यात गाजलेल्या गाय घोटाळ्याबाबत**

**(२) * ४०७६० डॉ. दीपक सावंत** : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील वसमत तालुक्यासह जिल्ह्यात गाजलेल्या गाय घोटाळा प्रकरणातील दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात संबंधित असलेले अधिकारी, पदाधिकारी यांचा तसेच त्यांनी केलेल्या गैरप्रकरणांचा तपशील काय आहे,

(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.अनिस अहमद यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) व (३) सन २००५-०६ मध्ये हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे वाटप करणे या योजनेच्या संदर्भातील अनियमिततेस खालील अधिकारी व पदाधिकारी जबाबदार असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

१) डॉ.ए.बी. बोरकर, जिल्हा पशुसवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली, २) डॉ.व्ही.एन.काटकाडे, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ वसमत, ३) श्री.भानुदास पवार, माजी सभापती, कृषि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय समिती, जिल्हा परिषद हिंगोली, ४) श्री.संभाजी नादरे, सह शिक्षक, जि.प.प्राथमिक शाळा, गिरगाव, ता.वसमत, ५) श्री.भवनाजी सरकुंडे, लिपीक, बहिजी स्मारक विद्यालय, वसमत.

या योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितेमुळे येथील आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी योजनेतील लाभार्थी हे सदर योजनेत गैरव्यवहार झाल्यासंबंधी दिनांक १३.८.२००७ रोजी उपोषणास बसले होते. सदरहू योजना ही जिल्हा परिषदेकडून राबविली जात असल्याने याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल आयुक्त (पशुसंवर्धन) यांना दिनांक २५.१.२००८ रोजी सादर केलेला आहे. याबाबतची मुळ कागदपत्रे अद्याप आयुक्त (पशुसंवर्धन) यांना प्राप्त झाली नसल्यामुळे संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही. मुळ कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर संबंधीत अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार तपासणी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच उर्वरित दोषीपैकी पदाधिकारी व कर्मचारी हे जिल्हा परिषद, हिंगोली यांचेशी निगडीत असल्याकारणाने त्यांचेवर स्वतंत्ररित्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली यांचेमार्फत स्वतंत्ररित्या कारवाई करण्यात येत आहे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 40760.....)

डॉ. दीपक सावंत : प्रश्न भाग (2) व (3) च्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, या योजनेच्या संदर्भातील अनियमिततेस खालील अधिकारी व पदाधिकारी जबाबदार असल्याचा अहवाला प्राप्त झालेला आहे." पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की, "याबाबतची मूळ कागदपत्रे अद्याप आयुक्त (पशुसंवर्धन) यांना प्राप्त झाली नसल्यामुळे संबंधित दोषी अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. मूळ कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार तपासणी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल." सभापती महोदय, या उत्तरामध्ये विसंगती आहे. 25.1.2008 रोजी अहवाल प्राप्त झालेला असताना दोषींवर कारवाई का करण्यात आली नाही ? हे दोषी अधिकारी सेवेमध्ये असताना त्यांची चौकशी करणे योग्य होणार नाही. म्हणून या दोषी अधिकारी आणि कर्मचा-यांना निलंबित करुन त्यांची ताबडतोबीने चौकशी केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी लाभार्थींना दुधाळ जनावरे वाटप करण्यामध्ये गैरप्रकार झालेला आहे. हे गैरप्रकार दोन प्रकारचे आहेत. आदिवासी क्षेत्राबाहेरील लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानावर गायी वाटपन करण्यात येतात. पशुधन विकास अधिकारी, लाभार्थ्यांचे विमा प्रतिनिधी हे बाजारात जाऊन जनावरे खरेदी करीत असतात. झालेल्या गैरप्रकाराबाबत आर.पी.आय.चे कार्यकर्ते उपोषणाला बसले होते. त्यावेळी पालकमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर यांनी या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांना दिले होते व त्याप्रमाणे चौकशी झाली. चौकशीमध्ये छापील उत्तरामध्ये नमूद केलेले अधिकारी दोषी आढळून आले. पशुधन अधिका-यांनी लाभार्थ्यांची भेट घेतली असता लाभार्थ्यांनी अनुदान मिळालेले नसल्याचे सांगितले मात्र लाभार्थ्यांच्या अनुदान मिळाल्याच्या सह्या पावत्यावर आहेत. याप्रकरणी गावातील श्री. भानुदास पवार, माजी सभापती, कृषि पशसंवर्धन व दुग्धव्यवसाय समिती, जिल्हा परिषद हिंगोली, श्री. संभाजी नादरे, सह शिक्षक, जि.प.प्राथमिक शाळा, गिरगाव, ता. वसमत आणि श्री. भवनाजी सरकुंडे, लिपिक, बहिजी स्मारक विद्यालय वसमत यांनी संगनमत करुन लाभार्थ्यांच्या खोट्या सह्या केलेल्या आहेत की लाभार्थ्यांनी केलेल्या सह्या आहेत याचा तपास होण्याचे बाकी राहिलेले आहे. या लोकांना निलंबित नाही तर घरीच पाठवायचे आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्यास थोडा अवधी द्यावा.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 40760...

श्री. सुरेश जेथलिया : अहवालामध्ये अनियमितता झाल्याचे म्हटलेले आहे. अनियमिततेचे स्वरुप काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : अनियमितता अशी आहे की, लाभार्थींच्या घरामध्ये जनावरे नाहीत. याबाबतीत लाभार्थ्यांना विचारले असता त्यांनी "आम्हाला गायी दिलेल्या नाहीत" असे सांगितले. तेव्हा ज्या सह्या केलेल्या आहेत त्या लाभार्थ्यांनी केलेल्या आहेत की खोटया सह्या केलेल्या आहेत याची चौकशी करण्याचे शिल्लक राहिलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40760....

श्री.सुरेश नवले :सभापती महोदय, या प्रकरणाची दोन स्तरावर चौकशी सुरु आहे. एक चौकशी आयुक्त, पशुसंवर्धन यांचे स्तरावरुन सुरु होणार आहे. दुसरी चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी करीत आहेत. या दोन चौकशी प्रकरणांपैकी प्रथम कोणत्या स्तरावरील चौकशी पूर्ण होणार आहे ? मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली यांनी या प्रकरणी चौकशी करुन अहवाल आयुक्त, पशुसंवर्धन यांना सादर केलेला आहे. परंतु या प्रकरणाबाबतची मूळ कागदपत्रे अद्याप आयुक्तांना प्राप्त झाली नसल्यामुळे संबंधित दोषी अधिका-यांविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून माझा या संदर्भात पुन्हा तोच स्पेसिफिक प्रश्न आहे की, या दोन स्तरावरील चौकशी पैकी कोणत्या स्तरावरील चौकशी प्रथम पूर्ण होणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मघाशीच सांगितले की, या प्रकरणासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. याप्रकरणी एका महिन्याच्या आत चौकशी करण्यात येऊन या प्रकरणी जे कोणी अधिकारी दोषी आढळून येतील त्यांचेविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. एवढेच नव्हेतर दोषी अधिका-यांना बडतर्फ देखील करण्यात येईल, अशा प्रकारची माहिती मी मघाशीच सभागृहात दिली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हे प्रकरण प्रचंड चीड आणणारे आहे. शासकीय अधिका-यांकडून अशा प्रकारची फसवणूक करुन गरीब जनतेचा छळवाद करण्यात येत आहे. या ठिकाणी शासनाकडून लेखी स्वरुपात उत्तर दिले गेले आहे त्यात विसंगती दिसून येते. प्रश्न क्रमांक दोन व तीन च्या उत्तराच्या शेवटी असे म्हटले आहे की, या योजनेच्या संदर्भातील अनियमिततेस खालील अधिकारी व पदाधिकारी जबाबदार असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्या उत्तरातील पुढील परिच्छेदात असे म्हटले आहे की, सदरहू योजना ही जिल्हा परिषदेकडून राबविली जात असल्याने याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल आयुक्त, पशुसंवर्धन यांना दिनांक 25 जानेवारी, 2008 रोजी सादर केलेला आहे. यापुढील वाक्य तर फारच भयानक आहे, त्यात असे म्हटले आहे की, याबाबतची मूळ कागदपत्रे अद्याप आयुक्त, पशुसंवर्धन यांना प्राप्त झाली नसल्यामुळे दोषी अधिका-यांविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही. आपण आता ई-गर्व्हनर्सच्या गोष्टी करीत आहोत. असे असताना आयुक्तांना मूळ कागदपत्रे अद्याप प्राप्त होऊ शकली नाहीत. म्हणून सदरहू प्रकरणाची मूळ कागदपत्रे आयुक्त, पशुसंवर्धन यांना किती तासात उपलब्ध करुन देण्यात येतील ? ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 12:30

ता.प्र.क्र. 40760....

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, सन 2005-06 में हिंगोली जिले के वसमत तालुके में शासन की योजना के अन्तर्गत आदिवासियों को गाय वितरीत की गई थी. इसका मकसद यह था कि उसके माध्यम से उन्हें रोजगार मिल सके. लेकिन इस मामले में भ्रष्टाचार हुआ है और वह साबित हुआ है. इस मामले में डीएचओ और श्री भानुदास पवार, भूतपूर्व सभापति, कृषि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय समिती, जिला परिषद हिंगोली ने अनियमितता और भ्रष्टाचार किया है इसलिए इनके खिलाफ कड़ी कार्रवाई की जाएगी. मेरे पास वहां से इस मामले से संबंधित कुछ कागजात आए हैं. जिन लोगों ने गाय खरीदी है, उनमें भूतपूर्व सभापति श्री भानुदास पवार भी है और उनकी भी सही है. इसलिए वे भी दोषी है. पुलिस अधीक्षक और सीईओ को कहा है कि दोषियों के खिलाफ कार्रवाई होनी चाहिए. मैं यह बताना चाहता हूं कि श्री भानुदास पवार शिवसेना के है.

श्री. पांडरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकरणी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी कबूल केली आहे. या ठिकाणी श्री. भानुदास पवार, माजी सभापती यांचे नाव वारंवार घेतले जात आहे. या प्रकरणी भ्रष्टाचार फक्त श्री. भानुदास पवार यांनी एकटयांनी केलेला नाही. या भ्रष्टाचार प्रकरणामध्ये एक मोठे रॅकेट आहे....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 12:35

ता.प्र.क्र.40760 पुढे सुरु.....

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, खालपासून वरपर्यंत हे रॅकेट आहे. एकटया श्री. भानुदास पवारांवर कारवाई करुन चालणार नाही. यामध्ये खालपासून वरपर्यंत जे अधिकारी गुंतलेले आहेत त्यांना तात्काळ निलंबित करुन त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली जाणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, इस मामले में शामिल डीएचओ को सस्पेंड किया जाएगा और भानुदास पवार के खिलाफ पुलिस कार्रवाई की जाएगी. जो एलडीओ और डीएचओ और सभापति इस मामले में शामिल है, उन सब के खिलाफ कार्रवाई की जाएगी. मैं यह स्पष्ट कहना चाहता हूं कि इस मामले में शामिल लोगों के खिलाफ पुलिस कार्रवाई की जाएगी, सस्पेंड किया जाएगा और आपकी मदद लेकर भानुदास पवार को जेल में भेजा जाएगा.

**सभापती** : आदिवासी, गरीब आणि सामान्य शेतकऱ्यांना मदत करण्याची शासनाची भावना आहे आणि त्याअनुषंगाने जो कार्यक्रम राबविला जात आहे त्या कार्यक्रमाला छेद देणारी प्रवृत्ती असेल तर ती कोणीही असली तरी त्यांच्याबाबतीत अत्यंत कठोर कारवाई करणे शासनाचे काम आहे. उच्चस्तरीय पोलीस अधिकाऱ्यांमार्फत याप्रकरणाची चौकशी करावी आणि चौकशी पूर्ण झाल्यानंतर जी वस्तुस्थिती असेल ती सदनाच्या पटलावर ठेवावी.

श्री. अनिस अहमद : सभापती महोदय, 'होय'.

----

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबत**

**(३) * ३७५८८ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर गावासाठी सतत टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचे प्रश्न दूर करण्यासाठी शासनाने पाणी पुरवठयाची योजना प्रस्तावीत केली आहे काय,

(३) संग्रामपूर तालुक्याला लागून असलेल्या वाण प्रकल्पातून संग्रामपूर आणि जळगाव तालुक्यातील टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची योजना करण्याच्या दृष्टीने शासन योग्य ती कार्यवाही करणार आहे काय ?

**श्री. रणजित कांबळे,श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे. जून २००६ पूर्वी संग्रामपूर गावाला सतत वर्षभर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता. दिनांक ३०.६.२००६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

(२) गावामध्ये ६ नवीन कूपनलिका, स्वतंत्र लघु पाणी पुरवठा योजना तसेच तात्पुरती पूरक नळ योजना घेऊन पाणी पुरवठा करण्यात आला आहे. या गावातील कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याचे प्रश्न दूर करण्यासाठी जलस्वराज्य योजनेअंतर्गत दोन उद्‌भव विहिरीची कामे घेण्यात आली असून ती प्रगतीपथावर आहेत. तसेच सद्य:स्थितीत २१ हातपंपही आहेत.

(३) वाण प्रकल्पातून पाणी पुरवठ्याची कोणतीही योजना जिल्हापरिषदेमार्फत संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यामध्ये प्रस्तावित नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे संग्रामपूर या गावाची लोकसंख्या किती आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, गावात 6 नवीन कूपनलिका,स्वतंत्र लघु पाणीपुरवठा योजना त्याशिवाय तात्पुरती पूरक नळयोजना आणि दोन विहिरी या सगळया योजना एकत्र केल्यानंतर या गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, संग्रामपूर ग्रामपंचायतीची लोकसंख्या 8690 आहे. सध्याच्या स्थितीमध्ये गावामध्ये एक रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर असून त्या माध्यमातून पाणीपुरवठा होत आहे. तात्पुरती नळपाणीपुरवठा योजना तसेच दलित वस्तीमध्ये टयूबवेलमार्फत पाणीपुरवठा होत आहे. याव्यतिरिक्त 6 हॅन्डपंप आहेत. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये 4 विहिरी प्रस्तावित आहेत. एका विहिरीचे काम पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या विहिरीचे काम चालू आहे. या व्यतिरिक्त आणखी दोन विहिरी प्रस्तावित आहेत. ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर दरडोई 40 लिटर पाणीपुरवठा या गावातील लोकांना होणार आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सध्या लोकांना किती लिटर पाणीपुरवठा होत आहे ? पिण्याच्या पाण्याची वस्तुस्थिती काय आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37588 पुढे सुरु...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, उन्हाळयामध्ये या ग्रामपंचायतीला दरडोई 22 लिटर पाणीपुरवठा होतो. जलस्वराज्य प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दरडोई 40 लिटर पाणीपुरवठा होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संग्रामपूर गावाला मी वारंवार भेट दिलेली आहे. 3.6.2006 पासून टँकरने पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे हे खरे आहे. परंतु 6 कूपनलिका देऊन या गावामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहेच. 6 कूपनलिका दिल्या जाणार असल्या तरी पूर्वीच्या कूपनलिकांमधील पाणी आटत चालले आहे. विदर्भातील तापमान आताच 42 डिग्रीपर्यंत गेले आहे. विहिरीतील पाणी आटलेले आहे. संग्रामपूर गावामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. जलस्वराज्याची कामे पूर्ण होईपर्यंत या गावाला टँकरने पाणीपुरवठा करण्याची गरज आहे. म्हणून टँकरने पाणीपुरवठा करावा अशी माझी मागणी आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांना सांगून सध्या गरज असल्यास ताबडतोब टँकरने पाणीपुरवठा सुरु करु. (नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 12:40

ता.प्र.क्र.37588........

प्रा.बी.टी.देशमुख : नॉर्म्सप्रमाणे जेवढा पाणीपुरवठा आवश्यक आहे त्यापेक्षा निम्मा पाणीपुरवठा या गावांमध्ये होत आहे. माझे दोन प्रश्न आहेत. ही जी जलस्वराज्य योजना आहे त्याचा उद्‌भव सुध्दा विहिरींवर घेतला आहे. आमच्या भागामध्ये कुपनलिका आणि विहिरींचा उद्‌भव धोकादायक असतो. जलस्वराज्य योजनेचे काम केव्हा पूर्ण होईल आणि भुपृष्ठावरील जलाशयातून उद्‌भव घेण्याविषयी शासनाने विचार केला आहे का? असल्यास तो काय आहे?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, जी कामे हाती घेतली आहेत ती सर्व कामे सप्टेंबर, 2008 पर्यंत पूर्ण करण्याचे आम्ही नियोजन केले आहे आणि तशी ती पूर्ण केली जातील. दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात लवकरच शासन बिल आणणार आहे. जीएसडीएच्या संदर्भात पुढील कॅबिनेटमध्ये प्रस्ताव यावा असा जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. या अधिवेशनामध्ये हे बिल सभागृहासमोर आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. ज्याप्रमाणे शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या संदर्भात शासनाने नवीन कायदा केला त्याप्रमाणे एकंदरीत पिण्याच्या पाण्याची गरज व भूगर्भातील पाण्याची पातळी खाली चालली आहे हे लक्षात घेऊन सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुखांशी एकत्रित चर्चा करुन हा नवीन कायदा अस्तित्वात आणण्याची नितांत गरज आहे आणि तो आणण्याकरिता तातडीने पावले उचलण्यात आली आहेत. हे अधिवेशन संपण्यापूर्वी हा नवीन कायदा आणण्याचा जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. शक्य न झाल्यास पावसाळी अधिवेशनात नवीन कायदा नक्की आणला जाईल.

-----------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतील**
**निधी कृष्णा खोऱ्यासाठी सातत्याने वापरला गेल्याबाबत**

**(४) * ४१२१४ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून आदिवासी विभागाच्या तरतूदींतील सुमारे ४५० कोटी रुपयांचा निधी सिंचनासाठी आणि मुख्यत: कृष्णा खोऱ्यातील सिंचन प्रकल्पासाठी वापरला गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५-२००६ मध्ये आदिवासी विकास विभागाच्या निधीमधून सिंचनासाठी दिलेल्या ११८ कोटी रुपयांच्या निधींपैकी ११७ कोटी कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पासाठी तर फक्त १ कोटी विदर्भातील प्रकल्पासाठी देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आगामी वार्षिक योजनेसाठी देखील आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागाच्या निधीतील ४०० कोटी रुपयांचा निधी कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पासाठी वळविण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी व मागासवर्गीय समाजासाठी असलेला निधी सिंचनासाठी वापरला गेल्याने त्या विभागाच्या कल्याणकारी योजनावर होणारा अनिष्ट परिणाम टाळण्याच्या दृष्टीने शासन कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहे वा करीत आहे ?

**श्री.रामराजे नाईक-निंबाळकर** : (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नांना नकारात्मक उत्तर देण्यात आले आहे. सन 2003-04 ते 2007-08 या आर्थिक वर्षात कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांच्या कामासाठी अर्थसंकल्पात किती तरतूद करण्यात आली होती व त्या व्यतिरिक्त किती अतिरिक्त खर्च करण्यात आला? हा खर्च भागविण्यासाठी कोणत्या विभागाच्या खर्चाला कात्री लावण्यात आली? सन 2003-04 या आर्थिक वर्षापासून सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांसाठी निधी वळविण्यात आला हे खरे आहे काय? तशी शिफारस राज्याच्या वार्षिक योजनेत करण्यात आली होती हेही खरे आहे काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कोणतेही राज्य सरकार अर्थसंकल्प तयार करीत असताना त्या त्या विभागांचा निधी इतर कामासाठी देतच असते. जलसंपदा विभागाच्या बाबतीत आदिवासी विभागाकडून देखील जिथे 50 टक्क्यापेक्षा जास्त आदिवासी समाज आहे अशा ठिकाणचे

..3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकल्प घेण्यासाठी अतिरिक्त निधी दिला जातो. त्याच पध्दतीने सामाजिक न्याय विभागाकडून देखील अशा प्रकारचा निधी मिळतो आणि तो निधी देत असताना सर्वंकष चर्चा करुन सरकार तशा पध्दतीचा निर्णय घेत असते. आज सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आदिवासी विकास विभागाच्या विकासाच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. या संदर्भात मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, हा निधी देत असताना 2003-04 पासून 2008-09 पर्यंत आदिवासी उपयोजनेमधून जलसंपदा विभागाकरिता 577 कोटी रुपये देण्यात आले. एकंदरीत या 6 वर्षात 577 कोटी रुपयांपैकी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळास 59 कोटी रुपये देण्यात आले. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला 113 कोटी रुपये या 6 वर्षात देण्यात आले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला 49 कोटी रुपये आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाला 169 कोटी रुपये देण्यात आले. याप्रमाणे एकूण 577 कोटी रुपयांच्या निधीचे वाटप करण्यात आले. हा निधी वाटप करीत असताना जलसंपदा विभागाकडून हा निधी अधिक इतर जो निधी येतो त्या सर्वच स्त्रोतातून येणारा निधी एकत्रित करुन माननीय राज्यपालांच्या सुत्रानुसारच या निधीचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये सुरुवातीच्या काळात काही प्रमाणात कमतरता झ ाली.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .......... ता. प्र. क्र. 41214........

परंतु ती या दोन तीन वर्षात पूर्णपणे भरुन काढण्यात आली आणि माननीय राज्यपालांनी दिलेल्या सुत्रानुसारच या सर्व विभागांना निधीचे वाटप करण्यात येत आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, कोणत्या विभागाला किती निधी मिळाला आणि कोणत्या विभागावर अन्याय केला व माननीय राज्यपालांच्या निदेशांचे कशा प्रकारे व्हायोलेशन झाले हे सर्व विचारण्याची ही वेळ नाही. माझा प्रश्न साधा व सोपा आहे तो म्हणजे समाजकल्याण विभाग आणि आदिवासी विभागाचा सन 2003 पासून आजपर्यंत किती निधी सिंचन विभागाकडे, प्रामुख्याने कृष्णा खोऱ्याकडे डायव्हर्ट करण्यात आला ? नसल्यास मंत्रिमंडळाच्या उप समितीमध्ये यासंबंधीची चर्चा झाली व त्यानुसार निर्णय झाला काय ?

श्री. अजित पवार : महोदय, 577 कोटी रुपये सहा वर्षामध्ये दिलेला निधी आहे......

श्री. नितीन गडकरी : माझा प्रश्न अगदी सोपा आहे. अशा प्रकारे वेगळे उत्तर देऊन मूळ प्रश्नाला बगल द्यावयाची आणि नंतर वेळ संपली म्हणून माननीय सभापतींनी जाहीर करावयाचे असे बऱ्याच वेळा होते. परंतु आम्हाला खात्री आहे की, माननीय सभापती तसे करीत नाहीत. माननीय मंत्री महोदय मुद्दाम मूळ प्रश्न कात्रजच्या घाटात नेण्याचा प्रयत्न करीत आहेत, तसा प्रयत्न त्यांनी करु नये. मला एवढेच विचारावयाचे आहे की, सन 2003 पासून समाजकल्याण आणि आदिवासी विभागाचा निधी डायव्हर्ट करुन पाटबंधारे विभागासाठी वापरण्यात आला आहे हे खरे काय ? असल्यास कृष्णा खोऱ्यासाठी तसेच इतर कोणत्या विभागासाठी हा निधी वापरला आहे ?

श्री. अजित पवार : महोदय, अशा प्रकारचा निधी दोन्ही विभागाकडून वापरला गेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आदिवासी विभागाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे म्हणून मी गेल्या सहा वर्षात 577 कोटीचे वाटप आदिवासी विभागात कसे झाले हे सांगितले. त्यांनी समाजकल्याण विभागाचा प्रश्न उपस्थित केला नसल्यामुळे त्याची माहिती सध्या माझ्याकडे नाही. समाजकल्याण विभागाचा निधी गेल्या सहा वर्षात कसा वाटप करण्यात आला ही माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : महोदय, प्रश्न क्र. 4 मध्ये असे विचारले आहे की, "आदिवासी व मागासवर्गीय समाजासाठी असलेला निधी सिंचनासाठी वापरला गेल्याने त्या विभागाच्या कल्याणकारी योजनांवर होणारा अनिष्ट परिणाम टाळण्याच्या दृष्टीने शासन कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहे ? आता प्रश्न इतकाच आहे की, आदिवासी विभागाचा आणि समाजकल्याण विभागाचा जो निधी सहा वर्षात वापरला त्यापैकी कृष्णा खोऱ्यासाठी किती निधी वापरला आणि बाकीच्या कोणकोणत्या विभागासाठी हा निधी वापरण्यात आला आहे ?

श्री. अजित पवार : महोदय, मी पुन्हा पुन्हा उत्तर देत आहे की, आदिवासी विभागासाठी 577 कोटी एवढा निधी गेल्या सहा वर्षात देण्यात आला त्यापैकी 59 कोटी रुपये कृष्णा खोऱ्यासाठी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळासाठी 113 कोटी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासाठी 49 कोटी आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळासाठी 161.30 कोटी इतका निधी देण्यात आला. आदिवासी उपयोजनेतून आलेला निधी आणि जलसंपदा विभागाचा निधी एकत्रित करुन माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसारच हे वाटप करण्यात येते. समाजकल्याण विभागाच्या संदर्भात सन 2007-08 मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेमध्ये 2060 कोटी रुपये मिळाले आहेत, त्यापैकी बराचसा निधी त्यांच्या त्यांच्या स्वत:च्या कामासाठी वापरला परंतु कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाला त्यातील 116 कोटी निधी गेला, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासाठी 178 कोटी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळासाठी 93.44 कोटी रुपये देण्यात आले. अशा प्रकारे या निधीचे वाटप करण्यात आले आहे.

यानंतर श्री. गायकवाड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 41214** .......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या ठिकाणी आदिवासींची संख्या 50 टक्क्यापेक्षा जास्त असते त्या ठिकाणी आदिवासी विकासाचा फंड वापरला जात असतो त्यामुळे कृष्णा खो-यामध्ये कोणत्या भागात 50 टक्क्यापेक्षा जास्त आदिवासींची संख्या आहे?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आदिवासींच्या संदर्भात जो निधी वापरला जातो त्यामध्ये कृष्णा खो-यात गेल्या सहा वर्षात फक्त 59 कोटी रुपये निधी वापरला गेलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच प्रश्न विचारला होता की, या तरतूदी व्यतिरिक्त अतिरिक्त खर्च करण्यात आलेला आहे त्यामुळे हा निधी भागविण्यासाठी कोणत्या विभागाच्या खर्चावर कात्री लावण्यात आलेली आहे? कृष्णा खो-याच्या कोणत्या भागात 50 टक्क्यापेक्षा अधिक आदिवासी राहतात?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ आणि अकोला हे तालुके आदिवासी आहेत. तसेच कोकणातील ठाणे जिल्हयामध्ये जास्त आदिवासींची संख्या आहे. मी आताच ज्या सहा तालुक्यांची नावे घेतलेली आहेत त्या सहा तालुक्यांमध्ये मोठया प्रमाणात आदिवासी राहतात. सहा वर्षात या ठिकाणी 577 कोटी रुपयांपैकी फक्त 59 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

-----------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यातील नांद्रे गावासाठी जलस्वराज्य योजनेतून स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी ठराव करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत**

**(५) * ३७४९९ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. गोविंदराव आदिक : तारांकित प्रश्न क्रमांक २९६९९ ला दिनांक २० जुलै, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील नांद्रे गावासाठी जलस्वराज्य योजनेतून स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी ग्रामपंचायतीस ठराव करुन प्रस्ताव सादर करण्याच्या जिल्हा परिषदेने सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) ग्रामपंचायतीकडून ठराव लवकरात लवकर मागवून घेण्याबाबत तसेच नांद्रे गावासाठी स्वतंत्र नळपाणी पुरवठा करुन देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे,श्री.अजित पवार यांच्या करिता**: (१) नाही.

(२) व (३) मौजे नांद्रे, ता.मिरज, जि.सांगली करिता जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषदे मार्फत ग्रामपंचायतीस ठराव करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या नाहीत. तथापि प्रस्तुत गावातील भूजल स्त्रोत बाधीत असल्याने भारत निर्माण कार्यक्रमाअंतर्गत पाणी गुणवत्ता बाधीत उपक्रमातून स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना रु.१०६.८३ लक्ष रकमेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी जिल्हा परिषदेमार्फत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी केव्हा पाठविण्यात आला? तांत्रिक मान्यता मिळवण्यासाठी काही अडचणी आहेत काय? नसल्यास विलंब होण्याची कारणे कोणती आहेत?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 21 सप्टेंबर 2007 मध्ये समिती समोर मान्यता देण्यात आली होती व टी.एस. च्या मान्यतेसाठी अधीक्षक अभियंता, सांगली यांच्याकडे प्रस्ताव गेलेला आहे. टी.एस. देण्यासाठी काहीही अडचणी नाहीत. या ठिकाणची नळ पाणी पुरवठा योजना ही रिजनल वॉटर सप्लायची असून या योजनेत सहा गावांना पाणी पुरवले जात असते. या सहा गावांच्या नळपाणी पुरवठा योजनांची लाईफ संपलेली आहे. या सहा गावांची नळपाणी पुरवठा योजना ही भारत निर्माण योजनेत घेतलेली आहे. या सहा गावांच्या पाणी पुरवठयाच्या संदर्भात समितीने असा विचार केलेला आहे की, सहा गावांमिळून एक प्रस्ताव केला तर त्यासाठी कृष्णा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

नदीतून पाणी मिळणार आहे. सगळया गावांमिळून एक योजना केली तर चांगले होणार आहे त्यामुळेच या योजनेला थोडा विलंब झालेला आहे. कदाचित बाकीच्या गावांनी एकत्रित योजनेला नकार दिला व नांद्रे ग्रामपंचायतीने 10 टक्के लोकवर्गणी भरली तर त्या गावाची योजना सुरु करण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, ज्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत नांद्रे गाव आहे तसेच या ठिकाणच्या सहा गावांना प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केला जात असतो व या सहा गावांची योजना जुनी झालेली आहे त्यामुळे या सहा गावांचाही विचार करण्यात येईल असा उल्लेख या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी केलेला आहे. परंतु आता नांद्रे गावाने पुढाकार घेऊन 10 टक्के लोकवर्गणी गोळा केलेली असून ही योजना लवकरात लवकर राबविण्यात यावी अशी नांद्रे ग्रामपंचायतीची तसेच ग्रामस्थांची इच्छा आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, उरलेल्या गावांचा विचार नंतर करा परंतु नांद्रे गावाच्या पाणी पुरवठयास लवकरात लवकर मान्यता देण्यात यावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ब्रमनाळ, खटाव, सुकवाडी, वसकडे, वाझेगाव, खोतवाडी आणि नांद्रेर्व गावे कृष्णा नदीच्या जवळील आहेत. या विषयाची आम्ही जेव्हा माहिती घेत होतो त्यावेळेस असे आढळून आले की, नांद्रे गावाची पिण्याच्या पाण्याची योजना जुनी झालेली असून ब्रमनाळ, खटाव, सुकवाडी, वसकडे, वाझेगाव, खोतवाडी या गावांची पिण्याच्या पाण्याची योजना देखील जुनी झालेली आहे. या सर्व गावांमिळून पिण्याच्या पाण्याची योजना केली तर त्यासाठी 4.5 कोटी रुपये खर्च येतो आणि प्रत्येक गावांनी आपली स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची योजना केली तर त्यासाठी 7.25 कोटी रुपये खर्च येतो. या विषयाच्या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर एक बैठक बोलावण्यात येईल. या बैठकीमध्ये सर्व गावातील प्रमुखांना तसेच जिल्हा परिषदेच्या लोकांना एकत्र बोलावून सर्व गाव मिळून योजना करण्यास मान्यता दिली तर शासन

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37499** .......

श्री. अजित पवार.....

4.5 कोटी रुपये खर्च असलेल्या योजनेला मान्यता देईल व या सहा गावांनी एकत्र योजना घेण्यास नकार दिला तर आता नांद्रे गावाच्या पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,अधीक्षक अभियंता, सांगली यांच्याकडे 5.3.2008 रोजी आलेला असून या योजनेला ताबडतोब मान्यता देण्याच्या संदर्भात सांगण्यात येईल व योजनेला मान्यता देण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37499 ......

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, पाचही गावाच्या पाणीपुरवठा योजनेचा विचार करण्यासाठी जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने या पाच गावाच्या ग्रामपंचायतीच्या पदाधिका-यांना अधिवेशन संपण्यापूर्वी बोलावून त्यासबंधीचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.अजित पवार : होय

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील ओणी ग्रामपंचायतीमध्ये जलस्वराज्य योजनेत घोटाळा झाल्याबाबत

**(६) * ३९३०३ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील ओणी ग्रामपंचायतीमध्ये जलस्वराज्य योजनेत घोटाळा झाल्याने या योजनेची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ डिसेंबर, २००७ रोजी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे,अजित पवार यांच्याकरिता** : (१) ग्रामपंचायत ओणी, ता.राजापूर ही सिंधुदुर्ग जिल्ह्यात नसून रत्नागिरी जिल्ह्यात समाविष्ट आहे. ओणी येथील ग्रामस्थांनी प्रकल्पाबाबत दिनांक २९.१२.२००७ रोजी निवेदन शासनास सादर केले आहे.

(२) प्रस्तुत निवेदनाच्या अनुषंगाने वरिष्ठ लेखा अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प, रत्नागिरी यांचेमार्फत चौकशी केली असता सदर प्रकरणी भ्रष्टाचार अथवा आर्थिक अनियमितता आढळली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या योजनेत भ्रष्टाचार किंवा आर्थिक अनियमितता आढळून आलेली नाही असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे तेव्हा सदरहू योजना पूर्ण झालेली आहे काय, नसल्यास त्याच्या विलंबाची कारणे काय आहेत ? विलंब झाला असल्यास आणि भ्रष्टाचार झाला नसल्यास लेखा अधिका-यापेक्षा वरच्या अधिका-याकडून विलंबाची कारणे शोधून काढण्यात येणार आहेत काय ?

श्री.अजित पवार : या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे आणि सहकार मंत्री डॉ.पंतगराव कदम यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. दोन्ही तक्रारीमध्ये एकच असा उल्लेख करण्यात आला होता की, यशवंत ग्राम समृध्दी योजनेसाठी आणि रस्त्याच्या कामासाठी जमा केलेल्या रकमेपैकी 83 हजार 830 रुपये बॅन्केच्या खात्यातून कोणाचीही परवानगी न घेता काढले होते. या संदर्भात जल स्वराज्य योजनेच्या कार्यालयाचे वरिष्ठ लेखा अधिका-याना ओणी ग्रामपंचायतीचे कागदपत्र तपासण्यासाठी पाठविले होते. श्री. शेंडगे नावाच्या अधिका-यांनी तेथे जाऊन कागदपत्राची तपासणी केली होती परंतु त्यांना यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आढळून आले नाही. आज त्या ठिकाणी जल स्वराज्य योजनेतून 99 लाख रुपयांची योजना मंजूर करण्यात आली आहे. त्यासाठी दहा टक्के रक्कम लोकवर्गणीतून देण्यात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येणार आहेत आणि 90 टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येणार आहेत. अशा प्रकारचे पैसे मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यातील पहिल्या टप्यासाठी 43 लाख रक्कम अदा करण्यात आली आहे आणि काम सुरु करण्यात आलेले आहे. तेवढे काम पूर्ण झाल्यानंतर आणि दुस-या टप्यासाठी त्यांनी रकमेची मागणी केली की ती सुध्दा रक्कम त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल आणि हे काम पूर्णत्वाला नेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : किती दिवसात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे ?

( उत्तर दिले नाही )

श्री.परशुराम उपरकर :सभापती महोदय, जल स्वराज्य योजनेच्या कामाचे टेन्डर न काढता काम केले जाते असे प्रकार अनेक ठिकाणी घडलेले आहेत. काही ठिकाणी काम प्रथम केले जाते आणि नंतर टेन्डर मागविण्यात येते. तसेच वापरण्या पूर्वीच पाईप मागविले जातात व नंतर ब-याच कालावधीनंतर वापरले जातात अशा अनेक तक्रारी आलेल्या आहेत त्याचबरोबर लेखा
समितीची या कामाला परवानगी घेतली नाही. लेखी समितीमध्ये कोणतीही चर्चा केली नाही. असे प्रकार सिंधुदूर्ग जिल्हयात फोंडा या गावात घडलेले आहेत तेथील काही लोक उपोषणासाठी देखील बसले होते त्यांनी शासनाकडे अनेक निवेदने दिली होती तसेच पत्रव्यवहार केला होता. या संदर्भात लोकप्रतिनीधींनीसुध्दा पत्रव्यवहार केला होता. जल स्वराज्य योजनेच्या कामाकडे योग्य प्रकारे लक्ष दिले जात नाही तेव्हा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती उपायोजना करण्यात येणार आहे?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ही योजना जेव्हा सुरु झाली होती तेव्हा शासन किंवा जिल्हा परिषदे मार्फत योजना केल्या जावयाच्या परंतु आता गावांनी योजना करावी असा प्रस्ताव पुढे आणला आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूच्या लोकप्रतिनिधीची ब-याच प्रमाणात तक्रार आहे.. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी देखील तक्रार केलेली आहे त्याची चौकशी करण्यात येईल आणि त्या चौकशीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. त्याच प्रमाणे अशा घटना घडू नयेत यासाठी मागच्या काळात ही योजना आली होती तेव्हा फक्त सरपंच किंवा ग्रामसेवकाची संमती किंवा त्या समिती प्रमुखाची संमती असेल तरच पैसे विथ ड्रॉ करता यावयाचे परंतु आता डेप्युटी इंजिनिअर्सना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामध्ये इनव्हॉल्व्ह करण्यात आले असून त्यांनी कामाची पहाणी करुन त्या कामासाठीच चेक काढला आहे किंवा नाही हे त्यांनी पहावयाचे आहे. यामध्ये चुकीच्या गोष्टी घडणार नाहीत अशा प्रकारची खबरदारी घेण्याचा प्रयत्न सुरु आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 39303 .....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी सांगितले की, ही योजना 99 लाखाची आहे तर मग ही योजना पूर्ण करण्यासाठी आणखी किती दिवस, महिने वा वर्षे लागणार आहेत ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आता त्या गावाने ती योजना पूर्ण करावयाची आहे. वास्तविक त्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्रता असेल तर या योजनेसाठी पैसे आपण दिलेले आहेत, त्यातील पहिला हप्ता दिलेला आहे. तेव्हा त्याचे व्यवस्थित काम झाले तर दुसरा हप्ता लगेचच देण्यास आपण तयार आहोत. तेव्हा आता त्या गावाने हे ठरवायचे आहे की, ही योजना किती दिवसात पूर्ण करावयाची.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

***

..... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "अमरावती विभागातील सिंचन प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याबाबत " या विष्यावरील सर्वश्री.जैनुद्दीन जव्हेरी, संजय दत्त, वि.प.स. यांच्या दिनांक 20 जुलै 2007 रोजी उत्तरित झालेल्या ता.प्र.क्रमांक 30209 ची अधिस माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**<u>अधिक माहिती</u>**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी. )

..... एम 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2004-05 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा सन 2004-05 व 2005-06 चा अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

***

**रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. सुरेश जेथलिया (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पंधरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

***

**औचित्याच्या मुद्याबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक 23 नोव्हेंबर 2007 रोजी " श्री.महादेव दगडू ठाकरे यांना शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागल्यामुळे त्यांनी केलेली आत्महत्या " या विषयावर उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : औचित्याच्या मुद्यासंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया येथे सोबतची अधिक माहिती छापावी. )

..... एम 4 ....

<u>नियम 93 अन्वये सूचना.</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता यांनी "अकोला महानगरपालिकेला सन 2006-07 या वर्षाकरिता दलित वस्ती सुधारणेसाठी 4.42 कोटी रकमेचे वोटप झाले असून सदर निधी दलित लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित न झाल्याने लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी मागणी करूनही त्यावर कार्यवाही न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विष्यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व श्री.जगदीश गुप्ता यांनी "सरकारी कर्मचाऱ्यांच्या मालकीया घराचे स्वप्न साकार करण्यासाठी असलेल्या जी.आय.एस. या योजनेपासून अनेक सरकारी कर्मचारी वंचित असून खाजगी विकासकांनी अनेक बोगस सहकारी संस्था निर्माण करून कर्मचाऱ्यांना अल्प किंमतीत घराचे आमिष दाखविण्याचा लावलेला सपाटा." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विष्यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूमुख जागवाणी, रामनाथ मोते, संजय केळकर व प्रतापराव सोनवणे यांनी "महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना गेल्या 8 ते 10 वर्षांपासून वेतनेतर अनुदान देण्याचे सभागृहात आश्वासन देऊनही ते देण्यात आले नसल्याने या अनुदाना अभावी अनेक शाळांची आर्थिक परिस्थिती बिकट होऊन विद्यार्थ्यांच्या विकासाचे व गुणवत्ता वाढीचे उपक्रम राबविणे अडचणीचे होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विष्यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व विनोद तावडे यांनी "ठाणे जिल्ह्यातील वाडा औद्योगिक वसाहतीतील अनेक रासायनिक व इतर कारखाने असून या कारखान्यांमध्ये अपघात होऊन स्फोट झाल्यास तेथे सुरक्षा व अग्निशमन यंत्रणा अस्तित्वात नसल्याने मोठ्या प्रमाणात वित्त व जीवित हानी होत असल्याने अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विष्यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

.... एम 5 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "गोंदिया जिल्हा निवड समितीने दिनांक 24 डिसेंबर 2007 रोजी सरळ सेवेने भरावयाच्या पदांकरिता आवेदकांकडून बेकायदेशीररित्या शुल्क आकारल्याने या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विष्यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

( यानंतर श्री. सरफरे .... एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती...**

सन्माननीय सदस्य सर्वश्री. जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, केशवराव मानकर यांनी "दिनांक 19 मार्च, 2008 रोजी अमरावती येथील एका तरुणीस दोन तरुणांनी तिला जबरदस्तीने रिक्शात घुसवून बेशुध्द करुन तिचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी "महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ, पुणे येथे कार्यरत असलेले श्री. व्ही. के. साबळे यांनी राज्य शासन व मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आय.डी.सी. यांच्या विरुध्द मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या बढतीचे हक्क डावलणे, खंडपीठाने या संबंधात प्रतिकूल मत व्यक्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "मुंबई महानगरपालिकेचे सर्व कामकाजाचे संगणकीकरण करण्याकरिता महापालिकेने 40 कोटी रुपये खर्च करणे, सदर खर्च बाजार भावापेक्षा 10 कोटी रुपयांपेक्षा जास्त असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे-पिंपरी-चिंचवड परिसरात अखंड वीज पुरवठयाचे पुणे मॉडेल राबविण्यात येत असल्यामुळे पुणे परिसरात 24 तास वीज पुरवठा होत असून यास पुणे मॉडेल संबोधण्यात येणे, यापुढे पुण्यात 24 तास अखंड वीज पुरविणे अशक्य असल्याचे राज्य वीज नियामक आयोगाने नमूद केल्याने परिसरात भारनियमन होणार असल्याने तेथील उद्योगधंद्यावर होणारा परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "जे.जे. हॉस्पिटलमधील कॅथलॅब मशीन जुनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**सभापती**....

झाल्याने व तिची क्षमता संपल्याने डिसेंबर, 2007 मध्ये जर्मनीहून नवीन कॅथलॅब मशीन आयात करण्यात येणे, सदर मशीन सुरु न करता सुरु केली असल्याचे विभाग प्रमुखांनी शासनास अहवाल पाठवून शासनाची केलेली दिशाभूल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील, जयंत पाटील, प्रकाश शेंडगे यांनी "सांगली येथील सर्वोपचार रुग्णालयातील डॉक्टरांनी सदर रुग्णालयाच्या डीन डॉ. कल्पना सुल्यान यांच्या विरोधात अनेक तक्रारी करुन गेल्या तीन दिवसांपासून संप चालू करणे, त्यामुळे अतिदक्षता विभागाला व रुग्णांनाही बसलेला फटका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. पाशा पटेल, पांडुरंग फुंडकर यांनी "केंद्र शासनाने दिनांक 31 मार्च, 2008 रोजी डाळी व तेलजन्य पदार्थावरील आयात शुल्क उठविल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाला कमी भाव मिळणे, आयात शुल्क उठविल्यामुळे तसेच डाळींवरील निर्यात बंदीत वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेली आत्महत्तेची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे

मु. शी : शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते,परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

**सभापती** : नियम 93 अन्वये सूचनेवरील राखून ठेवण्यात आलेले निवेदन आता चर्चेकरिता घेण्यात येत आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब यांनी "शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, महिलांच्या मोर्चामध्ये मध्यस्थी करण्यासाठी तहसिलदारांची परवानगी घेऊन मी त्याठिकाणी गेलो असतांना पोलीस अधिकाऱ्यांनी आमदारांना अडविणे कोणत्या कायद्यातील तरतुदीमध्ये आहे. त्याचप्रमाणे मी दाखल केलेली केस ही अदखलपात्र दाखल करणे आणि पोलिसांनी केलेली केस दखलपात्र दाखल करणे अशाप्रकारे पोलिसांकडून कारवाई होऊन लोक प्रतिनिधींचा अवमान होत असतांना याठिकाणी जे निवेदन केले आहे ते पूर्णपणे चुकीचे आणि पोलिसांच्या गुन्हयांवर पांघरुण घालणारे आहे. प्रश्न असा आहे की, तहसिलदारांना भेटण्यास जाणाऱ्या लोकप्रतिनिधींना पोलीस अधिकाऱ्यांनी अडविण्याचे कोणते कारण होते? व मी दाखल केलेली केस अदखलपात्र कां करण्यात आली?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य महिलांचा मोर्चा घेऊन तहसिलदार यांच्या ऑफिसमध्ये गेले...

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**सभापती** : मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होण्यापूर्वी आपण उभे राहिले पाहिजे कां?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:10

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्याठिकाणी महिला बचत गटाची बैठक होती. धान्य मिळत नाही म्हणून तेथील महिलांनी सन्माननीय त्या भागातील आमदारांकडे तक्रार केली. मग सन्माननीय आमदारांनी सांगितले की, याबाबतीत तहसीलदार यांना भेटून निवेदन देऊ. त्याप्रमाणे ते सर्वजण भेटावयास गेले. त्यावेळी तेथे 200 महिला होत्या. तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, सन्माननीय आमदार, आपण स्वत: आणि सात-आठ प्रमुख महिलांना बरोबर घेऊन तहसीलदार यांची भेट घेऊ शकता. सगळयांनी भेट घेण्यासाठी जाऊ नये. त्यावेळी आमदारांनी त्यांना थोडे अपशब्द बोलल्यामुळे त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सन्माननीय आमदारांनी जी तक्रार केली आहे, त्याबाबतीत देखील गुन्हा दाखल केलेला असून, त्याबाबतीत देखील चौकशी सुरु आहे.

श्री.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, तेथे महिला गटाचा मोर्चा गेला होता. पण तेथे मोर्चा गेला नव्हता. उलट तेथे भाववाढीच्या विरोधात निवेदन देण्यासाठी महिला जमलेल्या होत्या आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे माननीय तहसीलदार यांची परवानगी घेऊन त्यांना भेटावयास गेले होते. असे असताना देखील तेथील अधिकाऱ्यांनी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना अडविले आणि तुला आतमध्ये जाता येणार नाही. अशा प्रकारे एखाद्या माननीय सदस्यांना एकेरी भाषेमध्ये सांगण्यात आले. तहसीलदार यांनी त्यांना भेटण्यासाठी परवानगी दिलेली असताना देखील अडविण्यात आले. आपण अशा मग्रुर अधिकाऱ्यांबाबत कोणत्या प्रकारची कारवाई करणार आहात ? त्यांना निलंबित करुन या सगळया प्रकरणाची चौकशी करणार आहात की नाही ते सांगावे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय आमदार महोदयांना अडविलेले नाही . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे ज्यावेळी या सदनामध्ये काही माहिती देतात, त्यावेळी ती सत्य मानली पाहिजे. स्वत: सन्माननीय सदस्य येथे माहिती सांगत आहेत आणि तरी देखील माननीय मंत्री महोदय उत्तरामध्ये असे सांगतात की, असे काही घडलेले नाही. याठिकाणी सभागृहाचे सन्माननीय सदस्य अशा प्रकारे

. . . .ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

माहिती देत असतील आणि संबंधित पोलिसांनी त्यांचा अवमान केला असेल तर माननीय मंत्री महोदय त्यांना वाचविण्याचा प्रयत्न का करीत आहेत ? संबंधितांना निलंबित का करण्यात येत नाही? एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या बरोबर पोलीस अशा प्रकारे वागत असतील आणि शासन त्यांना पाठिशी घालत असेल तर आपणच आम्हाला संरक्षण दिले पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, आमदार महोदयांना तहसीलदारांना भेटण्यासाठी आतमध्ये जाण्यास मज्जाव नव्हता. मात्र सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे होते की, येथील सर्व महिलांना आत मध्ये घेऊन जाणार. त्यावेळी त्यांना असे सांगण्यात आले की, आमदारसाहेब, तुम्ही तुमच्याबरोबर 7-8 महिलांना . . . . .

**सभापती** : निवेदनामध्ये असे सांगितलेले आहे की, तेथे ज्या महिला आलेल्या होत्या, त्यापैकी अर्ध्या महिलांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार यांना भेटावे असे सांगितले. त्यानुसार तहसीलदार यांना भेटण्यासाठी जात असताना, त्यांच्याबरोबर जर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे असतील तर त्यावेळी त्यांना अडविलेले आहे काय ? या दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीपासून हेच सांगत आहे की, सन्माननीय आमदारसाहेबांची आणि बचत गटाच्या महिलांची अशी मागणी होती की, आम्ही सर्वजण तहसीलदार यांना भेटणार, त्यांना घेराव घालणार. त्यावेळी तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना असे सांगितले की, सन्माननीय आमदार स्वत: आणि बचत गटाच्या काही प्रमुख महिला आतमध्ये जाऊन तहसीलदार यांची भेट घेऊ शकतात, त्यांना निवेदन देऊ शकतात. एवढेच म्हटलेले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, प्रत्यक्षात ही घटना काय घडलेली आहे हे आम्हाला सांगता येणार नाही. पण वर्तमानपत्रामध्ये सातत्याने या संदर्भातील बातम्या येत होत्या आणि शासनाच्यावतीने जे निवेदन देण्यात आलेले आहे, ते जर आपण बारकाईने वाचले तर असे लक्षात येईल की, एवढा सगळा प्रकार झाल्यानंतर दुपारी 3.00 ते 5.00 वाजेपर्यंत या शिष्टमंडळाने तहसीलदार यांच्याबरोबर चर्चा केली असा निवेदनामध्ये उल्लेख केलेला आहे. याचा अर्थ या शिष्टमंडळाने शांततेमध्ये आत जाऊन तहसीलदार यांची भेट घेतलेली आहे. त्यांनी कोणतीही दंगा मस्ती केलेली नाही. वर्तमानपत्रातील ज्या बातम्या आहेत किंवा सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत

. . . .ओ-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानुसार तेथील जो पोलीस अधिकारी आहे, त्याने निश्चितपणे यांच्याबरोबर गैरवर्तन केलेले आहे. एक लोकप्रतिनिधी म्हणून निश्चितपणे ते त्यांच्या परिचयातील असेल किंवा कोणताही असेल. परंतु दिवसेंदिवस अधिकाऱ्यांचे उर्मटपणे वागण्याचे प्रकार वाढू लागलेले आहेत. म्हणून सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत, ते खरे मानून आपण या अधिकाऱ्यावर कारवाई करणार आहात काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय राज्य मंत्री यासंबंधातील उत्तर देतील. पण मी या मतदार संघाचा लोकप्रतिनिधी आहे आणि त्या जिल्हयाचा पालकमंत्री देखील आहे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

याठिकाणी बसून बोलावयाचे नाही. खाली बसून बोलण्याचा नियम नाही. सन्माननीय सदस्यांनी उभे राहून बोलावे.

(सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 13:15

**सभापती** : माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांना बोलण्याकरिता मी परवानगी दिलेली आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी मी स्वत: जाऊन सर्व माहिती धेतलेली आहे. तेथील कोठल्याही कर्मचाऱ्याला किंवा पोलीस अधिकाऱ्याकडे आपण याबाबत चौकशी करावी. लोकशाहीमध्ये एखाद्यास शिष्टमंडळ घेऊन जावयाचे असेल तर त्याकरिता प्रथम पत्र द्यावे लागते. तेथील गेट बंद केलेले असताना देखील तेथे 5-10-25 लोकांना घेऊन नव्हे तर जवळपास 100 ते 150 महिलांनी कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे पोलिसांनी त्यांना विरोध केला. म्हणून त्यातील काही लोकांनी पोलिसांना काही अपशब्द वापरले त्यांना धक्काबुक्की केली. हे सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी सहन करायचे काय ? सिंधुदूर्ग जिल्हयातील सन्माननीय सदस्य श्री. उपरकर या सदनामध्ये आल्यापासून आपण सभागृहाचे कामकाज तपासून पहावे. आपल्याला ठेकेदारांविरुध्द दिलेल्या तक्रारी, अधिकाऱ्यांविरुध्द दिलेल्या तक्रारी किंवा कोणाच्या धराविरुध्द दिलेल्या तक्रारीच दिसून येतील. या सर्व गोष्टीचा दोष अधिकाऱ्यांना दिला जातो. परंतु तो अधिकारी दोषी आहे किंवा नाही, अधिकाऱ्यांनी हे कृत्य केलेले आहे किंवा नाही याची शहानिशा करावयाची नाही काय ? कोणतीही तपासणी न करता सन्माननीय सदस्य जी वर्तणूक करीत आहे त्या बद्दल त्यांची चौकशी व्हावयास पाहिजे. तेथील अधिकाऱ्यांची योग्य पध्दतीने काम केलेले आहे. कोठल्याही अधिकाऱ्याने कामामध्ये चूक केलेली नाही.

( गोंधळ )

डॉ. दिपक सावंत : सभापती महोदय, या संदर्भात माझा एक हरकतीचा मुद्दा आहे. माननीय पालक मंत्र्यांनी आताच येथे सांगितले आहे की, सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी ठेकेदारांविरुध्द व पोलिसांविरुध्द तक्रारी केलेल्या आहेत. या सभागृहाची व खालच्या सभागृहाची अशी पध्दत आहे की, कोणतीही सूचना मांडतांना माननीय सभापतींची परवानगी घ्यावी लागते. माननीय सभापती महोदयांनी त्यास परवानगी दिल्यानंतरच सन्माननीय सदस्यांना ती सूचना सभागृहामध्ये मांडता येते. असे असताना माननीय मंत्री महोदयांनी असे बोलणे योग्य आहे काय ? हा सभागृहाचा अपमान आहे. तसेच हा माननीय सभापतींचा देखील अपमान आहे. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, यासंदर्भात आता जे काही बोलले गेले आहे ते आपण रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, धान्य घोटाळा केल्या प्रकरणी काही अधिकारी जेलमध्ये गेलेले असून सुध्दा व त्या संबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देऊनही आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या अधिकाऱ्यांच्या पाठीशी कोण उभे आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दिपक सावंत यांनी येथे हरकतीचा मुद्दा मांडला आहे. माननीय मंत्री महोदय, श्री. नारायण राणे यांना या ठिकाणी मंत्रीमंडळातील एक मंत्री म्हणून व सामुदायिक जबाबदारीच्या दृष्टीने स्पष्टीकरण करण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे.आवश्यकता असल्यास काही वेळा बोलण्याची संधी देणे हा सभापतींचा अधिकार आहे. सभापतींची परवानगी घेऊन सन्माननीय सदस्यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी या ठिकाणी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे त्या अंतर्गत आता चर्चा सुरु आहे. सन्माननीय राज्य मंत्री महोदयांनी आपले उत्तर पूर्ण करावे.

डॉ. दिपक सावंत : सभापती महोदय, माझ्या हरकतीच्या मुद्यासंदर्भात उत्तर मिळालेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची परवानगी दिलेली आहे. या बाबतीतील माहिती मी तपासून घेईन.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी असे सांगितले होते की, तेथील अधिकारी माननीय आमदारांशी सन्मानाने बोलले. त्या ठिकाणी 150 ते 200 महिला उपस्थित होत्या. त्या वेळी तेथे कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक श्री. मातोंडकर यांनी जमावातील फक्त 5 ते 10 महिलांचे शिष्टमंडळ घेऊन तहसिलदार, मालवण यांच्या कार्यालयात जाण्याची विनंती केली. त्यांचे हे सांगणे माननीय आमदार श्री. परशुराम उपरकर यांनी ऐकले नाही. तेथील पोलीस अधिकाऱ्यांना शिवीगाळ केली. त्यांनी सरकारी कामात अडथळा आणला. त्यामुळे समाननीय सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला व नंतर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. आता या दोन्ही गुन्हयांची चौकशी सुरु आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : या नंतर नियम 93 अन्वये सूचना क्रमांक 1 घेण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

यानंतर श्री. बरवड.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गेडाम यांच्याकडून कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेला मानसिक त्रास

**मु. शी.** : अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गेडाम यांच्याकडून कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेला मानसिक त्रास याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिस अहमद ( पशुसंवर्धन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गेडाम यांच्याकडून कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेला मानसिक त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गेडाम हे इतके अफलातून अधिकारी आहेत की, ते वारंवार खालच्या कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देतात. कार्यालयीन वेळेनंतर कर्मचाऱ्यांना थांबविणे, कर्मचाऱ्यांची चूक नसताना शिवीगाळ करणे असे प्रकार करणारे ते अधिकारी आहेत. त्यांनी अनधिकृतपणे एका कर्मचाऱ्याची नियुक्ती केली आणि नियमाचा भंग केलेला आहे अशा प्रकारचा प्रस्ताव 25 ऑक्टोबर, 2007 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी पाठविला आहे. त्यांच्यावर वेळीच कारवाई व्हावयास पाहिजे होती. 13 मार्च रोजी डॉ. भोजापुरे यांनी त्यांच्या मानसिक छळामुळे आत्महत्या केली. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे की, त्याला कार्यमुक्त केले आहे. त्यांना कार्यमुक्त केले म्हणजे काय ? त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले काय ? त्यांना निलंबित केले काय ? त्यांना टर्मिनेट केले काय ? ते फार मग्रूर अधिकारी आहेत. ते खालच्या कर्मचाऱ्यांना त्रास देत असतील तर त्यांना त्या ठिकाणी ठेवल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होईल आणि कर्मचाऱ्यांना आत्महत्या करावी लागेल. अनेक कर्मचारी आत्महत्या करतील. म्हणून त्यांना त्वरित निलंबित करुन आता जो प्रस्ताव पाठविला आहे त्या अनुषंगाने शासन काय कारवाई करण्याचे आदेश देणार आहे ? निलंबनाची कारवाई आजच जाहीर करणार काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, डॉ. गेडाम के बारे में जितनी भी शिकायतें आई हैं, उसके हिसाब से उनके ऊपर कार्रवाई की गई है और पुलिस में शिकायत की गई है. सिविल लाइन्स पुलिस स्टेशन में आई.पी.सी. के सेक्शन 504, 509 और 306 के अन्तर्गत शिकायत की गई है. यहां पर माननीय सदस्य श्री. फुंडकर ने कहा है कि इन्होंने भ्रष्टाचार किया है और ये अपने अधीन कर्मचारियों के ऊपर दबाब लाते हैं. एक एल.डी.ओ. ने आत्महत्या भी की है. माननीय सदस्य ने डॉ. गेडाम को सस्पेंड करने की मांग की है. मैं उनको बताना चाहता हूँ कि डॉ. गेडाम को तुरन्त सस्पेंड किया जाएगा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकरामध्ये झालेली दरवाढ

**मु. शी.** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकरामध्ये झालेली दरवाढ याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकरामध्ये झालेली दरवाढ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हा जो पथकर लावलेला आहे त्यामध्ये 18 टक्के वाढ केलेली आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, दरवर्षी 6 टक्के दरवाढ या हिशेबाने दर तीन वर्षाने एकत्रितपणे 18 टक्के दरवाढ गृहीत धरुन दर निश्चित केलेले आहेत. आज त्या ठिकाणचा टोल पाहिला तर तो सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांना परवडणारा नाही. राज्य शासनाने याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावयास पाहिजे.त्या ठिकाणी ॲग्रीमेंट आहे हे मान्य आहे तरी देखील या द्रुतगती मार्गाचा वापर करणारे जे मध्यमवर्गीय आहेत त्यांना तो दर परवडत नाही. शासनाचा टोल वाढला तर बसच्या भाड्यामध्ये वाढ होणार आहे. लक्झरी बसच्या भाड्यात वाढ होणार आहे. त्यामुळे याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन यामध्ये कंसेशन देणार काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर टोलचा दर वाढला आहे हे खरे आहे. हा टोल शासनाच्या धोरणाप्रमाणे वाढविला आहे. दर तीन वर्षाने 18 टक्के टोल वाढविण्याचे शासनाचे धोरण आहे आणि त्यानुसार हा टोल वाढविलेला आहे. त्यामध्ये कार व जीपसाठी 118 रुपये टोल होता तो 140 रुपये केलेला आहे. मिनीबस आणि बससाठीसुध्दा वाढ केलेली आहे. त्याचा हिशेब केला तर महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे ही वाढ आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख......

महाराष्ट्राच्या धोरणाप्रमाणे हा टोल वाढविलेला आहे. बससाठी यापूर्वी 348 रुपये होतो आता तो 441 रुपये आहे, म्हणजे 63 रुपयांनी वाढविला आहे. एका बसमध्ये 60 प्रवासी गृहित धरल्यास एका प्रवाशामागे एक रुपये वाढ होईल. कारचा हिशेब केला तर 22 रुपये वाढलेले आहेत. कारमध्ये 4 जण असतील तर प्रत्येक व्यक्तीमागे 5 रुपयांनी वाढ केल्याचे दिसून येते. या एक्सप्रेस हायवेसाठी 2200 कोटी रुपये खर्च झाल्यामुळे त्याची वसुली तर झाली पाहिजे. हा टोल दर 3 वर्षांनी 18 टक्के वाढविला जाणार आहे. आता दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून तो लागू होणार आहे.

डॉ.दीपक सावंत : आजपर्यंत या टोलद्वारे किती पैसा वसूल केला आणि या हायवेसाठी किती खर्च झाला आहे ?

श्री.अनिल देशमुख : या रस्त्यासाठी 2200 कोटी रुपये खर्च केलेला आहे. टोलसाठी 918 कोटी रुपयांचा ऑक्शन दिलेला आहे. त्याची मुदत 15 वर्षे म्हणजे 2018 पर्यंत आहे. 15 वर्षात टोलमध्ये स्टिम्यूलायझेशन पध्दतीने दर 3 वर्षांनी 18 टक्क्यांनी वाढ होणार आहे. हा टोल वसुलीचे काम खाजगी कंपनी करीत आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : मुकबधिर विद्यार्थ्यांच्या अनुदानित शाळांचे परिरक्षणाचे थकित असलेले अनुदान

**मु. शी.** : मुकबधिर विद्यार्थ्यांच्या अनुदानित शाळांचे परिरक्षणाचे थकित असलेले अनुदान याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "मुकबधिर विद्यार्थ्यांच्या अनुदानित शाळांचे परिरक्षणाचे थकित असलेले अनुदान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मुकबधिर प्रवर्गाच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. 7-8 वर्षे त्यांना वेतनेतर अनुदान व परिरक्षण मिळण्यासाठी, म्हणजे भोजनासाठी येणा-या खर्चाचे अनुदान सुध्दा दिलेले नाही, अशा अनेक संस्था आहेत. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, 'अनुदानाअभावी विद्यार्थ्यांच्या स्वास्थ्यावर कोणताही परिणाम होत नाही.' 7-8 वर्षे अनुदान न देता परिणाम होत नाही असे शासनाचे म्हणणे आहे. माझे यांसदर्भात दोन प्रश्न आहेत. लहान लहान कारणांमुळे त्यांचे वेतन थांबविले जाते. अनुज्ञाप्ती आणि निधी या दोन कारणांमुळे 3-3, 4-4 महिन्यांनी त्यांना वेतन दिले जाते. यावर्षामध्ये पुढील सत्रापासून नियमित वेतन मिळेल काय ? संत केजाजी महाराज मुकबधिर शाळा, सेलू, जिल्हा वर्धा या संस्थेचे मागील 7 वर्षापासून 11 लाख 12 हजार रुपये थकित आहे. हे अनुदान 2 दिवसामध्ये दिले जाईल काय ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. अनुदान देण्यामध्ये थोडीशी अडचण होती. वेतनेतर अनुदान संस्थेला मिळू शकलेले नाही हे खरे आहे. पण सर्व संस्थांना नियमितपणे वेतन दिले जात होते. नुकत्याच पुरवणी मागण्या सभागृहात मंजूर झ ाालेल्या आहेत. त्यामध्ये वेतनेतर अनुदान, परिरक्षण आहर आणि बाकीच्या सर्व अनुदानासाठी 36 कोटींची तरतूद केलेली आहे. सुरुवातीपासून थकित अनुदान होते ते सर्व देत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे संत केजाजी महाराज मुकबधिर शाळा, घोराड, ता.सेलू, जिल्हा वर्धा यांचे ऑडिट थकित असल्यामुळे अनुदान थांबलेले आहे. परंतु त्यांचेही तात्काळ अनुदान रिलीज केले जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : त्यांना वर्षातून केवळ 4 वेळा वेतन दिले जाते. त्यामुळे या पुढील काळात नियमित वेतन दिले जाणार आहे काय ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : नियमितपणे वेतन देण्याचा प्रयत्न करु.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : अपंगाच्या शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या

**मु. शी.** :अपंगाच्या शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी " अपंगाच्या शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, 2007 सालापासून अक्षरश: हे सर्व शिक्षक व कर्मचारी जेरीला आले आहेत. जिल्हा परिषदेकडून पुनर्वसनाविषयीच्या योजना परत घेण्याबाबत अजून कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यांच्या इतर 10 प्रमुख मागण्यांचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता असे निवेदनात म्हटले आहे. आता त्याची काय स्थिती आहे आणि त्याचा केव्हा निर्णय होऊ शकेल ? एवढा मोठा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे असे म्हटले आहे, पण प्रत्यक्षात अजून निधी मिळालेला नाही. म्हणूनच ते लोक उपोषणाला बसलेले आहेत. तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : अपंगांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचा मी स्वत: प्रयत्न केलेला आहे. अपंगांच्या वेगवेगळया मागण्यांच्या संदर्भात त्यांची धरणे, आंदोलने, मोर्चे सातत्याने होत आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन अपंग शाळांतील कर्मचा-यांना सर्व प्रकारच्या सोईसुविधा आणि सर्व प्रकारचे फायदे मिळावेत यासाठी मी स्वत: प्रयत्न केलेला आहे. हा धोरणात्मक निर्णय असून मी कॅबिनेट समोर 10 मागण्यांचा प्रस्ताव सादर केलेला होता. या संदर्भात शासकीय शाळा आणि खाजगी शाळा या मधील ज्या काही तफावती असतील त्या दूर करुन सुधारित प्रस्ताव कॅबिनेटसमोर सादर करावा अशा प्रकारच्या सूचना कॅबिनेटने केल्या. 4 तारखेला अपंग आयुक्त, वित्त विभागाचे सचिव, समाजकल्याण अधिकारी यांची एक संयुक्त बैठक होणार आहे. या तफावती दूर करुन येणा-या कॅबिनेटमध्ये या संदर्भातील प्रसताव आणून आणि तो संमत करुन घेऊन कर्मचा-यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : आज माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत या अपंग शाळातील कर्मचा-यांच्या शिष्टमंडळाची चर्चा सुरु आहे. आता देखील आझाद मैदानामध्ये बहिरे, आंधळे, अपंग उपोषणाला बसलेले आहेत. सायंकाळी 5.00 नंतर पोलीस त्यांना उपोषण करु देत नाहीत. नोव्हेंबरमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, "हे अधिवेशन संपताच मागण्यांच्या पूर्ततेबाबतचे आदेश निर्गमित केले जातील." फक्त 70लाख रु.चा प्रश्न आहे. शिक्षकांना सर्व काही दिलेले आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांना काही दिलेले नाही. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितल्याप्रमाणे मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांच्या मागण्यांच्या संदर्भातील निर्णय घेऊन त्याची त्वरित अंमलबजावणी करणार काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : याबाबतीत कॅबिनेटसमोर सुधारित प्रस्ताव आणून सर्व प्रकारच्या अपंग कर्मचा-यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. सभागृहामध्ये येण्यापूर्वी अपंगांच्या शिष्टमंडळाची सूचना मला मिळाली होती. अपंगांच्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांना सर्व प्रकारच्या योजनांचा लाभ देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.

----

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस एम्सच्या धर्तीवर मान्यता देण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव

**मु. शी**. : नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस एम्सच्या धर्तीवर मान्यता देण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर व पाशा पटेल वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर व पाशा पटेल, वि.प.स. यांनी "नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस एम्सच्या धर्तीवर मान्यता देण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : नागपूर मधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस एम्सच्या धर्तीवर मान्यता द्यावी अशी नागपूरच्या जनतेची मागणी आहे. मागच्या वेळी केन्द्र शासनाकडे दोन वेळा शिफारस करुन देखील या संस्थेस एम्सच्या धर्तीवर मान्यता देण्यात आली नाही. नागपूरमध्ये वैद्याकीय शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांचा कार्यक्रम होता त्यावेळी लोकांनी त्यांच्या समोर असंतोष व्यक्त केला. या संदर्भात केन्द्र शासनाकडे शिफारस केलेली आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. माझ्याकडे पुरावा आहे. 27 फेब्रुवारी 2008मध्ये लोकसभेमध्ये जी प्रश्नोत्तरे झाली त्यामध्ये चंद्रपूरचे खासदार श्री. हंसराज अहिर यांनी विचारलेल्या प्रश्नाला केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांनी असे उत्तर दिलेले आहे की, अजूनही अेम्सच्या धर्तीवर मान्यता मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव केन्द्र शासनाकडे प्राप्त झालेला नाही. आपण नागपूरच्या या संस्थेचा प्रस्ताव केन्द्राकडे का पाठवत नाही ? हा प्रस्ताव न पाठविण्याचे कारण काय आहे ? विदर्भावर आपण अशा प्रकारे का अन्याय करता ?

श्री. सुरेश शेट्टी : या विषयावर मागील दोन अधिवेशनामध्ये चर्चा झाली होती. 20 ऑक्टोबर 2007मध्ये केंद्रीय आरोग्य मंत्री श्री. अंबुमणी रामोदास हे एका कार्यक्रमासाठी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये आले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देखील त्या कार्यक्रमाला हजर होते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा उपस्थित होते तसेच या कार्यक्रमास मी देखील उपस्थित होतो. या कार्यक्रमामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच आम्ही तिघा मंत्र्यांनी श्री. अंबूमणी रामोदास यांना विनंती केली की, आपण 100 कोटी रुपये जे.जे.रुग्णालयासाठी दिले, त्याप्रमाणे नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी विशेष बाब म्हणून 100 कोटी रुपये देण्यात यावे.

श्री. नितीन गडकरी : कार्यक्रमात जी जाहीर भाषणे झाली त्या ठिकाणचा संदर्भ माननीय मंत्री महोदय या ठिकाणी देत आहेत.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या ठिकाणी पुराव्यासह बोलतो आहे. माननीय 20 तारखेच्या बैठकीत मुख्यमंत्री आणि आम्ही केंद्रीय आरोग्य मंत्री श्री. अंबूमणी रामोदास यांना विनंती केली आहे. त्या कार्यक्रमामध्ये श्री. अंबूमणी रामोदास यांनी सांगितले की, नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयास 100 कोटी रुपयांचा विशेष निधी देण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवतो आणि त्यास मंजुरी घेतो. त्यांनी त्या कार्यक्रमात अतिशय स्पष्टपणे स्टेटमेंट केले आहे. तत्कालिन अधिवेशनात देखील मी या संदर्भात होते, त्याप्रमाणे यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे या अनुषंगाने मी माननीय श्री. गडकरी साहेबांना माहिती देऊ इच्छितो. दिनांक 6 नोव्हेंबर, 2007 रोजी श्री. अंबूमणी रामोदाससाहेबांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रात नागपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासाठी विशेष बाब म्हणून 100 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत अशा प्रकारचे आपण जे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनाची पूर्तता करावी अशा प्रकारची विनंती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक 14 डिसेंबर, 2007 रोजी केंद्रीय आरोग्य मंत्री अंबूमणी रामोदास यांना पत्र लिहिले आहे. आम्ही केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी कोणकोणत्या दिवशी पत्र व्यवहार केलेला आहे, त्या पत्राच्या झेरॉक्स प्रती सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांना उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्याचप्रमाणे या विषयाच्या बाबतीत मी स्वत: तीन वेळा त्यांना भेटलो. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्री देखील त्यांना भेटले. एवढेच नव्हे तर गेल्या पंधरा दिवसापूर्वी मी स्वत: त्यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मुझे श्री. विलासराव मुत्तेमवार रोजाना मिलते हैं और मेरे पीछे लगे रहते हैं. 28 फरबरी 2008 को पत्र लिखा है उसमे लिखा है "However, based on

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

your request I have reviewed the matter and am considering the inclusion of Government Medical College, Nagpur for upgradation and you would be informed about its progress in due course of time."

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याकडे लोकसभेचे लेखी उत्तर आहे. त्या लेखी उत्तरामध्ये असे स्पष्टपणे लिहिले आहे की, " यासंबंधी कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडून केंद्र सरकारकडे आलेला नाही." सरकारमधील मंत्री म्हणून तुम्ही प्रत्येक कार्यक्रमात आश्वासने देतात. आश्वासन देण्यात तर राष्ट्रवादी कॉग्रेसमधील मंत्री तर अतिशय पटाईत आहेत. माननीय उप मुख्यमंत्री यांनी तर आश्वासने देण्यात रेकॉर्ड केलेले आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस आश्वासने देण्यामध्ये महान आहे. परंतु राष्ट्रवादी पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली आहेत, ती आश्वासने अजून त्यांच्याकडून पाळली गेली नाहीत. तर कार्यक्रमांमधील आश्वासने कशी पाळली जातील हा एक शंकेचा विषय आहे. राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याची एक पध्दत असते. नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस एम्स च्या धर्तीवर मान्यता मिळावी व त्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा अशी नागपुरकरांची अनेक दिवसापासूनची मागणी आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाच्या वेळी फार मोठ मोठी आश्वासने दिली आहेत. मी त्या स्टेजवर बसलो होतो आणि माझ्या बाजुला माननीय श्री.अनिल देशमुखसाहेब बसलेले होते. त्यांनी कोणकोणती आश्वासने कार्यक्रमाच्या ठिकाणी दिली आहेत, त्याची त्यांना देखील कल्पना आहे. त्यांनी त्या कार्यक्रमात मोठ मोठी आश्वासने दिली, परंतु त्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी एक नवा पैसा निधी अद्यापर्यंत उपलब्ध करुन दिलेला नाही. राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे अधिकृत प्रस्ताव कसा पाठविला जातो ही गोष्ट आपण आपल्या विभागाच्या सचिवांना विचारा. याबाबतीत राज्य सरकारकडून केंद्र सरकारला अधिकृत प्रस्ताव अद्याप पाठविला गेला नाही अशा प्रकारची लोकसभेची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. माझ्याकडे देखील केंद्रीय आरोग्य मंत्री श्री.अंबूमणी रामोदास यांचे तीन लेखी पत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. लोकसभेत खासदार श्री.हसंराज अहिर यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला होता, त्या प्रश्नाचे लेखी उत्तर माझ्याकडे उपलब्ध आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांकडे यासंदर्भातील लेखी पत्रे आहेत, ती पत्रे कृपया आमच्याकडे द्यावीत. आम्ही त्या पत्रांचा निश्चितपणे फॉलोअप करतो.

श्री. नितीन गडकरी : आजच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी खरे तर कॅबीनेट मंत्र्यांनी उपस्थित रहावयास पाहिजे होते. केंद्र सरकारकडे सतत पत्रे पाठवून उपयोग नाही. त्यांच्याकडे राज्यसरकारने प्रस्ताव पाठविला पाहिजे होता. प्रस्ताव पाठविण्याची देखील एक प्रोसीजर असते. या प्रश्नासंदर्भात दिल्ली येथे जा. आरोग्य विभागातील अधिका-यांना भेटा आणि रितसर प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला सादर केला पाहिजे. परंतु अद्याप तसा प्रस्ताव राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे आलेला नाही अशा प्रकारचे लेखी उत्तर लोकसभेत देण्यात आले आहे. त्यासंबंधी माझ्याकडे रेकॉर्ड उपलब्ध आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 13:40

श्री. नितीन गडकरी ....

केंद्र सरकारला कसा प्रस्ताव पाहिजे, कोणाकडून पाहिजे त्या प्रस्तावामध्ये काय लिहायचे याची चौकशी करा आणि त्यानुसार दिल्ली सरकारला प्रस्ताव पाठवा. पुढील वेळी तरी अशा प्रकारचे उत्तर शासनाकडून येऊ नये अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकार खरे बोलते किंवा राज्य सरकार खरे बोलते ते स्पष्ट होऊ द्या. केंद्र शासनाची 3/3 पत्रे आता माझ्याकडे आहेत. राज्य सरकार म्हणते आम्ही प्रस्ताव पाठविला. केंद्र शासनाकडून सांगण्यात येते की, राज्याकडून प्रस्ताव आलेला नाही. खरे कोण आहे ? मंत्रिमहोदयांनी दिल्लीला रेकॉर्ड घेऊन जावे. सोबत विभागाच्या सचिवांना बरोबर न्यावे. मंत्र्यांच्या सहीच्या पत्राला अर्थ नाही. मंत्रालयात खरा राजा अवर सचिव किंवा उप सचिव असतो. त्याच्यावर राज्य चालते. तुमचे सरकार सेक्रेटरी चालवितात. सुबोधकुमार वित्त सचिव हे उपमुख्यमंत्र्यांचे आणि मुख्यमंत्र्यांचे देखील ऐकत नाहीत. अर्थमंत्र्यांचे तर बिलकूल नाही. तेच राज्य चालवितात. सुबोधकुमार हा राजा. तुम्ही फक्त लालदिव्याच्या ॲम्बॅसिडर गाडया वापरा. शासनाने केंद्राकडे खात्याचे सचिव,डायरेक्टर पाठवावेत. त्यांनी प्रस्ताव कसा पाहिजे याची माहिती घ्यावी. हे अधिवेशन संपण्यापूर्वी केंद्र शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव पाठविला जाईल असे नि:संदिग्ध आश्वासन सरकार देईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, प्रधान सचिव(वैद्यकीय शिक्षण) यांनी केंद्र शासनाचे प्रधान सचिव(आरोग्य) यांना पत्र पाठविले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र लिहिले आहे. राज्यमंत्र्यांनी पत्र लिहिले आहे. केंद्र शासनाची मान्यता आल्यानंतर डिटेल प्रस्ताव सादर केला जाणार आहे.

**उपसभापती** : राज्य शासनाची प्रस्ताव पाठविण्याची तयारी आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, राज्य शासन एक वर्षापासून या प्रस्तावाचा पाठपुरावा करीत आहे. या प्रस्तावाला तत्वत: मान्यता दिलेली आहे. केंद्र शासन देशातील 3 हॉस्पीटलच्या अपग्रेडेशनसाठी पैसा देणार आहे. त्यातील एक महाराष्ट्रातील नागपूर येथील हॉस्पीटल आहे. नागपूरच्या हॉस्पीटलचे अपग्रेडेशनसाठी केंद्र शासन 100 कोटी आणि राज्य शासन 20 कोटी रुपये देणार आहे. सन्माननीय सदस्य एम्सच्या धर्तीवर रुग्णालय करणार आहे काय असा प्रश्न उपस्थित करीत आहेत. परंतु एम्सच्या धर्तीवर रुग्णालय करण्यासाठी 500 कोटी रुपये लागणार आहेत. कॅबिनेटने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर राज्य शासनाला कळविले जाईल आणि त्यानुसार राज्य

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 13:40

श्री. सुरेश शेट्टी..

शासन प्रस्ताव केंद्राला पाठवील. कॅबिनेटपुढे आधी प्रस्ताव मंजूर होणे आवश्यक आहे. तो पास झाल्यावर डिटेल प्रस्ताव राज्य शासन पाठवील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूरच्या रुग्णालयासाठी 100 कोटी केंद्र शासन आणि 20 कोटी राज्य शासन देणार आहे. केंद्राला विचारले पाहिजे की नेमके कोणत्या प्रस्तावासाठी पैसे देणार आहात. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, दोन्ही प्रस्ताव देऊन टाका. दिल्लीमध्ये महाराष्ट्र सदनात राज्याचे आयुक्त बसतात. त्यांना केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधण्यास सूचना द्याव्यात. ते केंद्राकडे विचारणा करतील की नेमका कोणता प्रस्ताव आणि कशा स्वरुपात पाठविणे आवश्यक आहे. मुळात प्रस्ताव जाणे आवश्यक आहे. घोषणा केली आणि पत्र दिले की टाळया वाजविण्याव्यतिरिक्त काहीच होत नाही. म्हणून प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे......

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र.5........... श्री.नितीन गडकरी...

मंत्र्यांच्या पत्राला प्रस्ताव म्हणत नाही. प्रधान सचिव किंवा संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडून रितसर प्रस्ताव सादर केला पाहिजे. सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : अशा प्रकारे हा मुद्दा मार्गी लागणार नाही. सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी पुढील दोन दिवसामध्ये सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्याशी एकत्रित चर्चा करावी. सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांना देखील चर्चेसाठी बोलवावे. या सभागृहात या प्रश्नावर किती काळ चर्चा करावयाची याला देखील मर्यादा आहेत.

श्री.नितीन गडकरी : लोकसभेमध्ये लेखी उत्तराद्वारे प्रस्ताव आलेला नाही असे म्हटले आहे.

श्री.सुरेश शेट्टी : केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी कन्सीडर करतो असे पत्राद्वारे कळविले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आपल्या दालनामध्ये या संदर्भात बैठक बोलवावी. चर्चेसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कॅबिनेट मंत्र्यांना बोलवावे. नागपूरवर सतत अन्याय होत आहे.

श्री.सुरेश शेट्टी : नागपूर हायकोर्टात एक जनहित याचिका दाखल झाली होती. त्यामुळे मुंबईसाठी 100 कोटी रुपये मिळणार होते, ते आता मिळतील की नाही अशी शंका निर्माण झाली आहे.

श्री.नितीन गडकरी : शासन जर आम्हाला खोटी आश्वासने देणार असाल तर बिलकूल मान्य होणार नाही. आम्हाला आश्वासन दिले आणि निधी दुसरीकडे डायव्हर्ट करीत आहात.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, दोन दिवसात या प्रश्नाबाबत मी माननीय मंत्रीमहोदयांशी चर्चा करुन आपल्याला माहिती देतो.

श्री.नितीन गडकरी : (बसून) सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये बैठक बोलवावी.

**उपसभापती** : होय.

---------

..2..

01-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V.2

SGB/ KGS/ MMP/ 13:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : व्हीजेटीआय, मुंबई या स्वायत्त संस्थेत घडलेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : व्हीजेटीआय, मुंबई या स्वायत्त संस्थेत घडलेला भ्रष्टाचार
याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनावणे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनावणे यांनी "व्हीजेटीआय, मुंबई या स्वायत्त संस्थेत घडलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, व्हीजेटीआय ही मुंबईतील एक नामवंत संस्था आहे. या संस्थेतील भ्रष्टाचाराबाबत चौकशी होणे व चर्चा होणे योग्य नाही. राज्य सरकारने नेमणूक केलेल्या प्राध्यापकांना राज्य सरकारच्या परवानगीशिवाय डायरेक्ट केंद्र सरकारने मान्य केलेल्या पदावर शिक्षक म्हणून नेमणूक देण्याचा प्रकार घडला आहे. या संदर्भात कोण जबाबदार आहेत? त्या अधिकाऱ्यांना अशा प्रकारचे अधिकार होते का? यापुढे वेगवेगळया शासकीय महाविद्यालयांना ॲकॅडमीक किंवा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्वायत्त दर्जा देत असताना ज्यांची सेवा पाहिजे तेथे घेऊन जाण्याचा प्रस्ताव देत आहात. अशा प्रकारचा स्वायत्त दर्जा देणे म्हणजे स्वैराचार आहे का? या संदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाविषयी तक्रार प्राप्त झाली आहे त्या तक्रारीची चौकशी किती दिवसात केली जाणार आहे? या संस्थेमध्ये काही घोटाळा झाला आहे का?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की, स्वायत्त दर्जा दिल्यानंतर काही काळात काही प्रोफेसर्सना पी.जी.साठी पाठविल्याने केंद्र सरकारचे अनुदान प्राप्त झाले. या प्रश्नाबाबत गेल्या अधिवेशनात चर्चा झाली होती. त्यानंतर शासनाने 21 मे, 2007 रोजी एक चौकशी समिती स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल 15-20 दिवसापूर्वी शासनास प्राप्त झाला आहे. पुढील 2-3 दिवसात तो अहवाल पटलावर ठेवण्यात येईल. मुंबई विद्यापीठाने एक चौकशी समिती स्थापन केली होती. त्या समितीच्या दोन बैठका व्हीजेटीआयमध्ये पार पडल्या. त्यांच्याशी आजच माझे बोलणे झाले आहे. आणखी एक बैठक होणार असून पुढील 15-20 दिवसात ती समिती विद्यापीठाला अहवाल सादर करणार आहे. शासनाने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो पुढील दोन-तीन दिवसात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यानंतर आवश्यकता वाटल्यास एकत्रित बसून चर्चा करु.

----

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : व्यवसाय शिक्षणात कालानुरुप बदल करताना अगोदरचे कोर्सेस बंद करणे

**मु. शी.** व्यवसाय शिक्षणात कालानुरुप बदल करताना अगोदरचे कोर्सेस बंद करणे याबाबत श्री कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी "व्यवसाय शिक्षणात कालानुरुप बदल करताना अगोदरचे कोर्सेस बंद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : महोदय, एनसीईआरटी आणि तंत्र व्यवसाय शिक्षणासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेत भरीव तरतूद केली असतांना तो निधी खेचून आणण्याऐवजी ते बंद करण्याकडे शासनाचा कल आहे आणि कालानुरुप बदल करुन नवीन अभ्यासक्रम सुरु करुन अगोदरचा अभ्यास बंद करण्याचा प्रयत्न होत आहे. जुने कोर्सेस बंद केले जाणार नाहीत आणि कालानुरुप बदल करुन ते सुरु करण्याबाबतची स्पष्ट ग्वाही मंत्री महोदय देतील काय ? आणि सहावा वेतन आयोग जाहीर झाला परंतु या शिक्षकांना अद्याप पाचवा वेतन आयोग सुध्दा हाती मिळाला नाही. त्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे भूतलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करावी व तो लागू करावा आणि सहावा वेतन आयोग ज्यावेळी उच्च माध्यमिक शिक्षण विभागालासुरु होईल त्याच दिवशी या विभागाला सुध्दा सुरु करावा. अशा दोन्ही गोष्टींची दखल शासन घेणार काय ? आणि उर्वरित प्रलंबित मागण्यांबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, केंद्रशासनाने यावर्षीपासून व्होकेशनल ट्रेनिंगसाठी भरीव अशी तरतूद केली आहे. परंतु आम्ही या विभागात सुरु असलेले असे कुठलेही कोर्सेस बंद करणार नाही तर उलट यावर्षी नवीन अर्ज मागवून त्यात नवीन कॉलेजेस, नवीन विभाग जेवढे पाहिजेत तेवढे देण्यास तयार आहोत.

श्री. कपिल पाटील : महोदय, शासन मान्यता देते परंतु ती विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित पध्दतीने द्यायला मागत आहे, नक्षलवादी एरियात ही......

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, नक्षलवादी भागात आम्ही दोन इन्स्टिटयूट टाय-अप केल्या आहेत. संपूर्ण राज्यात 600 च्या वर अर्ज प्राप्त झाले असून त्यांना देखील आम्ही मंजुरी देऊ. त्यानंतर यापुढील काळात व्होकेशनल ट्रेनिंग स्कूल व कॉलेजेसमध्ये देण्यात येईल. तसेच नवीन वेतनासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, आमच्या विभागाच्या वतीने तसा पॉझिटिव्ह प्रस्ताव करुन कॅबिनेटसमोर जाणार आहोत व लवकरात लवकर ते मंजूर करुन घेण्यात येईल.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी सिध्दबेट (आळंदी) येथे ज्ञानेश्वर महाराजांचे भव्य स्मारक बांधण्याबाबत.

**मु.शी.**: संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी सिध्दबेट (आळंदी) येथे ज्ञानेश्वर महाराजांचे भव्य स्मारक बांधण्याबाबत.

**उपसभापती** : उपरोक्त निवेदन क्र. 8 पुढे ढकलण्यात येत आहे.

-------------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : पीएमटी बसच्या धडकेने शालेय विद्यार्थी व वृध्दांच्या मृत्यूच्या प्रमाणात दिवसेदिवस होत असलेली वाढ

**मु. शी**. : पीएमटी बसच्या धडकेने शालेय विद्यार्थी व वृध्दांच्या मृत्यूच्या प्रमाणात दिवसेदिवस होत असलेली वाढ याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पीएमटी बसच्या धडकेने शालेय विद्यार्थी व वृध्दांच्या मृत्युच्या प्रमाणात दिवसेदिवस होत असलेली वाढ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

.......5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, पुणे शहरातील वाहतुकीच्य प्रश्नावर सातत्याने आम्ही सभागृहात निवेदन करीत असतो. यात अतिशय महत्वाचा भाग असा आहे की, छोटी-छोटी मुले शाळेत सायकलीवरुन जात असतांना पीएमटीच्या बसकडून उडविली जाणे आणि वृध्द नागरिकांचे मृत्यू ही दैनंदिन बाब झाली आहे. यासंदर्भात 11 उपाययोजना सूचविलेल्या आहेत, त्यात आमदारांची समिती देखील स्थापन झाली आहे. परंतु ज्या वेगाने ही वाहने जातात त्यांच्यावर नियंत्रण आणि वाहतुकीचे नियम पाळले न जाणे यामुळे या गोष्टी घडतात. मग त्यासाठी पोलिसांची संख्या वाढविणे, जे वॉर्डन नेमलेले आहेत त्यांना मदत करण्यासाठी म्हणून काही अधिकार या वॉर्डनना देणे असे उपाय देखील योजणे आवश्यक आहेत. पीएमटीचे ड्रायव्हर्स हा माझ्या माहितीप्रमाणे पुणे महापालिकेचा विषय असला तरी या बसेसवर जे ड्रायव्हर्स नेमण्यात येतात ते प्रामुख्याने कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे ते कोणालाही विचारीत नाही, त्यांना सस्पेंशनची भीती वाटत नाही. म्हणून वाहतूक पोलिसांनीच लक्ष घालून या ड्रायव्हर्सना शिस्त लावण्यासाठी खास कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. नाही तर दररोज "एक माणूस बसखाली चिरडला" अशा प्रकारच्या घटना घडतील आणि पेपरला आपल्याला वाचायला मिळेल, ही शरमेची बाब आहे. तसेच पुणे शहर हे प्रदुषणात तर दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे म्हणून यासंदर्भाम कॉंक्रीट अशा कोणती उपाययोजना करुन त्याची अंमलबजावणी करणार आहात ? अन्यथा दररोज हीच उत्तरे आपल्याला मिळतील. त्यात आमदारांची बैठक वगैरे घेतली हे ठीक आहे पण "दैनिक सकाळ" आणि "सामना" अशा अनेक वृत्तपत्रातून लोकांची जागृती वाढविण्याचे प्रयत्न केले जातात. म्हणून शासन अशी एखादी मोहीम हाती घेणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, पुणे शहरात वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे, हे बरोबर आहे. कारण पाच वर्षापूर्वी पुण्यात 10 लाख वाहने होती आता ही संख्या 20 लाखावर गेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ......

सभापती महोदय, पुण्यातील वाहनांची संख्या गेल्या 5 वर्षात 10 लाखावरुन 20 लाखावर गेलेली असल्यामुळे ट्रॅफिकची समस्या वाढलेली आहे. वाहतुकीची समस्या सुटावी यासाठी जजादा 300 ट्रॅफिक पोलिसांची पदे भरण्याच्या संदर्भात शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी पदपथावरील पुतळयांचा उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, पुतळयांमुळे अपघाताची संख्या वाढलेली आहे. या ठिकाणचा एक पुतळा हलविण्याच्या संदर्भात त्यांच्या नातेवाईकांनी विरोध केला असल्यामुळे तो पुतळा दुसरीकडे हलवण्यात आला नाही. पदपथावरील पुतळे इतरत्र हलविण्याच्या संदर्भात नागरिक आणि नगरसेवकांची बैठक घेण्यात आली असून त्या प्रमाणे पुतळे हलविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून आतापर्यंत 4-5 पुतळे हलविण्यात आलेले आहेत. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी पीएमटी वाहन चालकांना वाहने सुरक्षित चालविण्याच्या संदर्भात सूचना देण्यात याव्यात यासंदर्भात सूचना केलेली आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात जी सूचना केलेली आहे त्या प्रमाणे पीएमटी वाहन चालकांना सूचना देण्यात येतील.

**उपसभापती** : नियम 93 चे 8 वे निवेदन पुढे ढकलण्यात यावेत अशी सूचना माननीय सभापती महोदयांनी केलेली असल्यामुळे सदर निवेदन उद्या किंवा परवा घेण्यात येईल.

मी सन्माननीय गृहराज्य मंत्र्यांना विचारु इच्छितो की, सीआयडी रिपोर्ट आलेला आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सीआयडीचा रिपोर्ट डीजींकडे आलेला असून हा रिपोर्ट अद्यापपर्यंत शासनाकडे आलेला नाही.

**उपसभापती** : शासनाने सीआयडीचा अहवाल लवकरात लवकर मागवून घेण्यात यावा.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उच्च माध्यमिक विभाग व माध्यमिक विभागातील शिक्षकांतील वेतनश्रेण्यांमध्ये आढळून येत असलेली तफावत

**मु.शी.**: उच्च माध्यमिक विभाग व माध्यमिक विभागातील शिक्षकांतील वेतनश्रेण्यांमध्ये आढळून येत असलेली तफावत याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनावणे, श्रीकांत जोशी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनावणे, श्रीकांत जोशी यांनी "उच्च माध्यमिक विभाग व माध्यमिक विभागातील शिक्षकांतील वेतनश्रेण्यांमध्ये आढळून येत असलेली तफावत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील उच्च माध्यमिक विभागामध्ये काम करणा-या 42 हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. गेल्या 10 वर्षापूर्वी पाचवा वेतन आयोग आला होता आता सहावा वेतन आयोग आलेला आहे. पाचव्या वेतन आयोगाला आता 10 वर्षे उलटून गेलेली आहेत. 13 मे 1999 रोजी शासनाने पाचवा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात जी.आर. काढला होता. उच्च माध्यमिक शिक्षकांना विलंबाने पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला होता ही गोष्ट शासनाच्या लक्षात आली होती त्यामुळे शासनाने 3 जून, 2001 रोजी यासंदर्भात जी.आर. काढला होता. राज्यातील शासकीय कर्मचा-यांना 1 जानेवारी 1996 रोजी पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. परंतु 42 हजार उच्च माध्यमिक शिक्षकांना 1 मार्च 2000 पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. यासंदर्भात 4 मार्च 2000 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी सहयाद्री अतिथीगृहात बैठक घेतली व 42000 उच्च माध्यमिक शिक्षकांना 1.1.1996 पासून पाचवा वेतन आयोगाचा लाभ देण्याच्या संदर्भात सूचना दिल्या होत्या. तसेच उच्च माध्यमिक शिक्षकांनी केलेल्या 42 दिवसांच्या संपाचा कालावधीतील पगार विना अट देण्यात यावा असाही निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी घेता होता परंतु असे असतांनाही हा प्रश्न काही सुटला नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सहयाद्री अतिथी ग्रहात जो निर्णय घेतला त्या निर्णयाप्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षकांना 1.1.1996 पासून पाचवा वेतन आयोगाचा फायदा दिला जाईल काय तसेच या शिक्षकांनी जो 42 दिवसांचा संप केला होता त्या कालावधीतील पगार उच्च माध्यमिक शिक्षकांना विना अट दिला जाईल काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, 1 जानेवारी 1996 ला पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू केली आहे आणि या शिक्षकांना 1 मार्च 2000 पसून सदर वेतनश्रेणी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. याबाबत वित्त विभागाने सांगितले की, आता सहावा वित्त आयोग आलेला आहे आणि त्यामुळे 1996 पासून ही नवी वेतनश्रेणी यांना देऊ नये. त्यामुळेच त्यांना 1 मार्च 2000 पासून ही नवी वेतनश्रेणी दिली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, पण पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार नवीन वेतनश्रेणी राज्यातील सर्वच कर्मचाऱ्यांना 1.1.1996 पासून लागू केल्या असताना या 42 हजार शिक्षकांना मात्र नवीन वेतनश्रेणी 1 मार्च 2000 पासून लागू करणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे आहे ....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पण मंत्रिमंडळानेच याबाबत निर्णय घेतला की, 1 मार्च 2000 पासून नवी वेतनश्रेणी यांना द्यावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : पण इतरांना 1996 पासून पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू केल्या असताना यांनाच मार्च 2000 पासून का लागू केली आहे ? या शिक्षकांवर हा अन्याय आपण का केला आहे ? तो अन्याय आपण दूर करणार आहात का ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याच्या निर्णयामध्ये म्हणता आहात की, 1.1.1996 पासून या वेतनश्रेणी लागू केल्या आहेत आणि असे असताना या शिक्षकांना मार्च 2000 पासून आपण त्या देत आहात हे कसे काय ? हे बरोबर आहे काय ? हा त्यांच्यावर अन्याय आपण केला नाही काय ?

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मुळात पाचवा वेतन आयोग या उच्च माध्यमिक शिक्षकांना देताना, वेतनश्रेणी लागू करतानाच आपण चुकला होता आणि म्हणून ती चूक आपण लगेचच सुधारली पण म्हणून त्यांना आपण ही नवी वेतनश्रेणी मार्च 2000 पासून का देता आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे आणि याबाबत वित्त विभागाने सांगितले आहे की, आता सहावा वेतन आयोग आलेला आहे. तेव्हा ही वेतनश्रेणी दुरूस्त करण्याची गरज नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुळात आपण त्रुटी ठेवल्या आणि नंतर त्या दुरूस्त

..... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ...

केल्यानंतर ती सुधारित नवी वेतनश्रेणी लागू करताना आपण मार्च 2000 पासून लागू करण्याचा जी.आर. काढता आहात हेच मुळी चुकीचे आहे, अन्यायकारक आहे. 1996 पासून पाचवा वेतन आयोग देण्याचा निर्णय आपण घेतला आणि त्यावेळी तुमच्यामुळेच या लोकांना वेतनश्रेणी लागू करताना त्रुटी निर्माण झाली होती. ती सुधारल्यानंतर आता त्यांना ती सुधारित वेतनश्रेणी 1 जानेवारी 1996 पासून का देत नाही ? या 42 हजार शिक्षकांवर हा मोठा अन्याय आहे. त्यामुळे त्यांचा हजारो रूपयांचा लॉस होतो आहे. म्हणून शासनाने या शिक्षकांच्या बाबतीत सहानुभूती दाखवून त्यांना जानेवारी 1996 पासून पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी द्यावी. याबाबत कॅबिनेटचा निर्णय झाला असला तरी त्याचा फेरविचार कॅबिनेट करू शकते. तेव्हा तसे आपण करणार आहात का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या बाबतीत फेरविचारासाठी आपण पुन्हा मंत्रिमंडळापुढे जाऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पाचवा वेतन आयोग 1.1.1996 पासून सर्वांना लागू केला गेला आहे आणि त्यातील काही लोकांना 1.1.1996 पासून त्याचे पैसेदेखील मिळाले आहेत. केवळ या शिक्षकांच्या बाबतीतच वेगळा निर्णय घेऊन मार्च 2000 पासून ही वेतनश्रेणी लागू केली आहे हे अन्यायकारक नाही काय ? बेकायदेशीर नाही काय ? जो निर्णय एकदा लागू केला तो आपण पूर्ण केला पाहिजे. अशा प्रकारे एखाद्या घटकाबद्दल द्वेषबुद्धीने निर्णय आपण कृपया घेऊ नका. ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, आपण पुन्हा या संदर्भात लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे जाऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्र्यांचे हे उत्तर आम्हाला समाधानकारक वाटत नाही. या घटकावर सरकार अन्याय करीत आहे. त्यामुळे आम्ही याचा निषेध म्हणून सभात्याग करतो.

( विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतात. )

***

.... वाय 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मौ.उमरा अटाळी, ता.खामगाव,जिल्हा बुलढाणा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होणे.

**मु.शी.** : मौ.उमरा अटाळी, ता.खामगाव,जिल्हा बुलढाणा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर व श्री.जगदीश गुप्ता, वि.प.स., यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व श्री.जगदीश गुप्ता यांनी "मौ.उमरा अटाळी, ता.खामगाव,जिल्हा बुलढाणा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होणे." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

( यानंतर श्री. सरफरे ... झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी याठिकाणी निवेदनात काम व्यवस्थितपणे सुरु असल्याचे म्हटले आहे. परंतु तेथील जिल्हा परिषदेच्या माननीय सदस्यांनी दिलेले पत्र माझ्याजवळ आहे. ते मी आपणापुढे वाचून दाखवितो. "मौजे उमरा अटाळी, ता. खामगाव येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे अपूर्ण काम चालू असून काम निकृष्ट दर्जाचे आहे. कामावर लागणारी गिट्टी मजुराकडून फोडून वापरली जात आहे. सिमेंट कमी प्रमाणात वापरत आहेत. त्यानंतर संबंधित ज्युनिअर इंजिनिअर श्री. कुळकर्णी साहेबांच्या निदर्शनास सदर बाब आणून दिल्यानंतरही कॉंक्रिट भरतांना व्हायब्रेटर मशीनचा वापर करण्यात आला नाही. जुने काम डब्बरचे असून बाकी काम कॉंक्रीटचे करतांना लूज दगड काढलेली नाहीत. जुन्या कामामध्ये 4 ते 10 इंचापर्यंत बार उभे करुन वरील काम चालू आहे. बार हाताने काढले असता सहज हातात येतात. पिअरचे काम करतांना पिअर कॅप वापरल्या जात नाहीत. सदर काम बोगस होत असून ठेकेदाराला संबंधित ज्युनिअर इंजिनिअरचे अभय असल्यामुळे ठेकेदार अरेरावीच्या भाषेत कास्तकारासोबत वागत आहे."

सभापती महोदय, मी स्वत: या कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामावर जाऊन तेथील बार हाताने हलवून पाहिले आहेत. हे बार हाताने ओढून काढता येतात इतके कच्चे काम झाले आहे. त्यामुळे याठिकाणी अधिकाऱ्यांनी तयार करुन पाठविलेले उत्तर अतिशय चुकीचे आहे. आपण या अधिकाऱ्यांना कशासाठी पाठीशी घालत आहात हे समजत नाही? हा ठेकेदार सुध्दा स्वभावाने अतिशय मग्रूर आहे. गावातील लोक त्याला सांगावयास गेले असता,माझे कुणीही वाकडे करु शकत नाही अशाप्रकारच्या धमक्या देतो. तेव्हा या बंधाऱ्याची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून पूर्ण चौकशी करण्यात येईल काय? तोपर्यंत या कॉट्रॅक्टरचे बिल थांबवून ठेवणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या कामाला सन 1998-99 मध्ये सुरुवात झाली होती. या कामावर 1 लाख 40 हजार रुपये खर्च झाले. दगडी बंधाऱ्याचे जुने काम करण्यात आल्यानंतर नवीन कॉंक्रिटचे काम सुरु करण्यात आले. दोन्ही कामे एकत्रित करुन त्यामध्ये लोखंडी गज घालण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या तक्रारीनुसार या कामाची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून तपासणी करुन घेतली जाईल. तोपर्यंत ठेकेदाराचे बिल अदा केले जाणार नाही.

----

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य शासनाने सूतगिरण्याचे प्रस्ताव एन.सी.डी.सी.कडे न पाठविणे

**मु.शी.**: राज्य शासनाने सूतगिरण्याचे प्रस्ताव एन.सी.डी.सी.कडे न पाठविणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता यांनी "राज्य शासनाने सूतगिरण्याचे प्रस्ताव एन.सी.डी.सी.कडे न पाठविणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या राज्यात हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असतांना दुसऱ्या बाजूला या आत्महत्त्या थांबविण्याबाबत शासनामध्ये उदासीनता दिसून येते. केंद्र सरकारच्या एन.सी.डी.सी. ने महाराष्ट्रातील सूत गिरण्यांच्या विकासासाठी 500 कोटींचा निधी राखून ठेवला. वस्त्रोद्योग महामंडळाने 25 सूत गिरण्यांचे प्रस्ताव राज्य सरकारमार्फत केंद्र सरकारकडे पाठविण्याकरिता दिले असतांना ते गेली तीन वर्षे राज्य सरकारच्या फाईलींमध्ये धूळ खात पडले आहेत. आणि दुसरीकडे केंद्राकडून मिळणारा निधी घेण्यासाठी या शासनाला वेळ मिळत नाही. सभापती महोदय, मला शासनाकडून अशी माहिती पाहिजे की, केद्राने राज्यातील सूत गिरण्यांसाठी किती निधी राखीव ठेवला आहे? तो आतापर्यंत राज्य शासनाने कां घेतला नाही? गेल्या तीन वर्षापासून 25 सूतगिरण्यांचे प्रस्ताव आपण कां थांबविले आहेत? ते प्रस्ताव केव्हा पाठविणार आहात?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सूतगिरण्यांचे प्रस्ताव वस्त्रोद्योग संचालक, नागपूर यांच्याकडून पाठविण्यात येतात. आपण सांगत आहात त्याप्रमाणे राष्ट्रीय वस्त्रोद्योग विभागाकडून येत नाहीत. हे 2001 पूर्वीचे प्रस्ताव होते. 35 सूतगिरण्यांचे प्रस्ताव आठव्या पंचवार्षिक योजनेपूर्वीचे होते. आणि 21 प्रस्ताव आठव्या पंचवार्षिक योजनेतील होते. असे एकूण 66 प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविले होते. त्यापैकी 13 सूतगिरण्यांना मान्यता मिळाली, 10 सूतगिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी मान्यता मिळाली. 2001 पासून राज्य सरकारने उत्तरदायित्व म्हणून कर्जाची गॅरंटी स्वीकारण्याचे थांबविले होते. त्यामुळे पुढील काळात प्रस्ताव पाठविण्यात आले नाहीत. आता राज्य सरकारने नवीन वस्त्रोद्योग धोरणी स्वीकारण्याचे ठरविले आहे. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भासाठी डाईंग आणि तयार कपडयांच्या युनिटसाठी सूतगिरण्यांचा प्रस्ताव असून हा प्रस्ताव एन.सी.डी.सी. कडे पाठविण्याबाबत शिफारस करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : शिफारस करण्याचा प्रश्न नाही, आपण सभागृहाची दिशाभूल करीत आहात. मुळात केंद्र सरकारकडून, एन.सी.डी.सी. कडून येणारे पैसे आपण कां स्वीकारीत नाही? आपण त्याची गॅरंटी कां घेत नाही? आतापर्यंत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची आपण गॅरंटी घेणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

श्री.नितीन गडकरी . . . .

किंवा नवीन धोरणानुसार विदर्भ, मराठवाडयातील ज्या सूत गिरण्या आहेत, त्यांच्यासाठी गॅरंटी देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी मघाशी हेच सांगितले आहे की, 2001 पासून शासनाने गॅरंटी देण्याचे बंद केले होते. पण आता नवीन धोरण आखण्यात येत आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर जाऊन गॅरंटीसहित किंवा काही सूत गिरण्यांना एन.सी.डी.सी.डायरेक्ट फायनान्स करीत आहे. पण जे पात्र प्रस्ताव आहेत, त्यांची गॅरंटी घेऊन ते प्रस्ताव एन.सी.डी.सी. कडे पाठविणार आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एन.सी.डी.सी.शासनाच्या गॅरंटीशिवाय लोन देण्यास तयार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, एन.सी.डी.सी. नव्या सर्क्युलरप्रमाणे काही संस्थाना डायरेक्ट फायनान्स देत आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या गॅरंटीची सुध्दा गरज नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्र शासनाने आपल्याकडून प्रस्ताव मागितले होते. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एकंदर 66 प्रस्तावांपैकी 13 प्रस्ताव मंजूर झाले आहेत. माझा असा प्रश्न आहे की, या 13 प्रस्तावांसाठी किती निधी मंजूर केला आहे ? तसेच मुळामध्ये जे 66 प्रस्ताव पाठविण्यात आले होते, ते किती कोटी रुपयांचे होते ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, एकंदर 169 कोटी 17 लाख 06 हजार इतक्या रुपयांच्या 13 प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. 66 प्रस्तावांची किंमत किती होती ही माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो.

-----

. . . .2 ए-2



APR/MMP/ SBT/ 14:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यातील मौजे पालवण येथे चंदनाची करण्यात आलेली चोरी

मु. शी.: रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यातील मौजे पालवण येथे चंदनाची करण्यात आलेली चोरी यासंबंधी श्री.भास्कर जाधव वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

."रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यातील सावर्डे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे पालवण येथे दिनांक 7 मार्च 2008 रोजी चंदनाची चोरी पकडली जाणे, ही चोरी काही वर्षापासून होत असणे, त्याकरिता संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस यंत्रणा सी.आय.डी.ने सापळा रचून संबंधित चंदन चोरांना पकडण्यासाठी प्रयत्न करीत असणे, त्यामध्ये चोरांना पकडण्यात यश येणे, परंतु सदर चंदनाची प्रत्यक्ष खरेदी करणारे व्यापारी अथवा तस्कर यांच्यापर्यंत पोलीस सी.आय.डी.यंत्रणा न पोहोचणे, या प्रकारामुळे तपास यंत्रणा करणारे पोलीस व सी.आय.डी. अधिकारी यांच्याबाबत जनतेत पसरलेली नाराजी, चंदनासारख्या दुर्मिळ लाकडाची चोरी करुन विकणारे खरेदीदार यांच्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 ए-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जे उत्तर देण्यात आले आहे, त्याबाबतीत खऱ्या अर्थाने माझी हरकत आहे. याचे कारण आहे. ही लक्षवेधी सूचना विचारण्याचा जो मूळ हेतू आहे, तो आपण लक्षात घेतला पाहिजे. पोलिसांनी, सी.आय.डी.च्या लोकांनी एक महिना सापळा रचला आणि चंदनाची चोरी करणाऱ्या आरोपींना पकडले. परंतु चंदनाची चोरी केल्यानंतर ते कोणाला विकणार आहेत हे शोधता आले नाही काय ? याची माहिती मला या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून घ्यावयाची होती हा लक्षवेधी सूचना मांडण्यामागचा हेतू आहे. लक्षवेधी सूचना पाहिली तर असे दिसून येईल की,"परंतु सदर चंदनाची प्रत्यक्ष खरेदी करणारे व्यापारी अथवा तस्कर यांच्यापर्यंत पोलीस सी.आय.डी.यंत्रणा न पोहचणे अथवा पोहचले असून सुध्दा संबंधितांशी या यंत्रणेने हातमिळवणी करणे, या प्रकरामुळे तपास यंत्रणा करणारे पोलीस व सी.आय.डी.अधिकारी यांच्याबाबत जनतेत पसरलेली नाराजी" असे यामध्ये म्हटलेले आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेचा गाभा हा आहे आणि जे निवेदन देण्यात आलेले आहे, त्याबाबतीत यासंबंधी कुठेही उत्तर देण्यात आलेले नाही. किंबहुना ही लक्षवेधी सूचना दाखल झाल्यानंतर दि.5-3-2008 रोजी तीन आरोपी पकडण्यात आले आणि दि.29-3-2008 रोजी जमीन मालकाला पकडण्यात आले. म्हणजे लक्षवेधी सूचना दाखल झाल्यानंतर ज्याच्या जागेमध्ये हे झाड होते, त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, पोलिसांनी एक महिना सापळा लावल्यानंतर हे चंदन कोणाला देण्यात येणार आहे, याची माहिती असून सुध्दा, ज्याला चंदन दिले जाणार होते त्याला पकडण्यात आले नाही. म्हणून पोलीस या संबंधित व्यक्तिला पकडून कारवाई करणार आहात काय ? ज्या पोलिसांनी जाणीवपूर्वक चंदन खरेदी करणाऱ्या माणसाचे नाव उजेडामध्ये येऊ दिले नाही, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चंदन चोरीच्या संबंधात 5 तारखेला तीन आरोपींना पकडलेले आहे. जे शेतमालक आहेत, त्यांचे ते खाजगी शेत असले तरी सुध्दा त्यातील चंदन विकावयाचे असेल तर त्यासाठी वन विभागाची परवानगी घ्यावी लागते आणि त्यांनी तशी ती घेतली नव्हती म्हणून त्यांना 29 तारखेला अटक करण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, पोलिसांनी एक महिना सापळा रचला होता. पण पोलिसांना बातमीदाराकडून अशी कुणकुण लागली होती की, या ठिकाणी चंदनाची चोरटी आयात होणार आहे. म्हणून पोलिसांनीच चंदन घेण्यासाठी

. . . .2 ए-4



श्री.सिध्दाराम म्हेत्रे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक गिऱ्हाईक निर्माण केले आणि मग संबंधितांकडून चंदन मागून घेतले. आता सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधवसाहेबांनी सांगितले की, हे चंदन चोरीला जात होते. तर याबाबतीत जाणूनबुजून माहिती लपविण्यात आली असेल तर सर्व संबंधितांची परत एकदा चौकशी करण्यात येईल आणि जर एखाद्या मिलमध्ये वगैरे जात असेल तर त्या मिल मालकावर देखील कारवाई करण्यात येईल. तसेच पोलिसांनी जर काही चुकीचे काम केले असेल तर त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, पुन्हा एकदा चौकशी करण्यात येईल म्हणजे माझा प्रश्न त्यांच्या लक्षात आलेला आहे. ही बाब ग्रामीण भागातील आहे. तसेच माझ्या तालुक्यातील हा प्रकार आहे. जो माणूस चंदनाची चोरी करणार आहे, तो ते घरी आणून उगाळून देवाला लावण्यासाठी ही गोष्ट करीत नाही. तर तो माणूस ते चंदन कोणाला तरी विकणार आहे अशी बातमी लागली म्हणून पोलिसांनी सापळा लावला.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 14:15

श्री. भास्कर जाधव.......

पोलिसांना या संदर्भात बातमी मिळाल्यावर त्यांनी त्या ठिकाणी सापळा रचला. चोरांनी चोरलेले चंदन कोणाला विकले जाणार आहे याची माहिती तेथील पोलिसांना होती. ढोकवली या फाटयावर जेथे चंदनचोर पकडले होते तेथेच ते विकणार होते हे मी येथे सांगण्याची आवश्यकता नाही. हे सर्व पोलिसांना माहीत होते परंतु पोलिसांनी जाणीवपूर्वक चंदनचोराचे नाव लपविलेले आहे. ज्यांना चोरलेले चंदन विकले जाणार होते त्यांना व ज्या पोलिसांनी जाणीवपूर्वक नाव लपविलेले आहे अशा दोघांवरही कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या भागामध्ये चंदनाची झाडे अगदी नगण्य आहेत. साधारणपणे तीन वर्षापासून रत्नागिरी जिल्हयामध्ये चंदनाची झाडे चोरल्याच्या गुन्हयांची पोलीस स्टेशनमध्ये नोंद नाही. पोलिसांना बातमीदारांकडून कळले आहे. चंदन चोर शोधण्यासाठी त्या ठिकाणी पोलिसांनी एक बोगस गिऱ्हाईक तयार केले होते. सन्मानीनय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी हा विषय सभागृहात मांडला आहे. त्यामुळे या संदर्भात चौकशी करण्यात येईल तसेच ज्यांनी चंदनचोरांचे नाव उघड होऊ नये याकरिता प्रयत्न केलेले आहेत व ज्यांना हे चंदन विकले जाणार होते त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : यासंदर्भात मी आपणास एक आयडीया सांगतो. या गुन्हयाची तपासणी करण्याकरिता हा गुन्हा आपण पुणे ग्रामीण मध्ये रजिस्टर करावा. तेथे अगदी वासावर चोर पकडले जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्या अनुषंगाने मी काही प्रश्न विचारु इच्छितो. त्या ठिकाणी पोलिसांची चंदनचोर पकडण्याकरिता जो सापळा रचला होता, तो सापळा कोणत्या माहितीच्या आधारे लावण्यात आला होता ? तेथील किती चंदनाची झाडे तोडण्यात आली होती ? तसेच ही चोरी पूर्वीपासून सुरु आहे काय ? कोकणामध्ये अनेक ठिकाणी चंदनाची झाडे चोरली जात आहेत. त्यामुळे सर्व जंगल साफ होत आहे. खरे तर हा प्रश्न वन खात्याशी संबंधित आहे. परंतु पोलिसांची पुढाकार घेऊन कारवाई केलेली आहे त्या संबंधी सदनामध्ये माहिती उपलब्ध नसावी ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. खरे तर या संदर्भात चौकशी

....2....

श्री. मधुकर सरपोतदार .......

पूर्ण करुन संपूर्ण माहिती सदनासमोर येण्याची आवश्यकता होती. तशी माहिती समोर न आल्यामुळे, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी विचारलेला प्रश्न अनुत्तरीतच राहिला आहे. त्यांनी तळमळीने प्रश्न विचारला आहे परंतु त्यांना त्याचे उत्तर मिळालेले नाही. त्या संदर्भात माननीय उपसभापती यांनी एक सल्ला दिला आहे. त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, चंदनाला वास येत आहे हे खरे आहे.

**उपसभापती** : तेथील पोलीस वासावर बरोबर जातात असे माझे म्हणणे होते.

श्री. मधुकर सरपोतदार : हल्ली पोलिसांना वास येईनासा झालेला आहे. आता त्यांच्या कुत्र्यांना वास येतो. या ठिकाणी त्यांना ट्रेन करुन कोणी तरी पाठवावे. या संदर्भातील माहिती देण्यात यावी अशी मी शासनास विनंती करतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या ठिकाणी चंदनाची एकूण 3 झाडे तोडण्यात आलेली आहेत. ती झाडे खाजगी मालकीची होती. ही झाडे वन विभागाच्या क्षेत्रातील नव्हती. ही चंदनाची झाडे विकण्याकरिता तोडण्यात आलेली आहेत. ही बातमी पोलिसांना बातमीदारांकडूनच मिळाली होती. म्हणून पोलिसांनी सापळा रचून त्याना पकडले. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी देखील प्रश्न विचारले आहेत. या संबंधी पुन्हा चौकशी करण्यात येईल. तसेच या प्रकरणामध्ये जे पोलीस अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

..............

....3....



DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एस.टी. महामंडळाने मोक्याच्या ठिकाणच्या एस.टी. आगाराचे खाजगीकरण करण्यास केलेली सुरुवात

**मु. शी.** : एस.टी. महामंडळाने मोक्याच्या ठिकाणच्या एस.टी. आगाराचे खाजगीकरण करण्यास केलेली सुरुवात यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत,परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

गाव तेथे एस.टी. असे घोषवाक्य असलेल्या एस.टी. महामंडळाने राज्यातील मोक्याच्या ठिकाणच्या एस.टी. आगाराचे खाजगीकरण करण्यास केलेली सुरुवात, त्याचाच एक भाग म्हणून एस.टी. महामंडळाने राज्यातील बोरिवली, परेल, मुंबई, पाचगणी, रोहा, इंदापूर, कोल्हापूर, नाशिक, पेण, तुळजापूर, शाहगड (जालना) धुळयातील शहादा अकलूज आदी डेपोमध्ये रिलायन्स कंपनीचे मॉल्स सुरु करण्याच्या प्रस्तावाला दिलेली मंजुरी, सुमारे ९६९ बस डेपोमध्ये मॉल्स उभारले जाणार असणे, एस.टी. डेपोच्या मॉल्स विकासासाठी शासनाने काढलेल्या निविदा एस.टी. च्या खासगीकरणाचे नांदी असल्याने एस.टी. महामंडळाच्या हजारो कर्मचाऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट या व्यवहारांबाबत व्यक्त करण्यात येत असलेला संशय, या व्यवहारापासून एस.टी. ला सुमारे ७० कोटी रुपये मिळणार असून त्याचा वापर एस.टी. प्रवाशांना सुविधा देण्यासाठी करण्याची आवश्यकता, व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4...



श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एस.टी. महामंडळाने राज्याच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या आगारामध्ये विकास करण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. एस टी महामंडळ सध्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तोटयामध्ये आहे त्यामुळे या प्रकल्पामधून महामंडळास निधी उपलब्ध व्हावा व प्रवाशांना सोयी सुविधा मिळाव्यात अशी भूमिका त्या मागे आहे असे सांगण्यात येते. आतापर्यत 49 प्रोजेक्टस सुरु केलेले आहेत. या प्रोजेक्टस मधून एसटी महामंडळास किती निधी मिळालेलो आहे ? या 49 प्रोजेक्टसमध्ये, लातूर व बीडमधील माजलगाव व परभणीमधील वस्मत या ठिकाणी विकासकांनी जी कामे केलेली आहेत ती बेकायदेशीर असून त्याबाबत तक्रारी आपल्याकडे आलेल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

या ठिकाणी जी कामे विकासकाने केली ती बेकायदेशीर केली असून त्याच्या तक्रारी आपल्याकडे आलेल्या आहेत. त्याबाबत शासनाने काय कारवाई केली ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विकासकाकडून शासनाला जवळजवळ 39.30 कोटी रुपये मिळालेले आहेत. यामध्ये आपण 8 बस स्थानके बांधलेली आहेत त्यामध्ये आपल्याला 4.70 कोटी रुपये मिळालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी माजलगाव आणि इतर ठिकाणाची नावे सांगितलेली आहेत त्याबद्दल आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवावी.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आणखी थोडी अधिकची माहिती देतो. बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे एस. टी. महामंडळाने डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट न करता, त्या ठिकाणी बांधकामाची परवानगी नसताना सुध्दा बांधकाम केले. ते बांधकाम अवैध आहे. आपल्या स्टँडवर काम सुरु आहे. त्यावर शासनाने आजपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्याचे नोटिफिकेशन निघालेले नाही. लातूरमध्ये अंडरग्राऊंडला पार्किन्ग ठरवली. त्या ठिकाणी त्यांनी दुकाने काढली. पार्किन्गचा एफ.एस.आय. धरला जात नाही. आता दुकाने काढल्यामुळे तो एफ.एस.आय. धरला जावा. त्यातून एस.टी. महामंडळाला पैसे मिळाले पाहिजे. तेही पैसे त्यांनी दिलेले नाहीत. परभणी जिल्ह्यातील वसमत येथे बांधकामाच्या पूर्णत्वाचा दाखला न मिळता सुध्दा त्या ठिकाणी विकासकाने गाळ्यांची विक्री केली. अशी तीन प्रकरणे घडलेली आहेत. या तीनही प्रकरणातील जे कोणी विकासक आहेत त्यांच्यावर एस.टी. महामंडळ कारवाई करणार काय ? मोक्याच्या जागी दुकाने देताना धोरणात बदल करण्याची आवश्यकता आहे. मुंबई सेंट्रलचे उदाहरण द्यावयाचे झाले तर त्या ठिकाणी रस्त्याकडील जो भाग आहे तो निश्चितच फायदेशीर आहे आणि तो भाग विकासक मागतात परंतु मागची जागा तशीच राहते. कालांतराने ती जागा द्यावयास गेलो तर मातीमोलाने मागतात. म्हणून यासंदर्भात धोरणात्मक बदल करुन एस.टी. महामंडळाचा अधिक फायदा होईल अशा प्रकारचा बदल शासन करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपण टेंडर मागवतो त्यावेळी ज्यांचे जास्तीत जास्त रकमेचे टेंडर येते त्याला आपण काम देत असतो. आपण जवळजवळ 39 ठिकाणी काम सुरु

....2....

श्री. धर्मरावबाबा आत्राम .....

केलेले आहे. माझ्याकडे त्यासंबंधीचा जो तक्ता आहे त्यात सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या तीन जागांचा उल्लेख नाही. सन्माननीय सदस्यांनी ज्या तीन जागा सांगितल्या त्या या व्यतिरिक्त आहेत. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते खरे आहे असे गृहीत धरुन अशा प्रकारची कार्यवाही कोठे होत असेल तर त्याची चौकशी करु. माझ्याकडे जो तक्ता आहे त्यामध्ये जी 39 कामे आहेत त्यात पूर्ण झालेले प्रकल्प 15 आहेत. प्रगतिपथावर असलेली 12 कामे सुरु आहेत. विकासकांची नियुक्ती करण्यात आलेले प्रकल्प 11 आहेत. निविदा सादर केलेले प्रकल्प 4 आहेत आणि 7 प्रकल्पांच्या बाबतीत निविदा मागविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी तीन नावे सांगितली ती माझ्याकडे नाहीत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे असे समजून त्यासंदर्भात चौकशी करु.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझ्या आठवणीप्रमाणे बोरिवलीच्या डेपोच्या बाबतीत रिलायन्सच्या संदर्भात मी या ठिकाणी प्रश्न विचारला होता त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की, आम्ही रिलायन्सला जमीन दिलेली नाही. रिलायन्सला कोणत्याही प्रकारचे टेंडर किंवा कोटेशन न मागवता जमीन दिलेली होती त्याचे कारण काय ? बोरीवलीची जी जागा आहे त्यामध्ये एस.टी. महामंडळाची किती जागा आहे ? त्यापैकी रिलायन्सला किती जागा दिली आणि त्याची किंमत किती ? त्याच्या अगेंस्ट रिलायन्सने आपल्याला किती चौरस फूट बांधकाम करुन दिले आणि काय सुखसोयी उपलब्ध करुन दिल्या ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मागच्या वेळी जेव्हा बोरीवली डेपोचा प्रश्न आला होता त्यावेळी आपल्याकडे रिलायन्सचे चार टेंडर फार्म्स वेगवेगळ्या भागाकरिता आले होते. ज्यावेळी विधान परिषदेमध्ये चर्चा सुरु होती त्यावेळी आधीच आपण रिलायन्सला जमीन दिलेली होती. त्याचे 4 टेंडर होते. त्यापैकी 3 टेंडर शासनाकडे पेंडींग आहेत. बोरीवलीचे पहिले टेंडर दिलेले आहे. कारण त्यांनी सगळ्यात हायेस्ट टेंडर कोट केले होते. त्यामुळे बोरीवली येथील काम आपण त्यांना दिलेले आहे. 23 कोटी 1 लाख 22 हजार रुपये एवढी सगळ्यात जास्त रक्कम त्यांनी टेंडरमध्ये कोट केली होती. त्याच्या व्यतिरिक्त पाच इतर टेंडर आहेत. जे सेकंड लोएस्ट आहेत त्यांनी 12

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम ......

कोटी 58 लाख रुपये इतकी रक्कम कोट केलेली आहे. तिसरे जे आहेत त्यांनी 10 कोटी 25 लाख, चौथे जे आहेत त्यांनी 6 कोटी 11 लाख रुपये कोट केलेले आहेत. त्यानंतर 5 कोटी 12 लाख, 4 कोटी 51 लाख अशी रक्कम कोट करण्यात आलेली आहे. 23 कोटी ज्यांनी कोट केलेले आहेत ते हायेस्ट कोट असल्यामुळे आपण त्यांना ते काम दिलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नंदुरबार डेपोचे सुध्दा बीओटी तत्वावर काम करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? त्या कामाचे किती दिवसामध्ये टेंडर काढले जाणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : नंदुरबार डेपोचा विषय वेगळा असला तरी त्याबाबत चौकशी करुन माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : वसई तालुक्याच्या ग्रामीण भागात अकृषिक परवानगी न घेता बांधण्यात आलेले व प्रदुषण करणारे व सार्वजनिक आरोग्याला अपायकारक असलेले तबेले

**मु. शी.** : वसई तालुक्याच्या ग्रामीण भागात अकृषिक परवानगी न घेता बांधण्यात आलेले व प्रदुषण करणारे व सार्वजनिक आरोग्याला अपायकारक असलेले तबेले यासंबंधी सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जगदीश गुप्ता ( अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वसई (जिल्हा ठाणे) तालुक्याच्या ग्रामीण भागात अकृषिक परवानगी न घेता बांधण्यात आलेले तसेच प्रदुषण करणारे व सार्वजनिक आरोग्याला अपायकारक असलेले अनेक तबेले तहसिलदार, वसई यांनी दिनांक 21 व 22 जानेवारी 2008 रोजी तोडणे, तथापि, नालासोपारा शहराच्या भरवस्तीमधील मौजे मोरे येथील सर्व्हे नं. 162, हिस्सा नं. 6 पै. या जमिनीवर अकृषिक परवानगी न घेता बेकायदेशीरपणे बांधलेला व तेथील रहिवाश्यांच्या आरोग्याला उपद्रवकारक अशा 200 म्हशी असलेला तबेला "शेतीसाठी जोडधंदा" म्हणून बांधण्यात आल्याची सबब पुढे करुन तोडण्यास हेतुपुरस्सरपणे होणारी टाळाटाळ, या संबंधात चौकशी करुन तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची उपाययोजना." "

श्री.नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, वसई तालुक्याच्या ग्रामीण भागामधील लोकांना या तबेल्यांमुळे त्रास होतो त्यासंबंधी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तक्रार केल्यानंतर त्या लोकांना दिलासा मिळत नसल्यामुळे तो दिलासा मिळावा, तबेल्याच्या त्रासापासून लोकांना मुक्त करावे यासाठी शासन विशेष प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या परिसरामध्ये राहणारे नागरिक आहेत त्यांना तबेल्यांपासून त्रास होतो असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. लोकांना त्रास होऊ नये यासाठी काळजी घेणे हे सरकारचे काम आहे. या तबेल्यांमुळे प्रदुषण निर्माण होत आहे असा या लक्षवेधीतील दुसरा मुद्दा आहे. त्याठिकाणी तबेले किंवा शेतीशी निगडित असा व्यवसाय चालतो. अन्य कोणताही व्यवसाय चालत नाही. तेथे अशाप्रकारचा कोणताही त्रास नागरिकांना होत नाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अहवाल दिला आहे. परंतु ही बाब सन्माननीय सदस्यांनी नजरेस आणून दिलेले आहे. त्यामुळे नागरिकांना तसा त्रास होऊ नये याची काळजी घेण्याच्या दृष्टीने सरकार प्रयत्न करील.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा विषय दीड वर्षापासून मांडत आहोत. मागील अधिवेशनात सुध्दा हा विषय मांडला होता. तबेला हटाव संघर्ष समितीने आंदोलने, मोर्चा, रास्ता रोको अशा माध्यमातून विरोध प्रकट केलेला आहे. हे तबेले अनेक वर्षापासून तेथे आहेत. त्यापैकी 5 तबेल्यांवर कारवाई केलेली आहे. मागील वेळी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, बाकीच्या तबेल्यांनी स्टे घेतलेला आहे. ते उत्तर असत्य होते. कोणीही स्टे घेतलेला नाही. तेथील भूमिपुत्रांचे म्हणणे आहे की, या तबेल्यांमुळे त्रास होत असल्यामुळे आम्ही आंदोलने केलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे एकूण 67 तबेले आहेत. त्यापैकी 5 तबेल्यांवर कारवाई झाली आहे. बाकीच्या तबेल्यांवर कारवाई होणार आहे काय ? तसेच तेथे एन.ए.च्या नावाखाली मोठया प्रमाणात गोदामांची बांधकामे झालेली आहेत त्याची चौकशी करुन त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, 4 तबेल्यांबद्दल मौजे मोरे, ता.वसई, सर्व्हे नं.162/6 येथे असलेल्या अकृषिक जमिनीवर असलेल्या बांधलेल्या तबेल्यांसंबंधी ही लक्षवेधी विचारलेली

4...



NTK/ MMP/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

आहे. ही सर्व बांधकामे 1976 ची आहेत. 1989 मध्ये शेतीशी निगडित गोष्टींसाठी मग घर असो, गुरांचा गोठा असा त्याला एन.ए.पासून सूट दिली होती. त्यासाठी एन.ए.चा कायदा लावला जात नाही. त्या परिसरामध्ये अनेक तबेले आहेत, त्यामध्ये बेकायदेशीर तबेले असतील तर त्यासंबंधी परत एकदा चौकशी केली जाईल आणि चुकीच्या पध्दतीने झाले असेल, नियमबाहय काम झाले असेल तर त्याबाबत कारवाई केली जाईल.

------

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : खाजगी सुरक्षा रक्षकांच्या ठेकेदारांकडून होणा-या पिळवणुकीमुळे त्यांच्या कुटुंबियांना जगावे लागणारे हलाखीचे जीवन व त्यांची होणारी उपासमार

**मु. शी.** : खाजगी सुरक्षा रक्षकांच्या ठेकेदारांकडून होणा-या पिळवणुकीमुळे त्यांच्या कुटुंबियांना जगावे लागणारे हलाखीचे जीवन व त्यांची होणारी उपासमार यासंबंधी सर्वश्री एस.क्यू.जामा, संजय दत्त, गोविंदराव आदिक, जैनुद्दीन जव्हेरी, प्रकाश शेंडगे, प्रतापराव सोनवणे, रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सय्यद जामा ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम अस्तित्वात असताना अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी न होणे, परिणामी राज्यातील लाखो खाजगी सुरक्षा रक्षकांच्या ठेकेदारांकडून होणाऱ्या पिळवणुकीकडे झालेले दुर्लक्ष, खाजगी सुरक्षा रक्षकांना देण्यात येणारे वेतन व डयुटी यांच्यात असणारी प्रचंड तफावत, त्यामुळे खाजगी सुरक्षा रक्षकांना व त्यांच्या कुटूंबियांना जगावे लागणारे हलाखीचे जीवन व त्यांची होणारी उपासमार, ठेकेदारांच्या बेकायदेशीर व्यवसायांना आळा घालण्यास शासनास आलेले अपयश, मा.कामगार मंत्री यांचेकडे निवेदन देण्यात येऊनही याबाबतीत कोणतीच चौकशी वा कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये पसरलेला असंतोष व या प्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

6....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने जो जवाब दिया है वह लाजवाब नहीं है. महाराष्ट्र प्रगतिशील राज्य है. हिन्दुस्तान में महाराष्ट्र पहला राज्य है कि जिसने निजी सुरक्षा रक्षकों को संरक्षण देने के लिए " महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1981 " पारित किया है. इस कानून के तहत सर्वप्रथम मुंबई एवम् ठाणे जिले के लिए सुरक्षा रक्षक मंडल की स्थापना की गई और उसके बाद 2002 को और 5 जिलों में यह अधिनियम लागू किया गया. लेकिन यह अधिनियम लागू करने के बाद भी अब तक सिर्फ 2975 आस्थापना और 19365 सुरक्षा रक्षक पंजीकृत (रजिस्टर्ड) किए गए हैं. यह बहुत खेद की बात है कि आज 5 लाख सुरक्षा रक्षक में केवल 19 हजार सुरक्षा रक्षक ही पंजीकृत हुए हैं. इस संबंध में उच्च न्यायालय में एक याचिका भी दाखिल की गई है. उच्च न्यायालय ने आदेश दिया है कि पंजीकरण(रजिस्ट्रेशन) का काम पूरा किया जाए. लेकिन 6 महीने से पंजीकरण का काम रुका हुआ है. मुझे लगता है कि न्यायालय का आदेश न मानना न्यायालय की अवमानना है. इसलिए मैं यह पूछना चाहता हूं कि 5 लाख सुरक्षा रक्षकों का पंजीकरण करने में क्या दिक्कत है ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यामध्ये औद्योगिकीकरण वाढल्यानंतर त्या आस्थापनामध्ये खाजगी लोकांना सुरक्षा रक्षक म्हणून नेमण्यात आले. परंतु त्यांच्या कामाचे तास, वेतन, इतर फायदे याबाबतीत कोणत्याही प्रकारचा ताळतंत्र नव्हता. अशा सर्व घटकांना न्याय देण्याच्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. ए.आर.अंतुलेसाहेबांनी 1.11.1981 रोजी सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना केली. त्यावेळी कै. माधवराव भोसले यांनी देखील त्याबाबतीत नेतृत्व केले होते. हे सुरक्षा रक्षक मंडळ मुंबई आणि ठाणे परिसरामध्ये सुरु झाले. त्यानंतर दिनांक 5.12.2002 पासून या संदर्भातील अधिनियम नाशिक, नागपूर, पुणे, औरंगाबाद व रायगड या जिल्ह्यासाठी लागू करण्यात आला. माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. आज महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या माध्यमातून 5 लाख लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकला असता. सैनदल, वायूदल आणि नवदलातील निवृत्त अधिका-यांनी, आम्हाला अनुभव असल्यामुळे आम्ही खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी निर्माण करतो, अशा प्रकारची न्यायालयामध्ये भूमिका मांडली. त्यावेळी या खाजगी एजन्सी मार्फत सुरक्षा रक्षकांना दिले जाणारे वेतन हे सुरक्षा रक्षक मंडळाने दिलेल्या वेतनापेक्षा कमी असणार नाही, सोईसवलती जास्त दिल्या जातील अशी कमिटमेंट करण्यास न्यायालयाने सांगितले. अशा प्रकारची कमिटमेंट केल्यानंतर एका ठेकेदाराला त्याबाबतीत सूट देण्यात आली. परंतु शासनाच्या असे लक्षात आले की, एखाद्या एक्स, वाय कंपनीकरिता अशा प्रकारची परवानगी घेऊन अन्य 50 कंपन्यामध्ये हा घटक सुरक्षा रक्षकांना किमान वेतन देत नाही, प्रत्यक्षात दिले जाणारे वेतन हे व्हाऊचरवरील वेतनापेक्षा कमी असते. अशा सर्व परिस्थितीमधून या सुरक्षा रक्षकांची सुटका करण्याच्या अनुषंगाने मी स्वत: दिनांक 25.1.3006 रोजी बैठक घेतली आणि यापुढे कोणत्याही खाजगी ठेकेदाराने वेतन देताना ते क्रॉस चेकने द्यावे व्हाऊचर द्वारे पेमेंट देऊ नये असा निर्णय घेतला. दुसरी गोष्ट अशी आहे की, सुरक्षा रक्षक म्हटल्यानंतर त्यांच्या कॅरेक्टरचा प्रश्न येतो. म्हणून त्याबाबतीत नवीन नियमावली तयार केलेली आहे. प्रथम ज्यांची प्रकल्पासाठी जमीन गेलेली आहे आणि ज्यांच्याकडे शैक्षणिक अर्हता आहे, जे शारीरिकदृष्टया सक्षम आहेत त्या भूमिपूत्रांना प्रथम प्राधान्य देण्यात द्यावे, त्यांना स्वारस्य नसेल तर त्या गावातील, तालुक्यातील, जिल्हयातील आणि विभागातील लोकांना प्राधन्य देण्यात यावे. अशा प्रकारच्या सर्व लोकांनी त्या त्या पोलीस स्टेशनचे सर्टिफिकेट घ्यावे, अशी नियमावली तयार करण्यात आली.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला आहे की, सुरक्षा रक्षकांचे रजिस्ट्रेशन का करीत नाहीत ? ठेकेदारांना विविध प्रकारचे नियम आणि अटी धारण करण्यासंदर्भात फॉर्म दिलेला आहे. जे ठेकेदार फॉर्मची पूर्तता करीत नाहीत अशा ठेकेदारांचे अर्ज रद्द केले जातात. त्या फॉर्ममध्ये त्रुटी आहेत म्हणून ते फॉर्म परत पाठविले जातात. यासंदर्भात ठेकेदार न्यायालयात देखील गेले होते, परंतु त्यांची केस न्यायालयाने परत पाठविली आहे. सुरक्षा रक्षकांना आठ तास काम द्यावे, त्यांना डबल ओव्हर टाईम द्यावा, गणवेष देण्यात यावा, पी.एफ. देण्यात यावा अशा संदर्भात कमिटमेंट दिल्या असून सुरक्षा मंडळाने या अनुषंगाने भूमिका घेतलेली आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ या विभागातील अनेक जिल्हयातील जमिनी एम.आय.डी.सी. ने संपादित केल्या आहेत. तेथील स्थानिक रोजगारांना रोजगार मिळावा यासाठी प्रकल्पग्रस्ताचे जमीन संपादनाचे प्रमाणपत्र घेऊन, तसेच जिल्हा सेवायोजन कार्यालयात त्यांच्या नावाची नोंदणी करुन स्थानिक लेव्हलवर एम.आय.डी.सी.मध्ये सुरक्षा रक्षक म्हणून नेमले जावेत अशी देखील भूमिका शासनाने घेतलेली आहे. भविष्यकाळात सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत अडचणी येऊ नये म्हणून थोडे उशिरा का होईना चांगल्या प्रकारचे निर्णय घेतलेले आहेत. सुरक्षा रक्षकांचे प्रश्न सनदशीरमार्गाने सोडविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, 484 आस्थापनांची या कायद्याची अंमलबजावणी केली नाही. त्याच्यावरील खटले प्रलंबित आहेत. कायद्याचा धाक, कायद्याची भीती आस्थापनांच्या मालकांना राहिलेला नाही. यासंदर्भातील कायद्यातील दंड आणि शिक्षेची तरतूद अधिक करण्याची गरज आहे. सदरहू दंड आणि शिक्षेची तरतूद अधिक करण्यासंबंधीचा निर्णय सल्लागार समितीमध्ये झालेला आहे. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत करण्यात आली नाही त्याची कारणे काय आहेत व सदरहू निर्णयाची अंमलबजावणी या वर्ष अखेरपर्यंत करण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या कायद्याचे पालन केले नाही म्हणून 484 आस्थापनांविरुध्द खटले भरले आहेत. ज्या आस्थापना अशा प्रकारे सुरक्षा रक्षकांना फसवितात अशा आस्थापनांना भविष्यात रजिस्ट्रेशन दिले जाणार नाही. विविध कंपन्यांमध्ये सुरक्षा रक्षक कर्मचारी म्हणून महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळातर्फे पुरविले जातील. या ठिकाणी 19365 सुरक्षा रक्षक नोंदीत झालेले आहेत अशी माहिती देण्यात आली आहे . महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक पुरविले गेले तर ती संख्या लाखाच्या वर जाईल. त्यावेळी त्यास खरे कायदेशीर स्वरुप येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : महाराष्ट्रात सुरक्षा रक्षकासंबंधीचा कायदा हा अतिशय महत्वाचा आहे. या निवेदनाच्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, जमा होणा-या लेव्हीतून भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान, रजेचा पगार, भरपगारी रजा, कामगार विमा योजना, अपघात विमा योजना, मोफत गणवेष तसेच पादत्राणे पुरविण्याची तरतूद केली आहे. एवढी सुविधा सुरक्षा रक्षकांना दिली आहे याचा अर्थ ते सेवेत कायम आहेत, असे समजले जावे काय ? सुरक्षा रक्षकांना चेकने पगार देण्याबाबत शासनाने यापूर्वीच दखल घेतली असून तसे आदेश दिनांक 25...1.2006 रोजी पारीत केले असून सर्व मंडळांना तशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सुरक्षारक्षकांना व आस्थापनांना या कायद्याखाली सूट दिलेली असते. ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्यात अंमलबजावणीचे प्रमाण किती टक्के आहे ? शासनाने याबाबतीत सर्वेक्षण केले आहे, त्यात स्थानिक भूमिपुत्राचे प्रमाण किती आहे यासंबंधीची माहिती शासनाला आहे काय?

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4 पुढे सुरु...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, दोन प्रकारच्या सुरक्षा रक्षकांच्या एजन्सीज आहेत. एक म्हणजे सरकारकडे नोंद केलेल्या आणि दुसऱ्या म्हणजे खाजगी ठेकेदारांना शासनाने सवलत दिलेल्या एजन्सीज आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळामध्ये जे कामगार काम करतात त्यांना भविष्य निर्वाह निधी,रजेचा पगार,उपदान,सनुग्रह अनुदान,कामगार विमा योजना,मोफत गणवेष इ. सुविधा पुरविल्या जातात. किंबहुना आता कामगारांच्या गणवेषांची संख्या वाढविलेली आहे आणि ओव्हरटाईम डबल करण्याची कार्यवाही देखील शासनाने सुरु केलेली आहे. भविष्य काळामध्ये या लोकांच्या सर्व्हीस कंडीशन चांगल्या राहतील. राज्य शासनाकडे 19365 आस्थापनांची नोंदणी झ ालेली आहे. खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये 10 एजन्सीची नोंदणी झाली असेल तरी ते 100 कामगार घेतात. म्हणून कामगार खात्याचे उपायुक्त,सहाय्यक आयुक्त यांना सर्व सुरक्षा रक्षक एजन्सीचे सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे. याबाबतची माहिती आल्यावर ती सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकणामध्ये ज्या लोकांची जमीन जाते त्या भूमीपुत्रांना या सुरक्षा रक्षक मंडळामध्ये नोकरीसाठी ठेवले जात नाही. कोकणामध्ये भूमीपुत्रांना खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून ठेवण्यास तयार नसतात. 80 टक्के भूमिपुत्रांना नोकरीमध्ये सामावून घेतले पाहिजे असे कायद्याचे बंधन आहे. पण ते पाळले जात नाही. म्हणून कायद्यामध्ये योग्य तो बदल करुन टक्केवारीनुसार भूमीपुत्रांना सुरक्षा रक्षक म्हणून सामावून घेण्याबाबत शासन प्रयत्न करील काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, ज्यांची जमीन गेलेली आहे अशा घटकाला पहिल्यांदा सुरक्षा रक्षक म्हणून प्राधान्य दिले जाईल. त्याला नोकरी मिळण्याचा हक्क आहे. जमीन गेलेली आहे त्या गावामध्ये नसेल तर तालुका पातळीवर आणि तालुका पातळीवर नसेल तर जिल्हा पातळीवर सामावून घेतले जाईल. तेही होत नसेल तर विभागीय पातळीवर विचार केला जाईल. भूमीपुत्र आहे आणि जो लॅन्ड ॲफेक्टेड आहे त्याच्या हिताची जपणूक करण्याच्या दृष्टीने कायदे करणे ही शासनाची भूमिका आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, राज्यामध्ये 5 लाख सुरक्षा रक्षक आहेत अशी माहिती आहे. याबाबतची अधिकृत माहिती शासनाकडे नाही. यापैकी 19365 सुरक्षा रक्षक नोंदणीकृत

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे सुरु...

श्री. प्रकाश शेंडगे....

आहेत. या क्षेत्रात सुध्दा परप्रांतियांनी आक्रमण केलेले आहे. 1/2 टक्के भूमीपुत्र आणि 95 टक्के परप्रांतिय या आस्थापनांवर आहेत. खाजगी आस्थापनांना शासनाने सूट दिलेली आहे. सूट दिलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या किती आणि किती आस्थापनांना शासनाचे आदेश पाळले नाही म्हणून काळया यादीत टाकले आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे की, 2975 आस्थापनांनी शासनाकडे नोंद केलेली आहे. लार्ज स्केल, स्मॉल स्केल आणि मिडील स्केल सुरक्षा रक्षक दिलेल्या सवलतींचा गैरफायदा घेतात. 10 सुरक्षा रक्षकांची नोंद केली जाते आणि प्रत्यक्षात 100 सुरक्षा रक्षक कामावर असतात. म्हणून यातील त्रुटी निदर्शनास आल्यानंतर त्या चौकटबध्द करण्याच्या अनुषंगाने याबाबत सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत. गाव पातळीवर,तालुका पातळीवर,जिहा पातळीवर आणि विभागीय पातळीवर सर्वेक्षण करुन शासनाकडे अहवाल आल्यानंतर त्याअनुषंगाने आस्थापनांना चौकटबध्द केले जाईल. शासनाच्या सुरक्षा मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना जे वेतन दिले जाते ........

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गणेश नाईक............

ते वेतन खाजगी ठेकेदार देत असेल तर त्याला सवलत दिली जाईल. जे निकषाचे पालन करणार नाहीत त्यांना लायसन्स दिले जाणार नाही.

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, मंत्री महोदय ने बताया कि सेक्शन 23 के अन्तर्गत छूट देने का प्रावधान है. जो आस्थापना अपने निजी सुरक्षा रक्षकों को बोर्ड द्वारा निर्धारित वेतन और सुविधा से ज्यादा सुविधा और वेतन देते हैं, ऐसे आस्थापना को कुछ शर्तों के अधीन छूट दी जाती है. मेरा यह प्रश्न है कि जो सुरक्षा रक्षक है, क्या उनका डायरेक्ट रजिस्ट्रेशन किया जाएगा, जिन लोगों की जमीन एक्वायर की गई है, उनको नोकरी दी जाए लेकिन वर्तमान में जो अन्य सुरक्षा रक्षक काम कर रहे है, क्या उनको संरक्षण दिया जाएगा और उच्च न्यायालय के आदेश के अनुसार कितने दिनों के भीतर रजिस्ट्रेशन का काम पूरा किया जाएगा ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ज्या लोकांची जमीन गेली त्यांचे नाव प्रथम रजिस्टर केले जाईल. त्या गावाच्या, तालुक्याच्या, जिल्हयाच्या, डिव्हीजनच्या आणि राज्याच्या नागरिकांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. नंतरच अन्य लोकांना सामावून घेतले जाईल. ज्या घटकांनी कामगार राज्य सुरक्षा रक्षक मंडळाबाहेर ठेकेदारी करण्यास सूट मागितली आहे, त्यांनी निकषाचे पालन केले नाही तर त्यांची ठेकेदारी रद्द केली जाईल, किंबहुना त्यांच्यावर कारवाई केली जाईल. जे लोक कामावर आहेत त्यांना बाहेर काढले जाणार नाही. ज्यांचा संसार सुरु झाला आहे त्यांना अबाधित ठेवले जाईल. यापुढे ज्यांची जमीन जाईल त्यांच्या बाबतीत त्या गावाचा, तालुक्याचा, जिल्हयाचा, डिव्हीजनचा प्रथम विचार केला जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:45

**पृ. शी.** : मुंबई व पुणे विभागातील अनुदानावरील पाचवी ते सातवीच्या तुकड्यांना मागील तीन वर्षापासून अनुदान न मिळणे

**मु. शी.** : मुंबई व पुणे विभागातील अनुदानावरील पाचवी ते सातवीच्या तुकड्यांना मागील तीन वर्षापासून अनुदान न मिळणे यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, संजय दत्त, जैनुद्दीन जव्हेरी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई व पुणे विभागातील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या अनुदानावर येणाऱ्या तुकड्यांना गेल्या ३ वर्षापासून अनुदान न मिळणे, एकाच शाळेत शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांना फी भरुन शिक्षण घ्यावे लागणे, संस्थांना काही वर्ग अनुदानावर आल्यामुळे गेल्या ३ वर्षापासून शालेय फी न घेता येणे, शिक्षकांना पगार न मिळणे, शाळांना वेतनेतर अनुदान न मिळणे, शाळेमध्येच अनुदानित, विनाअनुदानित अशी विषम रचना अस्तित्वात येणे त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, संस्था व पालक यांच्यात निर्माण झालेला संताप व असंतोष. याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या दुसऱ्या परिच्छेदातील दुसऱ्या ओळीतील "पाच" या शब्दाऐवजी "पात्र" व "लवकरात लवकर" या शब्दाऐवजी "एक महिन्यात" असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : शाळा ज्यावेळी अनुदानावर येते त्यावेळी त्या शाळेतील सर्व तुकड्या अनुदानावर आल्या पाहिजेत. आठवी ते दहावीच्या तुकड्यांना अनुदान दिले जाते आणि पाचवी ते सातवीच्या तुकड्यांना विनाअनुदानित ठेवले जाते. त्या पात्र ठरलेल्या असताना सुध्दा त्यांचा विचार केलेला नाही. ज्या शाळा अनुदानासाठी पात्र ठरलेल्या आहेत त्या शाळातील पाचवी ते सावतीच्या तुकड्यांना देखील अनुदान देणार आहात काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही निरंतर व्यवस्था आहे.

श्री.कपिल पाटील : अनुदान शाळांना दिले जाते की तुकड्यांना दिले जाते? शाळा पात्र ठरल्यानंतर अनुदान देण्याची आवश्यकता आहे. आठव्या वर्षी अनुदान सुरु होते. ज्या शाळांना पाचवी ते दहावीसाठी मान्यता मिळाली आहे त्या शाळातील आठवी ते दहावीच्या तुकड्यांना अनुदान दिले जाते. पाचवीपासून अनुदान दिले पाहिजे. हा तुकड्यांचा मुद्दा नसून शाळांचा मुद्दा आहे. शाळांना अनुदान देत असल्यामुळे पूर्ण शाळेला अनुदान का दिले जात नाही?

श्री.हसन मुश्रीफ : पाचवी ते दहावीच्या 850 शाळांची यादी शासन घोषित करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडलेला मुद्दा तपासून पाहण्यात येईल आणि असे अनुदान राहिले असेल तर ते ताबडतोब दिले जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये दुरुस्ती केली त्याबद्दल अभिनंदन करतो. लवकरात लवकर ऐवजी एका महिन्यात यादी घोषित केली जाणार आहे. यामध्ये काही तुकड्या सुटल्या आहेत. कार्यालयीन व्यवस्थेमुळे हे घडले असले तरी याची काळजी घेतली पाहिजे. वेतनेतन अनुदानाचा प्रश्न आहे. राज्यातील पुणे आणि मुंबईतील शाळांचा हा प्रश्न असला तरी संपूर्ण राज्यात हा प्रश्न भेडसावत आहे. 31.3.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान दिले असे निवेदनात म्हटले आहे. अजूनही काही संस्थांना अनुदान द्यावयाचे शिल्लक आहे. हिवाळी अधिवेशनात शासनाने हे मान्य केले होते व एका महिन्याच्या आत अनुदान देण्याची व्यवस्था केली जाईल असे म्हटले होते. जे अनुदान द्यायचे आहे ते देण्याची व्यवस्था एक-दोन महिन्यात केली जाईल काय?

(नंतर श्री.खर्चे.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे ......

दुसरे म्हणजे या अनुदानाच्या संदर्भात उपसमिती नियुक्त केली आहे म्हणून यासंदर्भातील निर्णय आपण घेण्याऐवजी उपसमितीच्या माध्यमातून हा निर्णय एक दोन महिन्याच्या आत पॉझिटिव्ह घ्यावा, कारण अनुदानाशिवाय ग्रामीण भागातील शाळा चालू शकत नाहीत, हे आपण मान्य केले आहे. म्हणून एक दोन महिन्याच्या आत ही उपसमिती आपला पॉझिटिव्ह अहवाल सादर करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या काही तुकड्या अनुदानाच्या राहिलेल्या आहेत त्यांना अनुदान देण्याबाबत विचारणा केली आहे. त्यासंदर्भात निश्चितपणे तपासणी करुन अनुदान दिले जाईल. वेतनेत्तर अनुदान 31 मार्चपर्यंत देण्याचे आपण ठरविले होते तथापि काहीशाळा राहिलेल्या असतील त्यांनाही अनुदान देण्यात येईल. तसेच वेतनेत्तर अनुदान आपण बंद केले आहे व त्यासंदर्भात उपसमिती नेमलेली आहे. कारण त्यात काही चुका झालेल्या आहेत व त्यामध्ये सुसूत्रता यावी म्हणून माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, माननीय वित्त मंत्री, मा. शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके आणि मी एकत्र बसून चर्चा करण्यात येईल. परंतु माननीय मंत्री महोदयांना एक महिन्याच्या आतच बसून निर्णय घ्यावा असे आपण म्हणू शकत नाही, म्हणून लवकरात लवकर चर्चा करुन या उपसमितीचा अहवाल सादर करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : महोदय, या तुकड्यांना मान्यता देण्याच्या संदर्भात विचार केला तर साधारणत: अनुदानाच्या शाळांमध्ये विना अनुदानित तुकड्यांना अनुदान देताना विशेषत: पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना अनुदान मंजूर करतो. शाळा अनुदानास पात्र ठरविताना त्या शाळेचे मुल्यांकन करुन शाळा अनुदानास पात्र आहे की नाही याचाही अनुदान देताना विचार करतो. म्हणून अशा तुकड्यांना अनुदान मंजूर करतांना शाळेचे फक्त वय विचारात घ्यावे आणि नियमानुसार सातवीच्या वर्गाला जर 60 टक्के अनुदान मंजूर केले तर सहावी व पाचवीच्या वर्गांना अनुक्रमे 40 टक्के आणि 20 टक्के अनुदान मिळाले पाहिजे, परंतु तसे मिळत नाही. म्हणून त्यावर काय उपाययोजना करणार आहे?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, सातत्याने हा प्रश्न सभागृहात उपस्थित होतो. म्हणून यासंबंधी लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात येईल. तसेच शिक्षकांचे पगार देखील महिन्याच्या महिन्याला देण्याबाबत विचार करण्यात येईल.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप सोनवणे : महोदय, 1170 तुकड्यांना अनुदान देण्यात आले आणि 850 तुकड्यांना अनुदान देण्यात येईल, असे म्हटले आहे. परंतु नाशिक विभागातील धुळे जिल्ह्यातील एकाही तुकडीचा या अनुदान मंजूर केलेल्या तुकड्यांमध्ये समावेश नाही. त्यामुळे धुळे जिल्ह्यातील आणि नाशिक विभागातील अनेक तुकड्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर ज्या तुकड्यांना टप्प्याटप्प्याने अनुदान मंजूर केले आहे त्यांचा एक टप्पा मागे राहिलेला आहे. त्या शाळा अनुदानापासून कोणामुळे वंचित राहिल्या आहेत याची चौकशी शासन करणार काय ? तसेच त्या शाळा वेतनाच्या टप्प्यावर येण्याच्या संदर्भात शासन कार्यवाही करणार आहे काय ? त्याचप्रमाणे वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्या शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या असतील त्यात जळगाव जिल्हा नूतन मराठा ह्या संस्थेला सन 1995 पासून वेतनेत्तर अनुदान दिलेले नाही. त्यासंबसंधीची चौकशी करुन या संस्थेचे वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत तरतूद करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, ज्या तुकड्या किंवा शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या असतील त्यांची तपासणी करुन त्यांना अनुदान देण्यात येईल. तसेच वेतनेत्तर अनुदानाबाबतही तपासणी करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. **उपसभापती** : माझी सर्व शिक्षक आमदारांना नम्र विनंती आहे की, आपण कृपया पीन पॉईंट प्रश्न विचारावेत. 35 मिनिटांचा तास या ठिकाणीही झालाच पाहिजे काय? आता सन्माननीय सदस्य श्री. एम.एम.शेख यांनी प्रश्न विचारावा.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, ज्या तुकडयांना अनुदान देण्यात आलेले नाही त्यांना आम्ही जरुर अनुदान देऊ तसेच ज्या शाळांच्या तुकडयांचे व्हेरिफिकेशन किंवा इव्हॅल्यूएशन झाले नसेल तर ते लवकरात लवकर करण्यात येईल असे उत्तर दिल्यामुळे मी माननीय शिक्षणमंत्र्यांचे अभिनंदन करतो. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न हा अतिशय गंभीर आहे. अगोदर एका विद्यालयाचे भाडे 15 हजार रुपये होते ते आता भाडे आता चार रुमसाठी 7 हजार रुपये भाडे द्यावे लागते. भाडे वाढल्यामुळे 8 वर्ग 4 रुममध्ये चालवावे लागतात. शहरातील काही शाळा खोल्यांचे भाडे देऊ शकत नाही त्यामुळे संस्था चालक माध्यमिक शाळा स्लम एरियामध्ये शिफट् करीत आहेत परंतु स्लम एरियामध्ये विद्यार्थी मिळत नसल्यामुळे तुकडया कमी होतात व शिक्षकांची संख्या जास्त होते त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना दुस-या कोणत्या तरी शाळेत शिफट् व्हावे लागते. त्यामुळे 2004 पासून वेतनेतर अनुदान शासन देणार आहे की, कायमचे बंद करणार आहे याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 24.11.2001 रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीनुसार शासनाने वेतनेतर अनुदान देण्याचे बंद केले होते. वेतनेतर अनुदान बंद करण्याची त्यावेळची अनेक कारणे होती. त्यावेळी राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे कारण होते तसेच ज्या खाजगी शिक्षण संस्था आहेत त्यांच्याही काही जबाबदारी आहे की नाही अशी चर्चा मंत्रीमंडळाच्या मिटींग मध्ये झाली होती व त्यामुळे वेतनेतर अनुदान बंद करण्यात आले होते. या महामंडळाचे अध्यक्ष श्री. शेखावत हे माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले त्यावेळी अनेक प्रश्नावर चर्चा होऊन वेतनेतर अनुदानासाठी एक उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. खाजगी शाळांनाही वेतनेतर अनुदान दिले पाहिजे या मताशी आता शासन आलेले आहे. हे वेतनेतर अनुदान किती द्यावे,कसे द्यावे, कधी पासून द्यावे यासाठी उपसमिती नेमण्यात आली असून वेतनेतर अनुदान देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी जो मूळ प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, "ही बाब तपासून पाहू." माननीय मंत्रीमहोदयांनी कबूलही केले आहे की, ज्यावेळेस शाळा मान्यता मिळण्यास पात्र ठरतात तेव्हा त्या अनुदानास पात्र ठरत असतात. त्यामुळे या शाळांच्या पाचव्या इयत्तेपासून अनुदान दिले गेले पाहिजे. "हा प्रश्न तपासून बघण्यात येईल" असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. त्यामुळे "पुन्हा ये रे माझ्या मागल्या" असे होऊ नये म्हणून ज्या शाळा अनुदानावर आलेल्या आहेत त्यांना पाचवी पासून तात्काळ अनुदान सुरु करणार का? या विषयाच्या संदर्भातील निर्णय शासन हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर घेणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ज्या शाळांना अनुदान देण्याचे राहिले आहे त्यांना आम्ही अनुदान देणारच आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य या विषयाच्या संदर्भात पुन्हा पुन्हा प्रश्न विचारतात व त्या प्रश्नांना पुन्हा पुन्हा उत्तरे देण्याची आमच्यावर जबाबदारी येते. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासन विचार करीत असून सदस्यांना पुन्हा पुन्हा प्रश्न विचारण्याची आवश्यकता पडणार नाही याची काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा मला समजला असून ही बाब तपासून अनुदान देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : कोर्लाइ किल्ल्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधण्याबाबत

**मु. शी.** :कोर्लाइ किल्ल्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधणे याबाबत श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. अरविंद सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मुरुडला जातांना साळावचा पुल ओलांडला की त्याच्या उजव्या बाजूस कोर्लाइ किल्ला दिसतो. याच कोर्लाइ किल्ल्यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांनी मुरुड-जंजि-याची भेदक तटबंदी तोडण्याची मनसुबे आखले होते. मात्र या किल्ल्याकडे पुरातत्व खाते व पर्यटकांनी पाठ फिरवल्यामुळे या ठिकाणी फक्त किल्ल्यांचे भग्न अवशेष उरलेले आहेत. 487 वर्षापूर्वी म्हणजे 1521 मध्ये पोर्तुगिजांनी हा किल्ला बांधला होता. कोर्लाई किल्ल्याचा सेनापती डीएगु लोपीश डि सिल्वेरा हा होता. पूर्व-पश्चिम असणा-या नैसर्गिक डोंगरावर किल्ला उभारण्यासाठी पोर्तुगिजांनी मोठया कल्पकतेचा वापर केला होता. अरबी समुद्राच्या साळाव खाडी मुखापाशी जेथे कुंडलिका नदी समुद्राला मिळते त्या ठिकाणी बेटासारखा कोर्लाइ किल्ला उभा आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

त्या ठिकाणी एखाद्या बेटासारखा हा कोरलाई किल्ला उभा आहे. या किल्ल्याच्या नैसर्गिक पैलूंचा विचार केला असता हा किल्ला पर्यटकांचा केंद्र बिंदू ठरू शकतो. शिवाय रात्रीच्या वेळी पायथ्याशी चमचमणारे दीपगृह सौंदर्यात आणखीच भर पाडते. मात्र किल्ल्याकडे पुरातत्त्व विभागाने पाठ फिरविल्यामुळे या इतिहासाच्या साक्षीदाराचे मूकरूदन गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. किल्ल्याची बरीचशी तटबंदी अजूनही शाबूत आहे मात्र बुरूज उद्ध्वस्त झाल्याने काही ठिकाणी इमारती भग्नावस्थेत सापडतात. शिवाय हा परिसर म्हणजे पाळीव प्राण्यांसाठी एक प्रकारे गोठाच झाला आहे. इतिहासाचे दाखले देणारा व पर्यटनाच्यादृष्टीने महत्त्वाचे स्थान ठरणाऱ्या या कोरलाई किल्ल्याच्या विकासाकडे लक्ष दिल्यास पर्यटन विकासाला तर चालना मिळेलच पण स्थानिक बेरोजगारांना तात्पुरता रोजगारदेखील मिळेल यासाठी मी हा अतिशय जाणीवपूर्वक मुरूड-जंजिरा किल्ल्याकडे पर्यटक प्रचंड संख्येने जातो त्यांचेही लक्ष याकडे वेधावे यासाठी हा विशेष उल्लेख येथे मांडलेला आहे. यासाठी आपण मला अनुमती दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

****

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील क्रीडा अधिकारी यांना वर्ग 2, गट ब राजपत्रित दर्जा देऊन त्या प्रमाणे वेतनश्रेणी लागू करणे.

**मु.शी.** : क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील क्रीडा अधिकारी यांना वर्ग 2, गट ब राजपत्रित दर्जा देऊन त्या प्रमाणे वेतनश्रेणी लागू करणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते -

" क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत दिनांक 8.2.2004 आणि 8.11.2005 च्या पत्रान्वये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या 'क्रीडा अधिकारी' यांना वर्ग 2, गट ब राजपत्रित दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव क्रीडा विभागास सादर करण्यात आलेला आहे. शासनाच्या वतीने या प्रस्तावास मान्यता देण्यात विलंब होत आहे. या बाबतीत लोकप्रतिनिधी श्री.जयप्रकाश भोसले, श्री.अरूणभाई गुजराथी आणि मी स्वत: अनेक वेळा पाठपुरावा केलेला आहे पण तरीही अनेक महिन्यांपासून ही फाईल सचिवांच्या टेबलवर प्रलंबित आहेत. म्हणजे शासनाला ही बाब मान्य असूनही या बाबत निर्णय होण्यात विलंब होतो आहे हे बरोबर नाही. म्हणून क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या क्रीडा अधिकारी यांना वर्ग 2, गट ब राजपत्रिक दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करून त्यांच्यावर होत असलेला अन्याय ताबडतोब दूर करण्यासाठी म्हणून मी विशेष उल्लेखाद्वारा ही बाब येथे मांडत आहे. याबाबत शासनाने सहानुभूतीने विचार करून या क्रीडा अधिकाऱ्यांवर होत असलेला अन्याय दूर करावा ही विनंती.

***

..... केके 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : आशियाई स्पर्धेत 5 व राष्ट्रीय स्तरावर 7 सुवर्ण पदके प्राप्त केलेल्या क्रीडा पटूला शासनातर्फे निवासी सदनिका देण्याबाबत.

**मु.शी.** : आशियाई स्पर्धेत 5 व राष्ट्रीय स्तरावर 7 सुवर्ण पदके प्राप्त केलेल्या क्रीडा पटूला शासनातर्फे निवासी सदनिका देण्याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो -

" कुमारी सुषमा पाटील, मुक्काम भुये, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर ही सध्या कल्याण येथे शिक्षण घेत असून ती आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारात तिने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवास्पद कामगिरी केली आहे. आतापर्यात जागतिक व आशियाई स्तरावरील स्पर्धेत तिने एकूण 5 सुवर्ण पदके आणि राष्ट्रीय स्तरावर 7 सुवर्ण पदके पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारात प्राप्त केली आहेत. भारताची सर्वोत्कृष्ट खेळाडू हा किताब तिला दोन वेळा मिळालेला आहे. अशा या होतकरू महिला क्रीडापटूने शासनाच्या स्वेच्छाधिकारातील निवासी सदनिका मिळावी म्हणून शासनाकडे रितसर अर्ज केला आहे. सध्या तिला मुंबईमध्ये कोठेही राहण्यासाठी जागा नाही, ती कल्याण येथे आपल्या नातेवाईकांकडे राहत आहे. तेव्हा शासनाने तिच्या विनंतीची दखल घेऊन तिला निवासी सदनिका उपलब्ध करून द्यावी ही विनंती मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

***

..... केके 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सांगली शहरातील रूग्णालयातच्या डीन डॉ.कल्पना सुल्यान यांच्या विरोधात तेथील निवासी डॉक्टरांचा संप.

**मु.शी.** : सांगली शहरातील रूग्णालयातच्या डीन डॉ.कल्पना सुल्यान यांच्या विरोधात तेथील निवासी डॉक्टरांचा संप याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो -

" सांगली शहरातील सिव्हिल रूग्णालयातील डॉक्टरांनी सदर रूग्णालयाच्या डीन डॉ.कल्पना सुल्यान यांच्या विरोधात अनेक तक्रारी असल्यामुळे निवासी डॉक्टरांनी मार्डच्या सहाय्याने गेल्या तीन दिवसांपासून संप चालू करणे, सदर डॉक्टरांनी रूग्णालयाच्या दारातच आंदोलन सुरू करणे, या संपामुळे पूर्वीच उपचारार्थ दाखल झालेले रूग्ण व नवीन दाखल होणारे रूग्ण, यांचे अतिशय हाल होणे, तसेच रूग्णालयाची प्रशासकीय यंत्रणाही पूर्णपणे कोलमडली असून त्याचा फटका अतिदक्षता विभागाला व रूग्णांनाही बसला आहे. यामुळे रूग्णांचे नातेवाईक हतबल होऊन त्यांच्या मनात संतापाची लाट उसळणे, सदर परिस्थिती चिघळण्याची निर्माण झालेली शक्यता, सदर प्रकरणी शासनाने तातडीने संपाबाबत समेट घडवून आणण्याची व संप मिटेपर्यंत पर्यायी डॉक्टरांची व्यवस्था करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्त्वाचा व गंभीर स्वरूपाचा असून तो मी आज या सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडतो आहे. सभापती महोदय, या बाबतीत त्वरित मार्ग काढण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी या प्रसंगी विनंती करतो. "

***

( यानंतर श्री. सरफरे .... एलएल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जोगेश्वरी येथील मिल्लत स्कूलमधील जखमी मुलांच्या वैद्यकीय उपचाराकरिता करावयाची आर्थिक मदत

**मु.शी.**: जोगेश्वरी येथील मिल्लत स्कूलमधील जखमी मुलांच्या वैद्यकीय उपचाराकरिता करावयाची आर्थिक मदत याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"जोगेश्वरी येथील मिल्लत स्कूल मधील शाळेच्या मुलांची ने-आण करणाऱ्या मारुती व्हॅन मधील एल.पी.जी. सिलेंडरचा स्फोट होऊन झाल्ल्या अपघातात भाजून जखमी झालेल्या मुलांना भायखळा येथील मसीना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मसीना रुग्णालयात त्यांच्यावरील औषधोपचाराचा खर्च 22 लाखाहून अधिक झाल्याने रुग्णालय प्रशासनाने त्यांना बिलाची रक्कम त्वरीत भरा अन्यथा सायन हॉस्पिटल येथे हलविण्यात येईल अशी धमकी दि. 25 मार्च, 2008 रोजी वा त्या सुमारास दिल्याबाबतची बाब उघडकीस आली होती. या मुलांच्या कुटुंबियांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याकारणाने त्यांची आर्थिक कुचंबणा होत आहे. या प्रकरणाविषयी मा. उपमुख्यमंत्र्यांनी वेळीच सहानुभूतीपूर्वक भूमिका घेतली होती. मात्र प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की, जखमी मुलांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत शासनाने लक्ष घालून त्यांच्या वैद्यकीय उपचाराकरिता तातडीने आवश्यक ती आर्थिक मदत उपलब्ध करुन जखमी विद्यार्थ्यांना दिलासा देण्याची गरज आहे." या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मांडू इच्छितो.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.40 वाजता पुन: भरेल.

(3.07 ते 3.40 मध्यंतर)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:40

**(मध्यंतरानंतर)**

**सभापतीस्थानी -तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)**

सभागृहाच्या कामकाजाबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आता सभागृहासमोर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे, त्यावर अडीच तास चर्चा होणार आहे, म्हणजे ही चर्चा जवळजवळ सहा-साडेसहा वाजेपर्यंत चालणार आहे आणि आपण 6.00 वाजता सभागृहाचे कामकाज संपवितो. मग आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या विधेयकांच्या बाबतीत काय करणार ? असा प्रश्न आहे. मग ही विधेयके उद्या सकाळी घेण्यात येणार आहेत काय ? याबाबतीत निर्णय घ्यावा लागेल.

**तालिका सभापती** : आपण याबाबतीत नंतर निर्णय घेऊ. आता नियम 260 अन्वये चर्चेला सुरुवात करण्यात यावी.

. . . .2एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात झालेल्या अवेळी पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान

मु.शी.: राज्यात झालेल्या अवेळी पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी,सुरेशदादा देशमुख,श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे,सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील,जितेंद्र आव्हाड,प्रा.फौजिया खान,सर्वश्री लक्ष्मण जगताप,भास्कर जाधव,वसंत पवार,विक्रम काळे,राजेंद्र जैन,रमेश शेंडगे,सदाशिवराव पोळ यांचा प्रस्ताव.

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्याच्या कोकण,पश्चिम महाराष्ट्र,विदर्भ व मराठवाडा भागातील रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक,नगर,पुणे,सांगली,सातारा,औरंगाबाद,लातूर,परभणी,भंडारा,चंद्रपूर,यवतमाळ आणि वर्धा या जिल्ळयांमध्ये मोसम पूर्वी अवकाळी पावसाने थैमान घातल्याने तेथील द्राक्ष,कांदा,गहू,हरभरा,बेदाणा, बाजरी,ज्वारी तसेच कोकणातील आंबा,काजू,सूर्यफूल आणि मिरची इत्यादी पिकांचे कोट्यावधी रुपयांचे झालेले नुकसान, तसेच काही ठिकाणी विटभट्टीचे व घरांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होऊन काही ठिकाणी वीज पडून शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घडलेल्या घटना, आधीच सततची नापिकी व कर्जबाजारीपणा त्यातच अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या लाखो रुपयांच्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल होणे,बागायतीसाठी व पिकांसाठी वित्त संस्थांकडून घेतलेले कर्ज फेडण्यास असमर्थ झाल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त होणे,शेतकऱ्यांचे हातचे पीक वाया गेल्याने राज्यातील शेतकऱ्यांना शासनाने या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची तातडीने नुकसान भरपाई देऊन आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केल्यानंतर सर्वसाधारण शेतकरी आनंदोत्सव साजरा करीत असतानाच दुर्दैवाने महाराष्ट्रात अवेळी

. . . .2एम-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पाऊस सुरु झाला. त्यावेळी खूप मोठया प्रमाणात गारा पडल्या आणि आनंदोत्सव साजरा करणाऱ्या शेतकऱ्यांवर पुनश्च संकट कोसळले. राज्यामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा इ.ठिकाणी या पावसामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. अशा परिस्थितीत सर्वसामान्य शेतकऱ्यांना मदत करण्याची शासनाची सातत्याने भूमिका असते. परंतु शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हा होते, हा देखील एक संशोधनाचा विषय आहे. 2005-2006 मध्ये देखील अतिवृष्टी झाली होती. गारा पडल्या होत्या आणि त्यावेळी देखील राज्य शासनाने नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत महत्वाची भूमिका स्विकारली. परंतु खास बाब म्हणून जे काही निर्णय घेतले, त्यानुसार आजपर्यंत शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही हे शेतकऱ्यांचे दुदैव आहे. ज्यावेळी शासनाची भूमिका शेतकऱ्यांना मदत करण्याची आहे, त्यावेळी ही मदत त्यांना वेळेवर मिळाली पाहिजे याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे. आज नुकसान झाल्यानंतर जर दोन वर्षांनी मदत मिळत असेल तर मग शेतकऱ्यांच्या पदरामध्ये काहीच पडत नाही. मग तो दुर्दैवाने आत्महत्येसारख्या शेवटच्या टोकापर्यंत जातो. त्यामुळे राज्य शासनाने याबाबतीत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदया, राज्यामध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे कोकण,पश्चिम महाराष्ट्र,विदर्भ व मराठवाडा आणि इतर भागांमध्ये नुकसान झालेले आहे. यासंदर्भात मदत देण्याच्या बाबतीतील जे निकष आहेत, ते इंग्रजांच्या जमान्यातील आहेत आणि तेच आतापर्यंत पुढे सुरु आहेत. 2005-2006 मध्ये देखील शेतकऱ्यांवर अशाच प्रकारचा दुर्दैवी प्रसंग आला होता. त्यावेळी शासनाने खास बाब म्हणून आदेश काढले होते. मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, आता देखील तशाच प्रकारचे आदेश तात्काळ काढण्याची गरज आहे. या वेळी कृषी विभागाच्या माध्यमातून संयुक्त पंचनामे दाखल केले पाहिजेत. मागच्या वेळी कृषी विभागाने काही चुका केल्या आहेत, ज्यांचे 50 टक्क्याच्या वर नुकसान झालेले आहे अशाच लोकांच्या नुकसानीबाबत पंचनामे केले आहेत आणि ते देखील एखाद्याच्या घरामध्ये असून केले आहेत. कधी पंचाच्या घरामध्ये बसून पंचनामे केले आहेत तर कधी नेत्याच्या घरामध्ये बसून केले आहेत.अशा प्रकारे पंचनामे केल्यामुळे राजकीय वलय असणाऱ्यांना लवकर मदत मिळाली,पण जे गरीब शेतकरी होते,ज्यांच्या शेतातील पीक उद्ध्वस्त झालेले आहे असे शेतकरी मात्र मदतीपासून वंचित राहीले आहेत.महाराष्ट्रातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा असंख्य शेतकऱ्यांनी याबाबतीत तक्रारी केलेल्या आहेत. अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर असताना आपण कोणत्याही परिस्थितीत योग्य प्रकारे हे पंचनामे करुन घेतले पाहिजेत.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ KTG/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 15:45

श्री. नितीन गडकरीशेतकऱ्याचे नुकसान झाल्यावर करण्यात येणाऱ्या पंचनाम्यामध्ये, पारदर्शकता असली पाहिजे. पंचनाम्यामध्ये पारदर्शकता आणण्याकरिता ग्राम सभेच्या माध्यमातून चर्चा झाली पाहिजे. शेतातील पिकाचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्याला किती नुकसान भरपाई दिली जाणार आहे याची माहिती शेतकऱ्यास देखील कळणे आवश्यक आहे. या संदर्भात सन 2005-06 मध्ये शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्या नुसार द्राक्ष, केळी या सारख्या पिकाचे नुकसान झाल्यास हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. ऊसाचे गाळप होत नाही त्या करिता शेतकऱ्यास 5 हजार रुपये हेक्टरी मदत दिली जाते. अशा वेळी ज्या शेतकऱ्यांचे गारपीटीमुळे किंवा अतिवृष्टीमुळे शेतातील पिकाचे नुकसान झालेले आहे त्या शेतकऱ्यांना देखील शासनाने आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. पाचवसामुळे शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या संदर्भात पंचनामे करण्याचे आदेश शासनाकडून अद्यापि देण्यात आलेले नाहीत. दर वेळी शासनाचे आदेश आल्यानंतर खालच्या पातळीवरील अधिकारी व शासकीय यंत्रणा त्या संदर्भात कार्यवाही करीत असते. परंतु या वर्षी शासनाने आदेश न दिल्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळू शकलेली नाही. म्हणून या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, त्यांनी लवकरात लवकर आदेश काढून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी.

सभापती महोदय, शासनाने या पूर्वी एक निर्णय घेतला होता की, नैसर्गिक आपत्तीमुळे, नुकसानीची माहिती सॅटेलाईट मार्फत घेण्यात येणार आहे. सॅटेलाईट सर्व्हे झाल्यावर, त्याचा अहवाल प्राप्त होण्यास बराच अवधी लागण्याची शक्यता आहे. तसेच सॅटेलाईट सर्व्हे करीत असताना लहान शेतकऱ्याचे होणारे नुकसान देखील मोजले जाणार आहे किंवा नाही याबाबत शंका सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनामध्ये शंका आहे. म्हणून या माध्यमातून मी शासनाला विनंती करु इच्छितो की, सॅटेलाईट सर्व्हेपेक्षा आपल्याकडे मॅन पॉवर भरपूर आहे. काहा ठराविक ठिकाणी सॅटेलाईटमुळे सर्व्हे होऊ शकत नाही. त्यामुळे नुकसानीच्या संकटामधून शेतकऱ्याला सावरण्याकरिता नुकसानीचा जो सर्व्हे करण्यात येणार आहे त्यामध्ये मॅनपॉवरचा उपयोग केला तर त्याला नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळू शकते. हा सर्व्हे आपण सॅटेलाईटद्वारे केल्यास सर्व्हे कधी होईल, त्याचा अहवाल कधी प्राप्त होईल या बाबत शंका आहे. तसेच हा अहवाल उशीरा

...2...

श्री. चंद्रकांत रघुवंशी........

प्राप्त झाल्यास नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासही विलंब होण्याची शक्यता आहे. माननीय मत्री महोदयांना माझी विनंती आहे की, ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना लवकरात लवकर शासनाने आर्थिक मदत देऊन, दिलासा दिला पाहिजे.

सभापती महोदय, शासन कधीही शेतकऱ्यास 100 टक्के नुकसान भरपाई देत नाही व कोणताही शेतकरी संपूर्णपणे नुकसान भरपाईची अपेक्षा ठेवीत नाही. परंतु नुकसान झालेल्या रकमेपैकी जी अत्यल्प रक्कम शेतकऱ्याला दिली जाते ती तरी किमान वेळेत देण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे. तसेच ज्या भागामध्ये अतीवृष्टी झालेली आहे त्या भागातील शेतकऱ्यांना देखील शासनाने आर्थिक मदत द्यावी हे मी येथे पुनश्च सांगू इच्छितो.

सभापती महोदय, एखाद्या शेतकऱ्याचा वीज पडून मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना तहसीलदाराकडून तात्काळ मदत दिली जाते. वीजेमुळे नुकसान झाल्यास मदत मिळवून देण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे शेतकऱ्याच्या पिकाचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास त्याला मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यास खऱ्या अर्थाने शेतकरी राजा शासनास धन्यवाद देईल. या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न केले जातील अशी मला अपेक्षा आहे. सन 2005-06 मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार अद्यापी शेतकऱ्यांना मदत देण्यात आलेली नाही. राज्यातील पुनर्वसन खात्याचे मंत्री श्री. पतंगराव कदम आता सभागृहामध्ये उपस्थित आहेत. या शेतकऱ्यांना तात्काळ मदत केली जावी अशी त्यांना या माध्यमातून विनंती करीत आहे.

सभापती महोदय, राज्यात उद्‌भवणाऱ्या पूरपरिस्थितीसंदर्भात शासनाने काही निर्णय धेतले होते. तापी नदीला पूर आला होता याची आपणा सर्वांना माहिती असेलच. त्यावेळी तापी नदीच्या पुलावरुन बरेच पाणी वाहून गेले होते. जी गावे नदीच्या पात्राच्या लगत होती त्या गावांना या पुराचा फटका बसला होता. त्या वेळी या गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र या निर्णयाची अद्यापी अंमलबजावणी झालेली नाही. सन 1962-63 मध्ये आलेल्या पुरानंतर शासनाने नुनर्वसनासंदर्भात काही प्रस्ताव तयार केले होते. परंतु तेथील लोकांनी त्यावेळी हा प्रस्ताव नाकारला होता. परंतु आता तेथील लोक हा प्रस्ताव स्वीकारण्यास स्वतःहून तयार आहेत. त्यांनी देखील तसा प्रस्ताव शासनास दिलेला आहे. या गोरगरीब जनतेचे पुनर्वसन झाले पाहिजे.

...3....

अप्रसिद्धीसाठी प्रत / अप्रकाशित नाही



DVG/ KGS/ KTG/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 15:45

श्री. चंद्रकांत रघुवंशी.......

तेथील जनतेला चांगली घरे बांधून देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे परंतु या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे हेच खरे या राज्याचे दुःख आहे. सन 2006 आलेल्या पुरामध्ये जनतेला दिलासा देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ......

या अतिवृष्टीमुळे आणि गारपिटीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्या सर्व शेतकऱ्यांना हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर खास बाब म्हणून मदत द्यावी. मागच्या वेळी 2005-06 मध्ये हेक्टरी 10 हजार रुपये मदत दिली होती त्याच धर्तीवर हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना द्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी अडीच तासाच्या चर्चेचा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

राज्याच्या कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा भागातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नगर, पुणे, सांगली, सातारा, औरंगाबाद, लातूर, परभणी, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये मोसमपूर्व अवकाळी पावसाने थैमान घातल्याने तेथील द्राक्ष, कांदा, गहू, हरभरा, बेदाणा, बाजरी, ज्वारी तसेच कोकणातील आंबा, काजू, सूर्यफूल आणि मिरची इत्यादी पिकांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान तसेच काही ठिकाणी विटभट्टींचे व घरांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी ही अडीच तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, केंद्र शासनाने या देशातील शेतकऱ्यांचे 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आणि त्याचा परिणाम म्हणून या राज्यातील शेतकऱ्यांना 10 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना मदत होणार आहे. शासनाच्या माध्यमातून सहकार्य केले जाणार आहे. ही भूमिका केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने घेतल्यानंतर सर्वांना असे वाटत होते की, शेतकऱ्यांना लवकर मोबदला मिळेल. परंतु अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून ज्या मोसमामध्ये कधीही पाऊस पडत नाही त्यावेळी पाऊस पडला. कोकणामध्ये पाऊस यावयाचा झाला तर मे महिन्याच्या 15 तारखेपासून पाऊस पडतो हे आम्हाला माहीत आहे. परंतु कोकणात मार्च महिन्यामध्ये कधी पाऊस पडल्याचे पाहिलेले नाही. कोकणामध्ये आणि राज्याच्या निरनिराळ्या भागामध्ये दोन ते चार दिवस सातत्याने पाऊस पडत होता. जसा मृग नक्षत्रामध्ये पाऊस पडतो तसा भयानक पाऊस कोकणपट्टीत आणि राज्याच्या निरनिराळ्या भागामध्ये पडलेला आहे. त्यामुळे राज्याच्या निरनिराळ्या भागामध्ये शेतीचे नुकसान झाले. सांगलीमध्ये द्राक्षाचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. हरभरा असेल, अन्य कडधान्ये असतील त्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. ऐन हंगामात कोकणामध्ये आंबा आणि काजूचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या सातत्याने पडलेल्या पावसामुळे परिणाम होऊन आंब्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. नव्याने जो मोहोर आलेला होता तो गळून पडला. त्यामुळे आंबा आणि काजूचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.

यानंतर श्री. खंदारे....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

सभापती महोदय, कोकणामध्ये आणखी एका बाबीचे नुकसान झालेले आहे. तेथील वीट भट्टीचे नुकसान झालेले आहे. त्या लोकांनी वीट भाजण्यासाठी माती कालवून ठेवली होती, केवळ भट्टीत भाजण्याचे शिल्लक होते. पण नेमका त्याचवेळी पाऊस पडल्यामुळे ती मळलेली माती वाहून गेल्यामुळे लाखो रुपयांचे वीट भट्टयांचे काम करणा-या मजुरांचे किंवा पारंपरिक व्यवसाय करणा-या लोकांचे नुकसान झालेले आहे. शासनाने यापूर्वीही अनैसर्गिक आपत्तीमुळे शेतक-यांना नुकसान भरपाई दिलेली आहे. मग आंब्यासाठी दिली असेल, संत्र्यासाठी असेल, कापसाच्या पिकासाठी असेल. पण प्रत्येक वेळी शासनाने शेतक-यांना मदतीचा हात देण्याचे काम झालेले आहे. विदर्भामध्ये, कोकणामध्ये भाताचे पीक घेतले जाते. या धान उत्पादकांना, संत्रा उत्पादकांना सुध्दा शासनाने वेळोवेळी मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावेळी अवेळी पडलेल्या पावसामुळे तासगावमधील द्राक्षांचे, मनुक्याचे करोडो रुपयांचे रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत शासन नेमकी कोणती भूमिका घेणार आहे, आपद्ग्रस्तांना किती नुकसान भरपाई देणार आहे, हे सभागृहाच्या माध्यमातून शेतक-यांना समजले पाहिजे. या अवेळी पावसामुळे ज्या ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत करण्याची संपूर्ण सभागृहाची भावना आहे. ती अनाठायी ठरणार नाही. या अवेळी पडलेल्या पावसामुळे राज्यातील निरनिराळया भागातील शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यासाठी शासनाने नुकसान भरपाई दिली पाहिजे आणि खास करुन कोकणातील आंबा व काजुचे नुकसान झालेले आहे त्याबाबत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला पाहिजे. शासनाने हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत दिली पाहिजे, आवश्यक असेल तर त्याबाबत क्वांटम ठरवावा. पण नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी सर्वांची भूमिका आहे. कोकणात विशेष करुन सिंधुदुर्ग जिल्हयात वीट भट्टयांचे, शेतक-यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे, त्याबाबत पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. एकटया सावंतवाडी तालुक्यात 45 लाख रुपयांचे वीट भट्टयांचे नुकसान झालेले आहे. पावसामुळे विटांची माती वाहून गेली आहे. वीट भट्टी व्यवसायाला मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली पाहिजे आणि तशाप्रकारचा निर्णय घ्यावा अशी मागणी या प्रस्तावाच्या निमित्ताने करतो आणि सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करुन त्याला पाठिंबा देतो आणि येथेच थांबतो.

--------

2.....

श्री.श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, अवकाळी पडलेल्या पावसामुळे राज्यातील सर्व भागांमध्ये झालेले नुकसान यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावाच्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदया, नैसर्गिक आपत्ती ही काही सांगून येत नाही. त्याप्रमाणेच ती पहिल्यांदाच येत आहे असेही नाही. या राज्यात वर्षानुवर्षे अवकाळी पाऊस पडत आहे. शेतकऱ्यांना कधी अतिवृष्टी, कधी अवर्षण तर कधी दुष्काळाचा सामना करावा लागतो. अवकाळी पाऊस व वीज पडणे हे मराठवाडयासाठी नवीन नाही.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी पुढे सुरु...)

विजेमुळे झालेले शंभर पेक्षा जास्त मृत्यू यासंबंधीचा विषय मी या सदनामध्ये सातत्याने मांडलेला आहे. तेव्हा या प्रस्तावाच्या निमित्ताने काही प्रश्नांची निश्चित उत्तरे माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षित आहे.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावरील चर्चा संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सायंकाळी 6.00 वाजेपर्यन्त सभागृहाचे कामकाज करावयाचे, असे ठरलेले आहे. त्यामुळे सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यन्त वाढवावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदया, महसूल राज्यमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी या सभागृहाला आश्वासित केले होते. वीज पडून जे मृत्यू होतात ते टाळता येण्यासारखे आहे. वीज पडून शहरातील माणूस मेला किंवा तालुक्यातील माणूस मेला अशा प्रकारचे वृत्त आपल्या वाचण्यात येत नाही. परंतु ग्रामीण भागातील शेतातील शेतकरी किंवा महिला यांचाच वीज पडल्यामुळे मृत्यू होतो हे वारंवार निदर्शनास येते. मी सभागृहामध्ये विजेमुळे मृत्यू पावलेल्या 150 जणांची माहिती दिली होती. त्यातील बहुतेक घटना या गावामध्ये घडलेल्या होत्या. त्यामध्ये बीड, लातूर, नांदेड या परिसरातील वीज पडून माणसे मृत्यू पावलेल्याच्या घटना जास्त आहेत. ग्रामीण भागामध्ये वीज पडून होणारे मृत्यू हे टाळता येण्यासारखे आहेत. त्यासाठी वीज कॅच करणारी यंत्रणा ही जिल्हा परिषद सर्कलमध्ये उभी केली जाऊ शकते. आता सगळीकडे मोबाईल टावर्स, 133 के.व्ही.चे मोठमोठे टावर्स आहेत. वीज किती फुटावर तयार होते, ती किती अंतरावरुन कॅच केली जाऊ शकते, ही कॅच केलेली वीज माणसावर न पडता ती भूगर्भात कशी जाऊ शकते आणि तिचा विधायक वापर कसा करता येऊ शकतो यासंबंधी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये संशोधन केले पाहिजे आणि होणारी जिवित हानी वाचविली पाहिजे. म्हणून त्यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशा प्रकारची मागणी मी सातत्याने केलेली आहे. सभापती महोदया, मी सांगू इच्छितो की, या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी विधिमंडळामध्ये दिलेले आश्वासन हवेत विरुन गेले की ते

. .2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी....)

अरबी समुद्रात बुडाले की,मंत्रालयातील लाखो कागदामध्ये ते हरवून गेले हे मला माहीत नाही. परंतु आश्वासनपूर्तीच्याबाबतीत कोणतीही कार्यवाही अद्यापपावेतो झालेली नाही. माझ्या माहिती प्रमाणे राज्यामध्ये जवळ जवळ अडीच हजार वीजप्रवण गावे आहेत की ज्या गावामध्ये वीज पडून माणसे मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण अधिक आहे. ह्या घटना टाळता येऊ शकतात. काही ठिकाणी मोठमोठी मंदिरे आहेत, मोठमोठे टॉवर्स आहेत तेथे अशा प्रकारे वीज कॅच करणारी यंत्रणा उभी करता येऊ शकेल. तसेच 133 के.व्ही.लाईनचे जळाले मोठे टावर्स असतील तर ते मॉडिफाय करुन आकाशातील वीज कॅच करुन ती स्टोअर देखील करता येऊ शकेल. ह्या गोष्टी सरकारने प्राधान्याने करायवयास पाहिजेत. कारण राज्य हे वेल्फेअर स्टेट असते. म्हणून आकाशात तयार होणारी वीज ही माणसाच्या मृत्यूस कारणीभूत न ठरता ती रचनात्मक कामासाठी कशी वापरली जाईल यादृष्टीने कधीच प्रयत्न केला गेला नाही. निदान या प्रस्तावाच्या निमित्ताने तरी माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, या संदर्भात नीट अभ्यास करुन त्याचे डॉक्युमेंट विधिमंडळाला देऊ. वीज 20 हजार फुटाच्या खाली तयार होत नसते. ती त्याही पेक्षा जास्त अंतरावर तयार होते. ही वीज कशी निर्माण होते, ती कशी पडते या संबंधी वैज्ञानिक माहिती आज उपलब्ध आहे. तेव्हा मराठवाडा आणि विदर्भामध्ये विजेमुळे जी प्राणहानी होते ती टाळता येऊ शकेल. दुसरी गोष्ट अशी की, हा अवकाळी पाऊस येणे किंवा न येणे याला आपण जबाबदार आहोत काय हा प्रश्न आता नसला तरी ग्लोबल वॉर्मिंग आणि प्रदुषण या दोन कारणांमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चाललेला आहे अशा प्रकारची चर्चा सवगळीकडे होत आहे. वस्तुतः या ग्लोबल वॉर्मिंगला आपण जबाबदार आहोत काय ? तर झाडांची होणारी कत्तल, ग्रीन कव्हर या गोष्टींचा विचार केला तर ग्लोबल वॉर्मिंगसाठी आपण जबाबदार आहोत असे मला वाटते. म्हणून त्याबाबतीत नेमका विचार केला गेला पाहिजे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी ग्लोबल वॉर्मिंग इफेक्टच्या संदर्भात माहिती द्यावी.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 16:05

श्री.श्रीकांत जोशी....

महाराष्ट्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असे मघाशी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी बोलले. कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पाऊस पडला ही गोष्ट खरी आहे. कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची नेमकी कारणे काय आहेत याबाबतीत मला वाटते शासनाने याबाबतीत विश्लेषण केले पाहिजे. कमी दाबाचा झालेला पट्टा सध्याच्या सॅटेलाइट कम्युनिकेशनमध्ये शासनाच्या लक्षात आला होता काय ? आला असेल तर लोकांना माहिती देण्यासंबंधी, तसेच याबाबतीत दक्ष राहण्यासंबंधी शासनाने कशा प्रकारची प्रिकॉशन घेतली याबाबतीत शासनाकडून खुलासा होणे आवश्यक आहे. कारण एखादे संकट येते, त्यापूर्वी त्याची चाहूल लागत असते. राज्यात अशा पध्दतीचा अवकाळी पाऊस येण्याची शक्यता निर्माण झाली तर तो पाऊस किती सेंटीमीटरचा असेल हेही अलिकडच्या काळात ढगात असलेल्या पाण्याच्या क्षमतेनुसार, व्हॅाल्यूमनुसार माहिती मिळत असते. अलिकडचा पाऊस एवढा सेंटीमीटरचा आहे, तसेच तो पाऊस साधारणता अमूक अमूक जिल्हयामध्ये होईल, ही संपूर्ण माहिती उपलब्ध होऊ शकते आणि तशी माहिती राज्यातील जनतेला देणे हे शासनाचे आद्यकर्तव्य आहे. ही माहिती महसूल विभागाकडून जनतेला वेळीच दिली गेली पाहिजे. अवकाळी पावसाच्या बाबतीत पर्यावरण विभागाने काही काम केले आहे काय, केले असल्यास त्याबाबतची माहिती विधिमंडळ सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. जर पर्यावरण विभागाने यासंबंधी काहीही काम केले नसेल त्या विभागाचा उपयोग काय ? शासनातील आयएएस अधिका-यांना तसेच विभागाच्या सचिवांना 21 हजार कोटी रुपयांचा पगार देतो. महाराष्ट्रावर येणा-या संकटासंबंधीची चाहूलच आपल्याला लागत नसेल तर शासनातील नोकरशाही आणि प्रशासन नेमके काय काम करीत आहे हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या गोष्टीस जबाबदार कोण ? Who is answerable? यासंबंधीचे उत्तर आणि दायित्व कोणाकडे तरी असले पाहिजे असे माझे मत आहे. ही अवकाळी संकटे सहजगत्या येतात असे नाही. त्याच्या पाठिमागे निश्चितपणे काही ना काही वैज्ञानिक कारणे असतात. मला असे वाटते की, याबाबतला देखील तडा शासनाने लावला पाहिजे. किमान यापुढे तरी अशी संकटे या राज्यावर येणार नाहीत याची दक्षता शासनाने घेतली पाहिजेत. यापुढे तरी निदान रोजच्या रोज सॅटेलाईटवर यासंबंधीचा जो काही डाटा अॅनलाईज करण्याची यंत्रणा शासन लावणार आहे काय ? अशा पध्दतीने पाऊस

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

येणार असेल तर तो पाऊस मेजर करण्याची यंत्रणा लावण्यात येणार आहे काय ? ज्या विभागात अशा पध्दतीचा पाऊस पडण्याची शक्यता आहे तेथे वॉर्न करण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ? यासबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मागे राज्यात अतिवृष्टीमुळे महापुराची परिस्थिती निर्माण झाली होती, तसेच राज्यात भूकंपाची परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी मी सांगितले होते की, या गोष्टीस प्रथम जबाबदारी ही शासनाची आहे. अशा परिस्थितीत राज्यातील जनता संकटात असते, राज्यातील जनता अडचणीत असते अशा वेळी राज्यातील जनतेच्या पाठिशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत यासंबंधीची पहिली जबाबदारी शासनाची असते. जेव्हा जेव्हा अवकाळी पाऊस झाला, त्यात जे काही नुकसान होते त्याचे फिजिकली ॲक्सेस किमान 24 तासांच्या आत झाले पाहिजे. त्या नुकसानीचे डिलेटींग नंतर झाले तरी चालेल. परंतु राज्यात अवकाळी पाऊस पडला, तो पाऊस इतका इंच पडला, त्यामुळे एवढे नुकसान झाले आहे, द्राक्ष पिकाचे एवढे नुकसान झाले आहे, जनावरांचे एवढे नुकसान झाले आहे, वीट भट्टया, सिव्हील कन्स्ट्रक्शन, मोठ मोठया बांधकामांचे नुकसान झालेले आहे, शेतीचे आणि शेती व्यतिरिक्त नुकसान झालेले आहे, यासंबंधीची तातडीने ॲसेसमेंट करणे हे सेन्सीबल गर्व्हनमेंटचे पहिले काम आहे. मला असे वाटते् की, अशा परिस्थितीमध्ये शासनाने 24 तासाच्या आत या संपूर्ण नुकसानीची माहिती घेतली तरच शासनाला खरी माहिती मिळू शकते. आता अवकाळी पाऊस पडला आहे,त्यासंबंधी माननीय मंत्री महोदय, आदेश देतील की, आम्ही आठ दिवसात ॲसेसमेंट करु आणि जे काही नुकसान झाले असेल त्यासंबंधी नुकसान भरपाई देऊ. अवकाळी पाऊस येईल, त्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे यासंबंधीची माहिती सॅटेलाईटच्या माध्यमातून घेऊन जनतेला पूर्व कल्पना महसूल विभागाकडून का दिली नाही ? महसूल विभागाने याबाबतीत कोणत्याही प्रकारची खबरदारी का घेतली नाही ? यासबंधीचा खुलासा होणे आवश्यक आहे. माझी माननीय डॉ. पतंगराव कदम यांना विनंती आहे की, आपण महसूल विभाग आपल्याकडे का घेत नाही ? आपण महसूल विभागाचे काम आपल्याकडे घेतले तर कामांना गती येईल. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो की, "Action of the Government immediately after the disaster." नैसर्गिक आपत्ती नंतर उद्‌भवलेली परिस्थिती कशा प्रकारे हाताळते हा खरा महत्वाचा प्रश्न आहे...

यानंतर श्री. कानडे....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

सभापती महोदय, यामध्ये सरकारी यंत्रणेचे सुध्दा नुकसान होणार आहे. अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर्स जळालेले आहेत. संभाजीनगरमध्ये अकाली अकाली पाऊस सुरु झाल्यानंतर 12/15 ट्रान्सफॉर्मर जळाले. मी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना केली की वीज सप्लाय ताबडतोब बंद करा म्हणजे आणखी ट्रान्सफॉर्मर्स जळणार नाहीत. त्यांनी माझी सूचना स्वीकारली. अवेळी पाऊस पडणे हे तुमच्या-माझ्या हातात नाही. परंतु अर्धा तास जरी लाईट बंद केले तरी किती तरी नुकसान टळू शकेल. नैसर्गिक आपत्ती ही कोणाच्या हातात नाही. परंतु शासकीय यंत्रणा कशी आपद्ग्रस्तांच्या पाठीमागे उभी राहते हे महत्वाचे आहे. शासकीय यंत्रणा लोकांसमोर कशी वागते हे महत्वाचे आहे. नुकसानीचा अंदाज घेणे महत्वाचे आहे. नुकसान झालेल्या माणसामागे प्रेमाने उभे राहून वेगळा संदेश जाणे अतिशय महत्वाचे आहे. या अकाली पावसामुळे नुकसानीची जी आकडेवारी आहे ती लक्षात घेतली पाहिजे. अकाली पाऊस हा काही पहिल्यांदाच पडलेला नाही. नैसर्गिक संकटे ही काही पहिल्यांदाच आलेली नाहीत. परंतु आम्हांला यापरिस्थितीचा काही अनुभव नव्हता असे उत्तर शासनाकडून येता कामा नये. याविषयाबाबत शासनाची पूर्णपणे तयारी असणे आवश्यक आहे. ग्लोबल वॉर्मिंग हा काही 1/2 जिल्हयांचा प्रश्न नाही तर संपूर्ण जगाचा प्रश्न आहे. येणाऱ्या संकटाची आव्हाने लक्षात घेऊन सध्याची यंत्रणा तयार ठेऊन ती यंत्रणा संकटाचा कशा प्रकारे मुकाबला निर्माण करण्याची ताकद निर्माण करते हे महत्वाचे आहे. आरएसएसचे ज्येष्ठनेते श्री. प्रल्हादजी अभ्यंकर आम्हांला नेहमी आशिर्वाद देताना म्हणायचे की, तुझ्यावर संकटे येऊ नये असा आशिर्वाद मी काही देणार नाही परंतु आलेल्या संकटावर मात करण्याची ताकद तुझ यामध्ये येऊ दे असा आशिर्वाद ते देत असत. त्याप्रमाणे वैज्ञानिक,वैचारिक आणि बोध्दिक ताकद या राज्य शासनामध्ये येऊ दे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, मराठवाडयामध्ये विशेषत: द्राक्षाचे मोठे नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे गव्हाचे देखील नुकसान झालेले आहे. मराठवाडयामध्ये जिल्हयांमध्ये गव्हाचे पीक महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे उन्हाळी भुईमुगाचे देखील नुकसान झालेले आहे. यापेक्षा महत्वाचे म्हणचे छोटया-मोठया उद्योगांचे देखील नुकसान झालेले आहे. हे नुकसान फार मोठया प्रमाणावर झालेले आहे. त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे काळया मातीतील कामे एप्रिल-मे महिन्यापर्यंत संपवायची होती त्या कामांचे देखील मोठे नुकसान झालेले आहे. झालेल्या नुकसानाचे लवकरात लवकर

......2



श्री. श्रीकांत जोशी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲसेसमेंट होईल तेवढे चांगले होईल. नांदेडमध्ये गुरुदागद्दी सोहळयाची तयारी आहे. त्यामधील अनेक कामे चालू आहेत. त्यामधील रस्त्यांचे नुकसान झालेले आहे. त्यातील बरीचशी कामे निकाली काढलेली आहेत. याबाबतीत सरकारने सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. किमानपक्षी अशा पध्दतीने मदत करीत असताना जे खऱ्या अर्थाने दरिद्री नारायण आहेत, रोजच्या जीवनाची ज्यांना भ्रांत आहे त्यांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. वीज पडून मरणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेऊन त्याबाबतीत सुध्दा तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. तसे झाले तर किमान 100/200 लोकांचे प्राण वाचू शकतील. स्वयंसेवी संस्था, उद्योगपती आणि सहकारी साखर कारखाने या सर्वांची मदत शासनाने घेतली पाहिजे. वेलफेअर स्टेट म्हणून पुढे आले पाहिजे. चांगल्या कामासाठी सदैव पुढे राहू. परंतु मदतीच्या कामामध्ये गडबड होता कामा नये अशी अपेक्षा आहे. राजकीय विचार करुन मदतीचे वाटप होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. इंटरनेट आणि वेबसाईटच्या माध्यमातून मदत केली पाहिजे. राज्यामध्ये 2500 केऑस्क सेंटर्स निर्माण केली जाणार आहेत असे मुख्यमंत्र्यांनी वारंवार सांगितले आहे. त्याद्वारे ॲसेसमेंट करण्याचे अधिकार असले पाहिजेत. तसेच 24 तास वेबसाईटवर माहिती उपलब्ध असेल अशा पध्दतीची यंत्रणा उभी करावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम उत्तर देणार ओत त्यामुळे मला अधिक आशा आहे म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे. कर्जमाफीच्या निर्णयामध्ये त्यांची बरीच मेहनत होती हे सगळ्यांनाच माहिती आहे.

सभापती महोदया, अवकाळी पावसाने कोकणाला जो फटका बसला त्यामुळे प्रचंड हानी झाली आहे. आंबा पिकाचे नुकसान झाले, विटभट्टयांचे देखील नुकसान झाले. परंतु ठाणे जिल्हयाच्या प्रश्नांकडे शासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. चिकू, मिरची आणि नारळ या तीनही पिकांना सातत्याने 4-5 वर्षे फटका बसला असून उत्पन्नामध्ये घट होत आहे त्याकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, ही तीनही नगदी पिके आहेत. राज्याला उत्पन्न देणारी पिके आहेत. जो शेतकरी सरकारची कोणतीही मदत न घेता स्वत: उभा राहिला, वैभव उभे केले, तो शेतकरी जेव्हा संकटात सापडतो तेव्हा त्याला शासन काही मदत देत नाही. ठाणे जिल्हयातील किनारपट्टीवर मोठया प्रमाणात शेतकरी आहे, ठाणे जिल्हयातून मुंबई शहराला पाणी पुरवठा केला जातो, परंतु त्या जिल्हयातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना एक रुपयाचीही मदत दिली नाही. आंबा पिकाची नुकसानभरपाई म्हणून 15 हजार रुपयांची मदत जाहीर केली. डहाणू तालुक्यामध्ये फक्त एका शेतकऱ्याला मदत मिळाली आणि ती देखील फक्त 200 रुपयांची मदत दिली गेली. त्या पलिकडे कोणालाही मदत मिळाली नाही. भोपळी मिरची, चिकू आणि नारळ या तीनही पिकांना सातत्याने रोगाने पछाडले आहे. चिकू पिकावर अळींचा प्रादुर्भाव झाला. त्याबाबत विद्यापीठाने कोणतेही संशोधन केलेले नाही. बागाच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. शेतकऱ्यांनी बागा कापायला सुरुवात केली आहे. परंतु शासनाने एक रुपयाचीही मदत दिली नाही. मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे. अद्याप पंचनामे झालेले नाहीत. मिरचीचे उत्पादन घटले परंतु त्याचे पंचनामे झाले नाहीत. नारळ आक्रसले गेले. याबाबत अद्याप संशोधन झालेले नाही. कृषि विद्यापीठांना शासन पोसण्याचे काम करीत आहे. या तीनही पिकांच्या संदर्भातील नुकसानीचे पंचनामे करण्यात यावेत अशी मी विनंती करतो. मागील तीन-चार वर्षापासून जे नुकसान झाले आहे त्याची एकत्रित भरपाई देण्याची आवश्यकता आहे. कृषि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.........

चिकित्सा केंद्रे सुरु करण्याची आवश्यकता आहे. चिकू संशोधन केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. घोलवड येथे मोठया प्रमाणात चिकूचे उत्पादन होते. तेथे संशोधन करण्यासाठी कृषि चिकित्सालय सुरु करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी महत्वाचा मुद्दा मांडला आहे. राज्यातील शेती निसर्गावर अवलंबून आहे. निसर्ग धोका देतो त्यावेळी धावाधाव करावी लागते. आज शास्त्र खूप पुढे गेले आहे. नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना अगोदर येऊ शकते. विजा कधी पडणार आहेत याचा अंदाज करता येऊ शकतो एवढे शास्त्र पुढे गेले आहे. यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र विभाग सुरु करण्याची आवश्यकता आहे. हवामानाचा अंदाज वर्तवून मच्छिमारांनी केव्हा आपल्या होड्या समुद्रात नेऊ नयेत याची कल्पना दिली जाते. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना वेळापत्रक आखून दिले पाहिजे. पूर्वी नक्षत्रानुसार पेरणी, लावणी होत असे. आता शास्त्र खूप पुढे गेले आहे. निसर्गाच्या अवकृपेची पूर्वकल्पना देण्याची व्यवस्था सहज निर्माण करता येऊ शकते. यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची आवश्यकता आहे, तो विभाग सुरु करण्याची मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सभागृहासमोर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, नुकताच जो अवेळी पाऊस पडला आणि राज्यातील विविध भागांमध्ये शेतकऱ्यांच्या पिकाचे व फळबागांचे जे नुकसान झाले त्याकडे शासनाचे लक्ष वेधावे आणि शासनाने या शेतकऱ्यांना मदत द्यावी, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा या उद्देशानेच या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी आणि आम्ही सर्वांनी मिळून हा प्रस्ताव आणलेला आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये या अवेळी पडलेल्या पावसामुळे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. परंतु प्रामुख्याने या पावसामुळे फार मोठे नुकसान झाले ते कोकणातील पिकाचे आणि त्याबाबत शासनाचे लक्ष मी वेधणार आहे. हा सिझन म्हणजे कोकणातील आंबा पिकाचा, चिकुचा, फणसाचा आणि कोकमाचा सिझन अशा विविध फळांचा सिझन आहे. त्याचबरोबर याच काळात नारळ आणि पोफळी म्हणजेच सुपारीच्या फळांना अचानक पाऊस पडल्यामुळे त्याचे नुकसानही मोठया प्रमाणात झाले आहे. या ठिकाणी केवळ चर्चा करावयाची म्हणून नाही तर वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देण्याच्या उद्देशाने मी बोलत आहे. या ठिकाणी माननीय फलोत्पादन मंत्री सुध्दा उपस्थित आहेत. आम्हाला गेल्या दोन वर्षांत त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. गेल्या वेळी सुध्दा चर्चा करीत असतांना अतिशय अर्थपूर्ण चर्चा त्यांच्याकडून होते आणि ठामपणे ते आपले विचार मांडत असतात, दूरदृष्टी ठेवून, भविष्याचा वेध घेऊन ते बोलत असतात. ते बोलत असताना असे वाटते की, माननीय मंत्री महोदय भविष्यात काही तरी करतील असे गेल्या दोन वर्षात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटत होते पण का कोणास ठाऊक, त्यांचेही कोकणावरील प्रेम कमी झाल्यासारखे वाटते. यावर्षी कधी नव्हे इतकी थंडीची लाट संपूर्ण राज्यात व कोकणात आली होती. मुंबईत देखील थंडी चांगल्याच प्रकारे अनुभवायला मिळाली. त्याचा परिणाम असा झाला की, या थंडीमुळे कोकणात आंब्याला इतक्या मोठया प्रमाणात मोहोर लागला होता की, माझ्या वयाच्या 48 वर्षात आणि जुन्या-जाणत्या लोकांना विचारले ते सुध्दा म्हणतात की, गेल्या 50 वर्षातही एवढ्या मोठया प्रमाणात थंडीची लाट कधी आली नव्हती. या थंडीमुळे दोन वर्षाचे कलम असले तरी त्या कलमाला प्रचंड प्रमाणात मोहोर लागला होता म्हणून प्रत्येक कलमाला आधार द्यावा लागत होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री. भास्कर जाधव ........

हे पाहून असे वाटले होते की, कोकणात आंब्याचे पीक यावर्षी एक प्रकारे वरदानच ठरले आहे आणि ते खऱ्या अर्थाने कोकणातल्या लोकांच्या खिशात पैसा देईल, त्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करील. पण त्याच वेळी निसर्गाने घाला घातला आणि अचानकपणे तो मोहोर तर गळून गेलाच पण फलधारणा जेवढी झाली होती ती सुध्दा गळून गेली. म्हणून माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या पावसामुळे नुकसान झालेल्या सरकारी आकडेवारीवर आपण विसंबून न राहता स्वत: कोकणात येऊन किती नुकसान झाले त्याची खात्री करुन घ्यावी. काजूच्या पिकाचे सुध्दा वादळामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्याचा मोहोर खाली पडला. दुसऱ्या बाजूला पोफळीला कीड भरणार म्हणून सुपारी सूध्दा लागणार नाही. नारळाच्या फळात पाणी गेल्यामुळे त्यात बारीक कीड सुध्दा लागते. म्हणून नारळ सुध्दा चांगल्या प्रकारे मिळणार नाहीत. अर्थात आपण असे म्हणाल की, शासन प्रचलित नियमाप्रमाणे.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव......

शेतक-यांना मदत व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र शासन बी-बियाणे, खते यासाठी आर्थिक मदत करीत असते. कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, फणस इत्यादी पिके घेतली जात असतात. कोकणातील पीक एकदा नष्ट झाल्यावर कोकणातील शेतक-यांना तुम्ही खते, बी-बियाणे कितीही दिले तरी त्याचा उपयोग होऊ शकत नाही. भात शेतीची सुध्दा अशीच परिस्थिती आहे. भात शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून असते, भाताचे पीक हे 120 दिवसांचे असते. कमी पावसामुळे किंवा अतिवृष्टीमुळे भात शेतीचे नुकसान झाले तर भात शेती करणा-या शेतक-याला कितीही बी-बियाणे, खते दिली तरी त्याचा उपयोग होऊ शकत नाही. कोकणातील पिके ही सर्व हवामानावर अवलंबून आहेत. त्यामुळे कोकणामध्ये घेतल्या जाणा-या पिकांवर अभ्यास करण्याची ख-या अर्थाने गरज आहे. जोपर्यंत कोकणातील परिस्थितीचा, हवामानाचा, वातारणाचा विचार केला जाणार नाही तोपर्यंत कोकणातील शेतक-यांना त्यांचा काही उपयोग होऊ शकणार नाही. महाराष्ट्र राज्य निर्माण झ ााल्यापासून कोकणातील शेतक-यांना कधीही मदत करण्यात आली नाही असे माझे मत आहे. खरे म्हणजे भात पीक नगदी पिकात गणले जात नसल्यामुळे भात शेतीचे कितीही नुकसान झाले तरी कोकणातील शेतक-याला नुकसान भरपाई मिळत नाही. परंतु 1997-98 मध्ये कोकणातील आंबा पिकाचे नुकसान झाले होते त्यावेळेसच फक्त हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान भरपाई मिळाली होती. अशा प्रकारची नुकसान भरपाई यापूर्वी कधीही मिळाली नव्हती. त्यामुळे माझी शासनाला नम्र विनंती आहे की, या अवकाळी पावसामुळे कोकणातील फळ बागांचे अपरिमित नुकसान झालेले आहे त्यामुळे त्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले आहे की, अवकाळी पावसामुळे कोकणातील वीट भट्टयांचे अपरिमित नुकसान झालेले आहे. खरे म्हणजे कोकणामध्ये वीटभट्टीसाठी जी माती असते ती अतिशय ठिसूळ असल्यामुळे थोडे जरी पाणी विटेला लागले तरी वीट विरघळते. त्यामुळे अवेळी पावसामुळे कोकणातील वीटभट्टयांचे फार नुकसान झालेले आहे. या वीटभट्टयावाल्यांनी मातीची रॉयल्टी सुध्दा शासनाला भरलेली आहे. त्यामुळे त्यांनाही मदत मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, कोकणातील शेतकरी श्रीमंत आहे म्हणून कर्ज घेत नाही अशी परिस्थिती नाही. उलट कोकणामध्ये मोठया प्रमाणात गरिबी आहे, बेकारी आहे असे असतांनाही कोकणी माणूस कर्ज काढत नाही. कोकणामध्ये भूकंप येत असता, अवेळी पाऊस पडत असतो, वादळे येत

....2

श्री. भास्कर जाधव......

असतात, महापूर येत असतात असे असतांनाही कोकणी माणूस कधीही आत्महत्या करीत नाहीत. कोकणातील शेतक-याचे कितीही नुकसान झाले तरी कोकणातील शेतक-याला शासनाकडून मदत मिळत नाही, कोकणातील माणूस सर्व संकटांना धैर्याने तोंड देऊन आपली गुजराण करीत असतो. त्यामुळे शासनाने कोकणातील शेतक-यांना मोठया प्रमाणात मदत करण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील-मराठवाडयातील शेतक-यांच्या कापसाचे नुसाकन झाले होते त्यावेळी शासनाने या शेतक-यांना मोठया प्रमाणात आर्थिक मदत केली होती, ऊसाचे उत्पन्न मोठया प्रमाणात झाल्यामुळे ऊसाचे गाळप होऊ शकले नाही तेव्हाही शासनाने मोठया प्रमाणात ऊस उत्पादक शेतक-यांना मदत केली होती, ऊसाचे गाळप होऊ शकले नाही तेव्हा शासनाने हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत केली होती, ऊसाच्या वाहतूक ट्रान्सपोर्टमध्येही सबसीडी दिली होती. खरे म्हणजे महाराष्ट्र शासन हे शेतक-यांना मदत करणारे शासन आहे, ख-या अर्थाने शेतक-यांचे हे शासन आहे. त्यामुळे याच भावनने शासनाने कोकणातील शेतक-यांकडे पाहावे आणि त्यांना मदत करावी अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदया, कोकणामध्ये गरिबी नाही अशी परिस्थिती नाही असे असतांनाही कोकणातील शेतकरी कधीही आत्महत्या करीत नाही. त्यामुळे या चांगल्या गोष्टीचे अनुकरण संपूर्ण राज्यात व्हावे यासाठी चिंतन होण्याची आवश्यकता आहे. कोकणात मनीऑर्डर आल्याशिवाय चूल पेटली जात नसे अशी परिस्थिती होती. खरे म्हणजे ज्यावेळेस मुंबईतील गिरण्या बंद झाल्या तेव्हाच कोकणी माणूस देशोधडीला लागला होता, रस्त्यावर आला होता आणि आता कोकणातील शेतकरी अवेळी आलेल्या पावसामुळे देशोधडीला लागला आहे, उद्ध्वस्त झाला आहे. कोकणात गरीबी असतांना, अवेळी पाऊस आला असतांना, हवामानात फरक झाल्यामुळे शेतीचे नुकसान झाले तरी कोकणी माणूस कधीही आत्महत्या करीत नाही उलट कोकणातील माणूस सर्व संकटांशी तोंड देऊन निर्धाराने आपले जीवन जगत असतो त्यामुळे कोकणी माणसाचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्रात पोहचण्याची आवश्यकता आहे. संकटाला न घाबरता, संकटावर मात करणे हे कोकणी माणसाचे कसब आहे. कोकणातील माणसांवर कितीही संकटे आले तरी तो कधीही आत्महत्याचा विचार करीत नाही उलट तो संकटाला सामोरे जाऊन त्याला तोंड देत असतो.

यानंतर श्री. गायकवाड....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ..

तेव्हा हा विचारसुध्दा जोपासला पाहिजे, तो विचार वाढवला पाहिजे आणि त्या विचाराला बळकटी दिली पाहिजे. तेव्हा त्या प्रमाणे करावे अशी माझी शासनाला नम्र विनंती आहे.

सभापती महोदया, कोकणातील ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्या शेतक-यांना मदत देण्यात येणार आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी मागच्या वेळी असे सांगितले होते की, ज्यांच्या आंब्याच्या पिकाचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्यात येईल. ही नुकसान भरपाई देत असतांना सर्व्हे करण्यात आला होता . 50 टक्यापेक्षा कमी उत्पन्न आले आहे किंवा नाही याचा आढावा घेण्यात आला होता. 50 टक्यापेक्षा कमी उत्पन्न आले आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी कोणता आधार घेतला जातो ? या संदर्भात आमच्या बरोबर कधी तरी माननीय मंत्री महोदयांनी स्वतंत्रपणे चर्चा करण्याची आवश्यकता आहे. या संबंधी मी एक मुद्दा येथे मांडू इच्छितो. त्या संदर्भात आपण कृपया गैरसमज करुन घेऊ नका किंवा माझ्या बरोबर रागवू नका. मागच्या वेळी कोकण कृषी विद्यापीठामध्ये एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी आपण मुलभूत विचार मांडला होता. आपण खाजगी मिटींगमध्ये असे म्हणाला होता की, आम्ही शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये नुकसानभरपाई देतो परंतु हे 50 हजार रुपये शेतक-याच्या हातामध्ये देणार नाही. त्यापैकी 20 हजार रुपये रोखीने देऊ आणि 30 हजार रुपये बागा डेव्हलप करण्यासाठी, या शेतकऱ्यांच्या पारंपारिक पध्दतीने लावलेली ही जुनी कलमे आहेत त्या कलमांच्या ठिकाणी बांधबदिस्ती घालणे , गडगा घालणे ,त्यांची डेव्हलपमेन्ट करणे, जुन्या फांद्या छाटून त्यावर नवीन प्रक्रिया करणे इत्यादी करिता पैसे देण्यात येतील. मला माननीय मंत्री महोदयांचा विचार भावला. सर्वांचा विरोध पत्करुन माननीय मंत्री महोदयांच्या या विचाराला मी पाठिंबा दिला होता. हातामध्ये पैसे मिळाले तर ते पैसे खर्च होऊन जातील परंतु त्या पैशाचा उपयोग या कामासाठी केला गेला तर भविष्यासाठी त्या पैशाचा चांगला उपयोग होऊ शकेल.या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी जे काही नियोजन केले होते ते आम्ही मान्य केले होते तेव्हा हे नियोजन कोठे गेले आहे ? हे सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे माडावयाचा आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, कोकणातील शेतकऱ्याच्या बांधा बाधावर जेट्रोफा लावण्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ..

योजना आणली आहे. त्यांच्या योजनेचे आम्ही स्वागत केले होते. कोकणातील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती झाली पाहिजे. सरकार कोणाचे आहे किंवा मी कोणत्या पक्षाचा आहे याला महत्व नसून कोकणाच्या बाजूने सर्वानी उभे राहण्याची आवश्यकता आहे. आज आमच्यावरसुध्दा लोकांचा मोठया प्रमाणावर दबाव येण्यास सुरुवात झाली आहे. बाकीच्या भागातील शेतक-यांना जर शासन मदत करु शकते तर कोकणातील शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी तुम्ही कमी का पडत आहात ?असा आमच्यावर तेथील जनतेचा रोष यावयास लागला आहे. तेव्हा शेतकऱ्यांच्या बांधा बांधावर जेट्रोफा लावण्यात येईल अशा प्रकारे आपण मध्यंतरी सांगितले होते . शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती कशा प्रकारे होईल, शेतकऱ्याच्या घरा घरामध्ये पैसे कशा पध्दतीने येतील याचा शासन विचार करीत आहे असे देखील सांगण्यात आले होते . तेव्हा या संदर्भात आपण काय केलेले आहे याचे उत्तर देण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये आपल्याला काही अडचणी आल्या असतील तर त्याही आपण आमच्या समोर मांडण्याची आवश्यकता आहे. त्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही आमचे कोणते योगदान दिले पाहिजे. आम्ही आमचे कोणते कर्तव्य पार पाडले पाहिजे हेसुध्दा आपण आम्हाला सागितले पाहिजे. केवळ आम्ही शासनाकडून काही अपेक्षा करुन चालणार नाही तर आमचे देखील काही कर्तव्य आहे. ते आपण कर्तव्य पार पाडण्यामध्ये आम्ही कमी पडणार नाही हे देखील मी आपल्याला सांगतो.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी सांगावयाचा आहे.महाराष्ट्राला 720 किलोमिटर्स लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे.समुद्राच्या लाटांवर वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प गुहागर तालुक्यात प्रायोगिक तत्वावर 1 मे 2008 पासून सुरु करण्यात येईल असे सांगितले आहे. त्यामध्ये काही अडचणी आल्या होत्या. त्यामुळे या प्रकल्पाचे काम होऊ शकले नाही. हे मुद्दे मी आपल्याकडे आग्रहाने मांडत आहे ., ज्या ज्या वेळी मी आपल्याशी या मुद्यांवर चर्चा केली होती त्या त्या वेळी आपल्या विचारांमध्ये मला कोकणाचे भवितव्य दिसून आले होते. म्हणून आपल्या विचारामध्ये जर माझ्या कोकणाचे भवितव्य मला दिसून येत असेल तर मी तुमच्याशीच भांडले पाहिजे. ज्यांच्या विचारामध्ये भवितव्य दिसत नसेल त्यांच्याशी चर्चा करुन काय उपयोग होणार आहे ? त्यामुळे माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित असल्यामुळे त्या बाबी मी सभागृहामध्ये मांडल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ..

सभापती महोदया, कोकणातील माणूस आर्थिकदृष्टया कसा सक्षम होऊ शकतो या दृष्टीने शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. कोकणातील वीट भट्टीच्या नुकसानीसंबंधी देखील कोणती मदत देण्यात येणार आहे. याबाबत येथे सांगण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे यंदा कोकणामध्ये मत्सदुष्काळ जाहीर करण्यात यावर या संदर्भात सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. लक्षवेधी सूचनेला उततर देत असतांना राज्यातील गेल्या पाच वर्षातील मासेमारीची सरासरी आकडेवारी देण्यात आली होती. दरवर्षी मासेमारी कशी जास्त होते ,पर्यायाने कोकणामध्ये मत्स दुष्काळ कसा नाही हेच आम्हाला त्या निवेदनातून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु सरकारला मला एक प्रश्न विचारावयाचा आहे की त्याच आकडेवारीमध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, 1347 कोटी रुपयांचे परकीय चलन मासेमारीतून राज्याला मिळते तसेच राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये मच्छिमार बांधवासाठी फक्त 40 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढी कमी तरतूद करण्यात आली असेल तर मत्स शेतीचा विकास कसा होईल ? मासेमारी करणा-या बांधवाचा आर्थिक विकास कसा होईल? मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला असे सांगावयाचे आहे की, या मच्छिमार बांधवासाठी अधिक मदत दिली पाहिजे, नवीन यात्रिकी नौका त्यांना बांधून दिल्या पाहिजेत, समुद्रामध्ये किती फॅदम अंतर गेल्यावर मासे मिळतील यासंबंधीचे मार्गदर्शन त्यांना केले पाहिजे. कोणत्या क्षणी वादळ निर्माण होईल किंवा अन्य कोणती अडचण निर्माण होईल याची पूर्व कल्पना यावी या दृष्टीने केरळ राज्यामध्ये जशी सुसज्ज यंत्रणा उभी केली आहे तशी आपल्या राज्यात उभी केली पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ....

सभापती महोदया, 1347 कोटी रूपयांचे परकीय चलन मिळवून देणरा हा मत्स्य व्यवसाय आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ती आपल्या राज्याची फार मोठी साधन संपत्ती आहे. ती संपत्ती देखील विकसित करण्याचे काम ज्या पद्धतीने आमचे नेते केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी जाहीर केले की, या महाराष्ट्रातील, विशेषत: कोकणातील 7 बंदरे, शेवटी या राज्यात समुद्र किनारा हा कोकणालाच आहे, म्हणून ही 7 बंदरे विकसित करण्याचा अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय आणि संकल्प सरकारने केलेला आहे. तेव्हा त्या दृष्टीने देखील राज्य सरकारने पुढाकार घेतला पाहिजे. सभापती महोदया, काल परवा मी टीव्ही वर पाहिले की, विजयदुर्ग या एका बंदराच्या विकासासाठी चौगुले कंपनीबरोबर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी करार केला आहे. पण या सर्वच बाबतीत आता गती वाढविण्याची गरज आहे. सगळ्या बाजूने कोकणामध्ये आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने, शेतकरी सक्षम होण्याच्या दृष्टीने, मच्छिमार बांधव सक्षम होण्याच्या दृष्टीने, जो फळबागायतदार आहे तो सक्षम होण्याच्या दृष्टीने सरकारने थोडासा जरी हातभार लावला तर फार मोठा वाव आहे, म्हणून शासनाने त्यांना मदत करावी अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो. सभापती महोदया, परवाच्या पावसाने केवळ आंब्याचे नुकसान झाले, केवळ काजूचे नुकसान झाले, नारळी-पोफळीचे नुकसान झाले, वीटभट्टीचे नुकसान झाले अशातील भाग नाही. तर त्या ठिकाणी गुराढोरांसाठी ठेवलेल्या वैरणीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कारण कोकणामध्ये ओला चारा नाही. पावसाळ्याशिवाय ओला चारा नसतो. म्हणून त्या ठिकाणी चारा कापून, संपूर्ण पावसाळा आणि उन्हाळ्यामध्ये पुरेल असा चारा ठेवला जातो. पण तो चाराही पूर्णपणे भिजून गेला. परिणामी उद्या गुराढोरांना चारा मिळणार नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मागील वेळेस मी आपल्यासमोर समितीमध्ये एक मुद्दा मांडला होता. आदरणीय मंत्री श्री.अजितदादा पवार हे येथे उपस्थित आहेत. मी असा विषय मांडला होता की, कोकणाला जे कायनेचे टेल वॉटर जाते त्या टेल-वॉटरचा सर्व्हे आपण आपल्या नेतृत्त्वाखाली करीत आहात. हजार कोटी रूपयांचे काम तेथे व्हावे या दृष्टीने तेथे काम आपले सुरू आहे. त्याबद्दल जरूर तुमचे अभिनंदन. पण जेव्हा मागे पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता तेव्हा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला होता. तेव्हा मी शासनाला एक प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव असा होता की, कोयनेचे जे टेल वॉटर आहे ते सारे कोकणातून समुद्राला मिळते, ते वाया जाणारे पाणी आहे,

..... 2एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

त्याच्या दुतर्फा 2156 हेक्टर इतकी प्रचंड जमीन आहे. त्या काळात शासन गुजराथमधून चारा आणत होते. तेव्हा मी असे सांगितले होते की, ही 2156 हेक्टर जमीन आणि 78 टीएमसी इतके वाया जाणारे पाणी यांचा उपयोग आपण केला पाहिजे. वाया जाणारे हे पाणी उचलून प्रायोगिक तत्त्वावर नदीच्या दुतर्फा ओला चारा तयार केला तर कोकणामध्ये एक चांगला संदेश जाईल. उन्हाळ्यात देखील कोकणात ओला चारा तयार होऊ शकतो आणि त्या आधारे कोकणामध्ये दूध व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना घेता येऊ शकेल, हा व्यवसाय कोकणातील लोक वाढवू शकतील. गुजराथमधून आपण चारा आपल्या राज्यात आणत होतो, त्यासाठी वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात आपण करीत होतो. ते लक्षात घेता आणि कोकणामधून वाया जाणारे पाणी भरपूर आहे ते लक्षात घेऊन त्या पाण्याचा वापर करून नदीच्या दुतर्फा ओला चारा तयार करावा. किमान प्रायोगिक तत्त्वावर तरी आपण हे काम करावे अशी विनंती तेव्हा मी सरकारकडे केली होती. परंतु ते काम होऊ शकले नाही, ते होण्याची आवश्यकता आहे. आता प्रश्न असाही उपस्थित केला जाईल की, हे सगळे आहे तर तुम्हीच ते का करीत नाही ? आम्ही ते केले पाहिजे याची आम्हाला देखील जाणीव आहे. पण आज जेवढ्या प्रमाणात इतर भागामध्ये शासनाच्या माध्यमातून चांगल्या योजना होत आहेत याची जाणीव कोकणातील जनतेला जेवढ्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्या प्रमाणात दुर्दैवाने होऊ शकली नाही. कारण कोकणातील माणूस हा सातत्याने मुंबई-पुणे मध्ये नोकरीच्या निमित्ताने जायला लागला व मनीऑर्डर्सच्या माध्यमातूनच आपला गावातील संसार चालवू लागला. परंतु आता त्याला त्या ठिकाणी नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. म्हणूनच आता कोकणातील माणसाचे लक्ष आता कोकणामध्ये जास्त गेले आहे, जाऊ लागले आहे. अशा प्रसंगी सरकारने त्यांना मदत करावी अशी विनंती मी या निमित्ताने आपल्याकडे करतो आहे.

सभापती महोदया, अनेक मुद्दे या ठिकाणी बोलण्यासारखे आहेत. त्यातील दोन तीन मुद्दे जे फलोत्पादनाविषयीचे होते ते मी येथे मांडले आहेत. कारण 1983 साली आदरणीय श्री.पवार साहेबांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोत्पादनाला चालना देऊन जी लागवड सुरू केली त्याचा फार मोठा रिझल्ट कोकणात आता मिळू लागला आहे. फळे तर निर्माण व्हायला लागली आहेत, पण त्या फळांवर प्रक्रिया करणारे कारखाने मात्र अजून कोकणात आलेले नाहीत. ज्या प्रमाणे सहकारी तत्त्वावर कोकणामध्ये या संदर्भात कामगिरी व्हायला पाहिजे होती ती दुर्दैवाने

..... 2एक्स 3 .....



KBS/SBT/MMP. श्री.गायकवाड नंतर --- 16:35

श्री. भास्कर जाधव ...

आमच्या सारख्या कार्यकर्त्यांकडून होऊ शकली नाही हेही मान्य करायला पाहिजे, आणि त्याची आम्हाला निश्चितच जाणीव आहे. आज बचतगटाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचे बचत गट त्या ठिकाणी निर्माण झालेले आहेत. पण त्या बचत गटांना आणि आम्हालादेखील ज्या पद्धतीने मार्गदर्शन असायला पाहिजे तसे मार्गदर्शन दुर्दैवाने नसल्याने आज आम्ही सगळे त्या संदर्भात सभागृहात ऐकतो आहोत, महाराष्ट्राच्या बाहेर बचतगटाच्या माध्यमातून चालणारे काम पाहतो आहोत ते पाहून आता आमच्या भागामध्ये देखील बचतगटाच्या माध्यमातून कार्य व्हावे ही गोष्ट आम्ही कळकळीने मांडतो आहोत. पण ती करण्यासाठी म्हणून सरकारनेही काही प्रमाणात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. किमान आमच्याकडून हे कार्य करून घेण्याकरिता म्हणून तरी सरकारने आम्हाला या संदर्भात मार्गदर्शन करण्याचीही आवश्यकता आहे याच भावनेतून या ठिकाणी मी आपल्या समोर हे बोललो. पुन्हा एकदा या प्रस्तावाच्या माध्यमातून अनेक प्रश्न मांडत असताना, आज येथे माननीय सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम हेही उपस्थित आहेत. त्यांना मी आठवण करून देऊ इच्छितो की, 2006 साली कोकणात महापूर आला, 2007 साली देखील महापूर आला. कोकणामध्ये महापूर झाला त्यात तेथील लोकांची सारी शेतीच वाहून गेली. ....

( यानंतर श्री. सरफरे ... 2वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आपण आम्हाला बि-बियाणे देणार आहात त्या बि-बियाण्यांचा कोकणामध्ये काहीही उपयोग होत नाही. याचे कारण कोकणामध्ये भाताचे पिक होते. हे पिक 100 टक्के पावसाच्या पाण्यावर, निसर्गावर अवलंबून असते. सुरुवातीला भाताच्या बियाण्याची पेरणी करुन रोपे तयार केली जातात. व त्यानंतर ती रोपे काढून दुसऱ्या जागेवर लावली जातात, ज्याला लावणी म्हणतात. लावणी केल्यानंतर व भात तयार झाल्यानंतर त्याची कापणी केली जाते. त्यामुळे भाताच्या पिकाचा कालावधी ठरलेला असतो. ही भाताची शेती अधे-मधे करता येत नाही. कोकणामधील जमिनीची स्थिती अशी आहे की, जमिनीच्या दोन्ही बाजूनी नदी वाहते, ज्याला कोकणात पऱ्या म्हणतात. त्या नदीच्या दुतर्फा सखल झालेल्या थोडयाशा जागेवर भाताची शेती होऊ शकते. त्यापेक्षा कोकणामध्ये भात पिकासाठी दुसरी पठारे नाहीत. जर पठारे असतील तर त्याठिकाणी पिकासाठी लागणारे पाणी मिळत नाही. अशाप्रकारे नदी किंवा पऱ्याच्या कडेला छोटया छोटया असलेल्या खाचरांमधून शेती केली जाते. सन 2005 च्या पावसामध्ये ही खाचरे पूर्णपणे धूपून गेली आहेत, उद्ध्वस्त झाली आहेत. आपण बि-बियाण्यांना पैसे देणार आहात, परंतु जर शेती शिल्लक राहिली नाही, कसदार जमीन शिल्लक राहिली नाही, बांध-बंदिस्ती शिल्लक राहिली नाही तर त्या शेतकऱ्यांनी कुठे शेती करावयाची? त्या शेतकऱ्याला आपल्या शेतीची हद्द सांगण्याइतपत सुध्दा दगडधोंडा शिल्लक राहिला नाही तर त्या शेतकऱ्याने कुठे शेती करावयाची? या कारणाकरिता आपण त्याला पैसे दिले नाहीत. कोकणामध्ये दिलेल्या पैश्याचे त्याच्यापर्यंत वाटप झाले नाही.

सभापती महोदय, गेल्या वर्षी कोकणातील आंब्याच्या नुकसान भरपाईकरिता 17 कोटी 20 लाख रुपये देण्यात आले. माझ्या माहितीप्रमाणे त्यातील फक्त 3 कोटी 12 लाख रुपयांचे वाटप आतापर्यंत झाले आहे. याकरिता आपल्या विभागाकडून दोन-तीन प्रकारची सर्क्युलर पाठविण्यात आली. पहिल्यांदा वाटपाचे काम महसूल विभागाने करावे अशाप्रकारचे सर्क्युलर पाठविण्यात आले. त्यानंतर हे काम फलोत्पादन खात्याने करावे अशाप्रकारचे सर्क्युलर पाठविण्यात आले. त्यानंतर ते काम सुरु करण्यात आले. कोकणामध्ये सर्वांत मोठी अडचण कोणती असेल तर एका 7/12च्या उताऱ्यावर आठ ते दहा लोकांची नावे असतात. ही नावे कसणाऱ्या लोकांची नसून हिस्सेदार म्हणून लावलेली असतात. याबाबत आपल्या फलोत्पादन खात्याने अतिशय सुंदर निर्णय घेतला आहे. 100 रुपयांच्या बॉंड पेपरवर त्याठिकाणी हजर असणाऱ्या लोकांच्या सह्या घ्यावयाच्या. आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

उद्या जर एखादी अडचण उद्‌भवली किंवा दुसरा हिस्सेदार वाटा मागण्याकरिता आला किंवा भांडावयास तयार झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आमच्यावर राहील. अशाप्रकारे 100 रुपयांच्या बाँडपेपरवर शेतकऱ्याकडून स्टेटमेंट लिहून घेऊन त्यांना पेमेंट करणार इतक्यात आपले दुसरे सर्क्युलर पाठविण्यात आले. आणि हे वाटपाचे काम पुन्हा महसूल विभागाकडे सोपविण्यात आले. त्यामुळे आता ते सर्व पैसे खर्च न होता तसेच्या तसेच पडून आहेत. याबाबत आपण कधीतरी कठोरपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. "कसेल त्याची जमीन" हा कायदा केलेला आहे. त्याप्रमाणे त्या जमिनीवर फळझाडांची लागवड करण्यासाठी जे कुणी संमती देतील त्यांच्या पुरेशा प्रमाणात सहया असल्यातरी आम्ही त्यांना पैसे देऊ अशाप्रकारचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. 100 टक्के लोकांच्या एकाच वेळी सह्या आणि संमती मिळणे कठीण जाते. मुंबईत येऊन ॲफिडेव्हिट केले जाते, परंतु मुंबईत केलेले ॲफिडेव्हिट गावच्या ठिकाणी मान्य केले जात नाही. आता नोटरी केलेला पेपर सुध्दा आपण मान्य करीत नाही. त्यामुळे त्याठिकाणी पडून असलेल्या पैश्यांचा निपटारा कशापध्दतीने करता येईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. आणि तोही आपण करावा अशाप्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम सभागृहात उपस्थित आहेत. माझा अर्धवट राहिलेला मुद्दा मी याठिकाणी उधृत करतो. पावसामुळे शेती धुपून गेली, त्याचवेळी कोकणातील सर्व रस्ते सुध्दा वाहून गेले. आज जर आपण पाहिले तर कोकणातील प्रत्येक लोकप्रतिनिधींची सर्वात जास्त मागणी कोणती असेल तर आमच्या गावातील रस्त्याचे डांबरीकरण व्हावे. यापेक्षा अधिक मागण्या आमच्या कोकणातील लोकांच्या नसतात. आपल्यासारख्या आश्रमशाळा आम्ही मागत नाही. आमच्या कारखान्यांना मदत करा असे कुणी म्हणत नाही. आमच्या कारखान्यांना सरकारने गॅरंटी द्यावी, भागभांडवल द्यावे असे कुणी म्हणत नाही. आमची जास्तीत जास्त रस्त्यांची मागणी असते. त्यामुळे तेथील सर्व रस्ते धुपून गेले आहेत. त्यावेळी आपण जिल्हाधिकाऱ्यांना वाटप करण्याकरिता 2 कोटी रुपये दिले. या 2 कोटी रुपयांमध्ये काय होणार? दिनांक 30 जानेवारी 2008 रोजी माननीय नामदार श्री. पवार साहेब रत्नागिरी येथे आले असतांना एक बैठक घेण्यात आली.. त्या बैठकीमध्ये आपण सांगितले की, मी तात्काळ पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

देण्याची व्यवस्था करतो. आपण दोन-चार चांगले निर्णय घेतले, परंतु त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. याठिकाणी आदरणीय श्री. अजितदादा पवार बसले आहेत. एखादा मुद्दा पटल्यानंतर ते राजकारण न बघता, पक्ष न बघता निर्णय घेतात. याचा उत्तम अनुभव मला आलेला आहे. त्यामुळे दादा आपण थोडे कोकणाकडेही लक्ष द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे. राज्याच्या विकासाच्या प्रश्नामध्ये दादा कधीही पक्ष बघत नाहीत, राजकारण बघत नाहीत. शेवटी प्रत्येकाला आपला पक्ष बघावाच लागतो. राजकारण आहे म्हणून आम्ही इथे आहोत, ते आहेत म्हणून मी आमदार आहे हे सर्वांनाही मान्य आहे. त्या विषयामध्ये मी जाऊ इच्छित नाही. पण दादा, आपल्याला थोडे कोकणाकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. कारण आपली काम करण्याची पध्दत आहे. कोकणामध्ये काम करण्याकरिता पुरेपूर वाव आहे. फलोत्पादनामध्ये वाव आहे, मत्स्य व्यवसाय विकासामध्ये वाव आहे. कोकणामध्ये नवनवीन कारखाने येत आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:45

श्री.भास्कर जाधव . . . .

या भागामध्ये विविध कारखाने येत असताना शेतकऱ्यांना हातभार लावण्याची आवश्यकता आहे. समुद्राच्या लाटांवर वीज निर्मिती करण्याच्या बाबतीत विचार करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना केवळ खते किंवा बियाणे देऊन उपयोग होत नाही. म्हणून कायद्यामध्ये दुरुस्ती करुन तेथील भौगोलिक परिस्थिती, भौगोलिक रचना, तेथील हवामान विचारात घेऊन कोकणाकरता वेगळा निकष लावून तेथील शेतकऱ्यांना मदत करावी अशी मी शासनाला विनंती करतो. या प्रस्तावाच्या माध्यमातून आम्ही येथे काही माहिती सांगितलेली आहे. परंतु शासनाकडे मोठया प्रमाणात यंत्रणा उपलब्ध आहे, बरीच माहिती उपलब्ध आहे, बराच अनुभव आहे अशा वेळी त्या माध्यमातून कोकणासाठी निरपेक्षबुध्दीने मदत केली पाहिजे. हे सरकार शेतकऱ्यांचे आहे, त्यांना मदत करणारे आहे अशा प्रकारे जनतेपर्यंत संदेश जाण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांचा, वीटभट्टीवाल्यांचा, फलोत्पादनाव्दारे फळांची लागवड करणाऱ्या बागायतदारांचा, मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांचा, शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा, पर्यटनाचा विकास करणाऱ्या पर्यटनाचा देखील विचार करणे गरजेचे आहे. तसेच कोकणामध्ये फूल शेती देखील मोठया प्रमाणात होते, पण ती देखील पावसामुळे उध्वस्त झाली आहे. त्याबाबतीत देखील विचार करावा. तशा प्रकारचा शासन विचार करील या भावनेतून याठिकाणी हा ठराव मांडण्यात आला आहे, त्याला मी पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

. . . .2 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज सदनामध्ये सत्ताधारी पक्षाकडून प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. सर्वसाधारणपणे अशी अपेक्षा असते की, शासनाने काय करावयास पाहिजे किंवा शासनाच्या जनतेकडून काय अपेक्षा आहेत ? याची शासनाला माहिती करुन देण्यासाठी विरोधी पक्षातर्फे प्रस्ताव आणला जातो. अशा वेळी सत्ताधारी पक्षाकडून असा प्रस्ताव येण्याची आवश्यकता असते की, माझे राज्य व्यवस्थितपणे सुरु आहे. अशा वेळी अजून हे केले तर बरे होईल, ते केले तर बरे होईल वगैरे. पण सध्या सत्ताधारी पक्षाकडे तशा स्वरुपाचे काहीच कारण नसल्यामुळे त्यांनी याठिकाणी हा प्रस्ताव आणला आहे. प्रस्ताव कोणी मांडावा ? मी याबाबतीत अत्यंत गांभीर्याने बोलत आहे. मी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी यांना सांगितले की, आज आपण हा प्रस्ताव मांडणार आहात काय ? कारण राज्यामध्ये अवकाळी पाऊस झालेला आहे. त्यामुळे आंब्याच्या बागांचे, काजूचे नुकसान झालेले आहे. तर त्यावर त्यांनी असे सांगितले की, मी हा प्रस्ताव मांडणार नाही. त्यावर मी असे सांगितले की, आज तुमचा तो हक्क आहे. तसेच सुरवातीला जे सन्माननीय सदस्य प्रस्ताव मांडतात, त्यावेळी त्या प्रस्तावाच्या संबंधातील पूर्ण पार्श्वभूमी मांडण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते, म्हणजे या प्रस्तावामध्ये काय आहे ? या प्रस्तावाच्या माध्यमातून आपल्या अपेक्षा काय आहेत ? या प्रस्तावाच्या संदर्भात राज्य शासनाच्या कोणत्या विभागाकडून कोणते दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे ? हे सर्व मुद्दे सुरुवातीला प्रस्ताव मांडत असताना त्यामध्ये यावे लागतात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशीसाहेबांनी उभे राहून मोजून सात मिनिटांमध्ये हा प्रस्ताव मांडला आणि खाली बसले. मला उत्सुकता होती की, ते आता काय माहिती देत आहेत ? ते ऐकावे. राज्यामध्ये किती नुकसान झाले आहे ? कुठे-कुठे नुकसान झाले आहे ? याबाबतीत त्यांच्याकडील आकडेवारी काय आहे ? वगैरे. ही माहिती दिल्यानंतर माननीय मंत्री महोदय शेवटी उत्तराच्या भाषणामध्ये सांगतात की, तुम्ही दिलेली माहिती बरोबर नाही. अमुक हेक्टरचे नुकसान झालेले नाही वगैरे. कारण आपण याठिकाणी मुद्दे मांडताना नेहमी सांगतो की, दहा हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झालेले आहे. त्यावर माननीय मंत्री महोदय सांगतात की, एवढे नुकसान झालेले नाही, तर इतके नुकसान झालेले आहे वगैरे. कारण शासनाकडे माहिती देणारी यंत्रणा उपलब्ध असते. मला सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी यांच्याकडून खूप अपेक्षा होती. पण त्यांनी वीटभट्टीच्या संदर्भात फार महत्वाचा आणि मोलाचा मुद्दा मांडला आहे. सध्या तुम्ही अख्ख्या महाराष्ट्राच्या बाबतीत मांडू

. . . .2झेड-3

शकत नाही. पण माझी तुमच्याकडून अपेक्षा होती. मी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना धन्यवाद देतो. त्यांनी प्रस्तावाच्या गाभ्यामध्ये जाण्याचा खूप प्रयत्न केला. पण भास्करराव, काय झ ाले माहिती आहे का ? तर तुम्ही कोकणाशी एवढे निगडीत राहिलात की, इतर महाराष्ट्रात काहीच घडलेले नाही असे वाटू लागले. म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो आहे. राज्यामध्ये अवकाळी पाऊस पडला, सगळे काही वाहून गेले आणि मग काय वाहून गेले, काय राहिले हे सांगता-सांगता त्यांनी कोकणामध्ये कशा प्रकारे विकास व्हावा यावर जवळजवळ 80 टक्के भाषण केले. त्यावेळी मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी यांच्याकडे पहात होतो. त्यांना असे वाटत होते की, अरे, मी बोललो असतो तर बरे झाले असते, अरे, मी बोललो असतो तर बरे झाले असते. कारण त्यांचा अनुभव जास्त आहे. सभापती महोदय, मी दोन गोष्टींबाबत बोलणार आहे. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या बाबतीत सांगावयाचे तर ते काही नोंद घेतच नव्हते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्हाला माननीय मंत्री श्री.विनय कोरेसाहेबांनी तेथे येऊन मदतीच्या बाबतीत सांगितले होते. पण तसे काही झाले नाही. त्याचे त्यांनी उत्तर द्यावे. आंब्याचे जे नुकसान झाले, त्याबाबतीत 12 कोटी रुपये देऊ असे सांगितले होते, पण 3 कोटी रुपयेच का उपलब्ध झाले ? आम्हाला 50 हजार रुपये देणार होते, पण 20 रुपये, 30 रुपये देण्यात आले. सन्माननीय सदस्यांनी या सगळया उणीवा सांगितल्या. माननीय मंत्री महोदय नोंद घेत नाहीत हे त्यांनी पाहिले. पण सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे हुशार आहेत.

डॉ.पतंगराव कदम (खाली बसून) : तुमच्या ही गोष्ट उशीरा लक्षात आली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे नाही. ही बाब आमच्या पूर्वीपासूनच लक्षात होती. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव या बाजूला असते तर त्यांना यापेक्षाही जास्त चांगली उर्जितावस्था आली असती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते........

ते इतके हुशार आहेत की, त्यांनी येथे सांगून टाकले की, दादा असे आहेत की,पक्षाच्या पलिकडे जाऊन कोठलेही काम करतात. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आपल्या पेक्षा ते अधिक सक्षम आहेत असे त्यांनी सांगितले. मला हे आजच कळाले आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचा सुंदर कोकणा बद्दलचा चांगला अभ्यास आहे हे ऐकून मला बरे वाटले परंतु त्यांनी येथे मागून मागून काय मागितले तर आंबा, काजू,भात या पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्याना नुकसान भरपाई द्या. तसेच ही नुकसान भरपाई मागत असतानाच त्यांनी रस्त्याचे डांबरीकरण केले जावे ही देखील मागणी केली. वाळवीचा पाऊस फार वेळ पडत नाही. तो साधारण एक तास किंवा दोन तास येतो व निघून जातो.

काही सन्माननीय सदस्य ( बसून ) : वाळवीचा नव्हे, वळवाचा पाऊस.

श्री. दिवाकर रावते : होय. महाराष्ट्रामध्ये वळवाचा पाऊस झाला आहे. कोकणात वळवाचा पाऊस असे म्हणतात. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अवकाळी पाऊस असे म्हणतात. मला काय म्हणायचे आहे हे आपण समजून घ्यावे. वाळवी हा शब्द आपण मला आता सांगितला आहे. मी त्याचा उपयोग पुढे माझ्या भाषणामध्ये कोठे तरी करणारच आहे. मला तुम्ही हा शब्द आता उगीचच सांगितला आहे. सभापती महोदय, मी येथे बरेच पेपर्स आणलेले आहेत. परंतु ते सर्व मी आता वाचणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये सर्वत्र दोन ते तीन दिवस भरपूर पाऊस झाला. या पावसामुळे तोटया बरोबरच काही फायदेही झालेले आहेत. माननीय मंत्री महोदय, श्री. अजित पवार हे जलसंपदा खात्याचे मंत्री आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, या पावसामुळे एक फायदा झालेला आहे की, पंधरा दिवसानंतर टँकर सुरु करावे लागले असते ते आता महिना दीड महिन्यानंतर सुरु करावे लागणार आहे. या पावसामुळे विहिरी पाण्याने भरल्या. परंतु या अवकाळी पावसामुळे, रबीच्या पिकाचे आतोनात नुकसान झाले. गहू संपूर्णपणे गेला. पंधरा दिवसांपूर्वी हरभरा आला होता. त्या पैकी काही हरभरा घरी देखील आला होता. सर्वच हरभऱ्याचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. भुईमुगाचे मात्र काय होईल हे मला आताच काही सांगता येणार नाही. पिकाचा पेरा कधी केला, किती उशिरा हे पीक आले यावर या नुकसानीची तीव्रता अवलंबून आहे.

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते........

ज्यांनी उशीरा पेरणी केलेली असेल त्यांना या पावसामुळे फायदाच होणार आहे. परंतु जो भुईमूग हातातोंडाशी आलेला असेल तो शेतातील चिखलामुळे सडण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, कोकणात आंबा पिकाचे नुकसान झाले आहे.सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. ई टी.व्हीच्या बातम्यांमध्ये साधारणपणे 20 ते 25 दिवसांपूर्वी दाखविण्यात आले हेते की, आंब्याला मोहर आला होता. परंतु अवकाळी पावसामुळे हा सर्व मोहर गळून पडला आहे. बातम्यांमध्ये एक शेतकरी सांगत होता की, पावसामुळे मोहर गळून गेला व शिल्लक राहिलेला मोहर तो हाताने दाखवित होता. त्यामुळे आता मात्र मुंबईकरांना व इतरांना आंबा लगेच न मिळता मे महिन्यामध्येच मिळणार आहे. सर्वच जिल्हयामध्ये पाऊस झ ााल्यामुळे, आता किती नुकसान झालेले आहे हे कसे काय समजणार ? कोकणातील काजू पिकाचे नुकसान झाले. मराठवाडयामध्ये ज्वारी, गहू,बाजरी या पिकांचे नुकसान झाले आहे. औरंगाबाद, संभाजी नगर, जालना,बीड, परभणी, नांदेड,या जिल्हयातील पिकांचे नुकसान झालेले आहे. तसेच लातूर जिल्हयातील द्राक्षाचे नुकसान झाले आहे. नगर व खानदेशमधील तीन जिल्हयामध्ये देखील अवकाळी पाऊस पडला आहे. हा पाऊस सर्व जिल्हयामध्ये पडलेला आहे. त्यामुळे नुकसान कसे मोजायचे हा प्रश्न आहे. हा प्रस्ताव मांडत असताना थोडीशी गल्लत झालेली आहे असे मला वाटते. प्रस्तावकर्त्यांना नक्की काय सांगायचे आहे ?

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या प्रस्तावामध्ये सुरुवातीला असा उल्लेख केला आहे की, अवकाळी पावसाने थैमान घातल्याने तेथील द्राक्ष, कांदा, गहू, हरभरा, बेदाणा, बाजरी, ज्वारी तसेच कोकणातील आंबा, काजू, सूर्यफूल आणि मिरची इत्यादी पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. प्रस्तावाच्या पुढच्या भागात नुकसान भरपाई मागताना असे म्हटले आहे की, अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या लाखो रुपयांच्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झालेले आहेत. म्हणजे प्रस्ताव मांडताना नक्की काय मांडावयाचे होते हे समजत नाही. त्यामुळे नुकसान भरपाई कशाची पाहिजे याबाबत माननीय मंत्रिमहोदयांचा गैरसमज होईल. वित्त संस्थांकडून घेतलेले कर्ज फेडण्यास असमर्थ झाल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत असा प्रस्तावामध्ये उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी एक गोष्ट गांभीर्याने सांगितली. त्यांनी सांगितले की, कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत. ही आपल्यादृष्टीने चांगली गोष्ट आहे. खरे म्हणजे शेतकऱ्यांनी आत्महत्या करुच नये. परंतु आमच्या कोकणाकडे बघा, आत्महत्या करु नका असा सल्ला सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये दिला. परंतु तो सल्ला विदर्भातील लोकांना पेलण्यासारखा नाही. कोकणातील प्रत्येक घरात चाकरमानी आहेत. अगदीच परिस्थिती आली तर मुंबईतून मदत जाते. कोकणातील घरटी एक माणूस मुंबईमध्ये आहे हे सन्माननीय सदस्यांनी शेवटी सांगितले. कोकणातील माणूस पुणे-मुंबई या ठिकाणी नोकरीसाठी स्थायिक झाल्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी शेवटी केला. आता कोकणातील परिस्थिती बदलली आहे. आता कोकणातील तरुण फळबागामध्ये, दुग्धव्यवसायामध्ये, काजू उद्योगामध्ये चाललेला आहे, ही चांगली बाब आहे. या कोकणातील माणसाने आत्महत्या करण्यासारखी परिस्थिती नाही. कारण कोकणातील प्रत्येक घरातील माणूस मुंबईमध्ये आहे. तशी परिस्थिती विदर्भाची नाही. मी त्यावर जास्त बोलत नाही. विदर्भातील लोक दुर्दैवाने आत्महत्येला सामोरे जात आहेत. आपण कर्जमाफीचे कितीही समर्थन केले तरी सुध्दा कर्जमाफी झाल्यानंतर 80 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्या आत्महत्या का झाल्या हा तुमच्या आमच्यासाठी चिंतेचा विषय आहे. आत्महत्येचा विषय हा टीकेचा विषय नाही. कर्जमाफी करुन काय केले हा चिंतनाचा विषय आहे. आपण त्या परिसरात जाऊन पाहिले पाहिजे. सरकारने एक पाऊल पुढे टाकले आणि 5 एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ

...2...

RDB/ SBT/

श्री. दिवाकर रावते ......

केले तरी आत्महत्या का होत आहेत ? शेतमजुरांचा विषय वेगळा आहे आणि परवाच्या माझ्या भाषणात तो विषय मी मांडलेला आहे. हा प्रस्ताव या ठिकाणी येत असताना त्यामध्ये तो निर्धार नव्हता. मला सांगितलेच आहे तर मी हा प्रस्ताव मांडतो अशी भूमिका दिसली. याबाबत माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम काय उत्तर देणार आहेत ? माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांच्याकडे विषय असता तर निश्चितपणे उत्तर मिळाले असते. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम काय देणार आहेत अशी भावना सन्माननीय सदस्यांकडून व्यक्त झाली.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदया, आदरणीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम साहेब किंवा अजितदादा पवार साहेब या दोघांमध्ये मी असा फरक केलेला नाही. मी जरी जोशात बोललो तरी सावधपणे बोलत होतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा उल्लेख केला की, विदर्भातील लोकांनी कोकणाचा आदर्श ठेवावा असे मी म्हणालो. मी असे म्हणालो की, महाराष्ट्रातील लोकांनी आदर्श घेणे आवश्यक आहे. कोकणातील माणूस आपल्या घरामध्ये उपाशी असला तरी बाहेर येताना ढेकर देत येतो अशी कोकणातील पध्दत आहे. मी माझ्या घरी उपाशी आहे असे तो म्हणत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मी हे सांगत होतो की, हा प्रस्ताव खऱ्या अर्थाने सन्माननीय सदस्यांनी मांडावा अशी अपेक्षा होती. आपण तो विषय मांडला. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी तळमळीने कोकणाचा विषय पूर्णपणे मांडला. त्यांनी मच्छिमारांचा विषय आपल्या भाषणामध्ये मांडला. हा विषय महत्वाचा आहे. चार दिवसात मच्छिमारांचे किती नुकसान झाले हाही विषय यामध्ये आहे. परंतु हे सरकार आपल्याला मदत देणार आहे काय हा महत्वाचा प्रश्न आहे. आंब्याच्या बाबतीत या सदनामध्ये चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, एका 7/12 मध्ये अनेक लोक आहेत मग आम्ही कोणाला मदत द्यावयाची ? हा विषय बरोबर आहे. मदत कोणाला द्यावयाची हा प्रश्न निर्माण झालेला आहे. या संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील कित्येक तालुक्यांमध्ये कोणासाठी ही इष्टापत्ती आहे तर कोणाकरिता आपत्ती आहे. आपण हे दोन शब्द नीट लक्षात घ्यावेत. कोणाकरिता ही इष्टापत्ती आहे तर शेतकऱ्यांकरिता आपत्ती आहे. बांधकाम खात्याकरिता ही इष्टापत्ती आहे. आता अवकाळी पावसामुळे भराव वाहून गेला म्हणून सगळे एस्टीमेट्स वाढतील. ठेकेदार मजेत येतील.

यानंतर श्री. शिगम....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

नांदेड मध्ये गुरु - ता - गद्दीसाठी 5 कोटी रु. दिलेले आहेत. त्यासाठी आता 10 कोटी द्यावे लागतील. हा अवकाळी पाऊस कोणाची आपत्ती तर कोणाची इष्टापत्ती ठरलेला आहे. वीज खात्यासाठी हा अवकाळी पाऊस इष्टापत्ती ठरलेला आहे. आता ट्रान्स्फर उघडलेला होता तो पावसामुळे जळाला, डी.पी. उघडलेली होती ती पावसामुळे जळाली अशी कारणे देऊन त्यावर खर्च केला जाईल. सभापती महोदया, मला हे सांगायचे आहे की, अशा प्रकारचे हे संकट कोणासाठी आपत्ती ठरते तर कोणासाठी ते इष्टापत्ती ठरते. आपत्तीचा, संकटाचा दुर्दैवी भाग हा फक्त शेतक-याच्या नशिबी येतो आणि त्या दुर्दैवी परिस्थितीमध्ये मेण्टेनन्स डिपार्टमेंटमधील सेवा देणारे लोक कामाला लागतात, ते म्हणतात की, बरे झाले, आम्हाला काम करण्याची संधी मिळाली. राज्याच्या विविध भागामध्ये या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेले आहे. गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा, भुईमूग या सगळया पिकाचे नुकसान झालेले आहे. अमरावतीमध्ये संत्र्याचा हंगाम सुरु आहे. कोकणामध्ये जसे काजूचे नुकसान झाले तसे अमरावतीमध्ये संत्रा पिकाचे नुकसान झाले. मी नुकसानीच्या आकडेवारीमध्ये जात नाही. कारण याबाबतची माहिती शासनाकडे असते. सॅटेलाईटवरुन ही माहिती लवकर मिळते. कापसाची झालेली आवक यासंबंधी मागे माननीय पणन मंत्र्यांनी माहिती दिली होती. पणन महामंडळाचे अध्यक्ष येथे बसलेले आहेत. तो विषय आम्ही सोडून दिलेला नाही. तो आम्ही येथे केव्हा तरी उपस्थित करणार आहोत. कापसाची 80 टक्क्यापेक्षा जास्त आवक झालेली असल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्यांनी सॅटेलाईटवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मोजमाप करुन ही माहिती दिली. अमूक एका भागामध्ये अमूक इतका कापूस आला, शेतक-याने लूट केलेली आहे वगैरे माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली. आम्ही म्हणतो शेतक-याने तुम्हाला कसे लुटले ? 100 क्विंटलपेक्षा जास्त कापूस ज्यांच्याकडे ग्रीन कार्ड नाही अशा व्यापा-यांनी खरेदी केला त्याबाबतीत चौकशी करुन ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. सभापती महोदया, आता हा जो आपद्ग्रस्त शेतक-यांचा प्रश्न निर्माण झालेला आहे त्या शेतक-यांना तातडीने कोणती मदत करणार आहात हा विषय सदनासमोर आहे. आता हे जे नुकसान झालेले आहेत त्याचा सर्व्हे करण्यासाठी शासनाचे अधिकारी ग्रामीण भागात येथील, त्यानंतर हिशेब करतील, त्यानंतर नुकसान

..2..



MSS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 17:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

भरपाईचे आकडे तयार करतील, त्यानंतर प्रस्ताव तयार करतील, तो प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे जाईल आणि मग त्यावर निर्णय घेतला जाईल. यामध्ये किती कालापव्यय होईल हे सांगता येणार नाही. हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून येथे आलेला असल्यामुळे या झालेल्या नुकसानी बाबत शेतक-याला शासनाने ताबडतोबीने मदत केली तर हे सरकार शेतक-यांकडे बघते अशा प्रकारचा विश्वास शेतक-यांमध्ये निर्माण होईल. तेव्हा ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नजर अंदाजाने 5 एकारा मागे, 10 एकरा मागे 15 हजार रु., 20 हजार रु. किंवा सरकारच्या हिशेबाप्रमाणे जी काही असेल ती मदत तातडीने द्यावी. 7 मार्चला मंत्रिमंडळाची बैठक झाली. सन्माननीय मंत्री महोदय श्री. विनय कोरे हे त्या बैठकीला उपस्थित होते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे शेतक-यांचे झालेले नुकसान हा विषय होता. त्या बैठकीत मंत्रिमंडळाने नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आणि तो निर्णय वृत्तपत्रात छापून आला. 2008 पर्यंतच्या कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल 50 रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले. त्यासंबंधीचे देखील वृत्त छापून आले आहे. मला या ठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, 7 मार्च, 2008 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अवकाळी पाऊस पडल्याने शेतक-यांचे पिकांचे नुकसान झाले आहे, त्या नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा शासनाने घेतला आहे. परंतु 2006-07 या वर्षी अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे पिकाचे नुकसान झाले होते, त्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे. दोन वर्षापूर्वी जे शेतकरी उद्ध्वस्त झाले होते, त्यासंदर्भात या सभागृहात बरीच चर्चा झाली होती. त्यावेळी त्या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून या सदनात आम्ही सर्व पक्षाच्या सदस्यांनी टाहो फोडला होता. त्या नुकसानग्रस्त शेतक-यांना या शासनाने दोन वर्षानंतर नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. नुकसान भरपाईची रक्कम अपूर्ण आहे हा नंतरचा भाग आहे. 2006-07 या वर्षी झालेल्या आपद्ग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा निर्णय घेण्यास दोन वर्षाचा कालावधी का लागला ? अवकाळी पाऊस पडल्यानंतर अथवा अतिवृष्टी झाल्यानंतर त्यासंबंधी अधिका-यांकडून पिकांचे पंचनामे केले जातात, अधिका-यांकडून नुकसानीचे अंदाज येतात. ग्रामीण पातळीवरील अधिका-यांचे अंदाज, पिकांचे पंचनामे यासंबंधीची माहिती येण्यास बराच विलंब होत असतो. अशा प्रकारची माहिती देण्यास महसूल विभागांची कार्यक्षमता किती जबरदस्त आहे याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. त्या कालावधीत झालेल्या नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे येण्यास दोन वर्षाचा कालावधी लागला. वित्त विभाग, कृषि विभाग आणि महसूल विभाग यांचा या विषयाशी संबंध येतो. या तिन्ही विभागांकडून निर्णय घेण्यास बराच विलंब लागतो. आम्ही या सदनातील सदस्य असलो तरी अशा गोष्टीसंबंधीची संपूर्ण माहिती घेऊ शकत नाही. यासंबंधी वृत्तपत्रात जी बातमी येते, त्या बातमीच्या अनुषंगाने आम्ही माहिती घेऊ शकतो. त्या माहितीच्या आधारे आम्ही झालेल्या नुकसानी बाबतची माहिती या ठिकाणी सरकारला सांगतो. परंतु या वर्षी अवकाळी पावसामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे ही गोष्ट खरी आहे. त्या नुकसानग्रस्त शेतक-यांना नजरअंदाजाने

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

नुकसानीची माहिती घेऊन एकरी एक हजार, दोन हजार, पाच हजार रुपयांची आर्थिक मदत आज जाहीर करण्यात येईल काय ? यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी माझी नम्र विनंती आहे. अवकाळी पडलेल्या पावसामुळे झालेल्या शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी या उद्देशाने हा प्रस्ताव सभागृहात उपस्थित करण्यात आलेला आहे. ही आर्थिक मदत आजच जाहीर केली तर हे सरकार सेन्सेबल आहे असे आम्ही मान्य करु. शेतक-यांच्या कर्ज माफीबद्दल सर्वच छातीवर हात ठेवून बोलत होतात. परंतु आज एक गोष्ट सिध्द करण्याची वेळ आलेली आहे. सरकार खरोखरच शेतक-यांचे कैवारी आहे की वैरी आहे ते माननीय मंत्र्यांच्या आजच्या घोषणेवरुन दिसून येईल. 2006-07 मध्ये झालेल्या नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव 7 मार्च, 2008 मध्ये घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेता ही गोष्ट अतिशय खेदजनक आहे. या शेतकऱ्यांच्या बाबतीत आता निर्णय घेतलेला आहे. अजून आर्थिक मदत पोहोचण्यास किती कालावधी लागेल याची कल्पना करणे देखील कठीण आहे. नुकत्याच झ ालेल्या अवकाळी पावसामुळे शेतक-यांच्या झालेल्या पिकांच्या नुकसानी बाबत एक, दोन वर्षात निर्णय होईल. परंतु आज या नुकसानग्रस्त शेतक-यांना नजरअंदाजाने दोन हजार, पाच हजार रुपये एकरी आर्थिक मदत दिली जावी अशी माझी मागणी आहे. एकरी 25 हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी अशी आम्ही मागणी केली आहे, त्याबाबतीत नंतर निर्णय घ्या. आंबा उत्पादकांच्या बाबतीत एकरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयामुळे आमचे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे अतिशय आनंदी झाले होते. मंत्र्यांनी नुकसान भरपाईचा निर्णय घेतल्यामुळे त्यांनी माननीय मंत्र्यांना अनेक कार्यक्रमाच्या उद्‌घटनासाठी बोलाविले होते. परंतु त्या निर्णयाची बाबतीत आमदारांसमवेत बैठक घेतली गेली नाही, पर्यायाने त्या निर्णयाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी झाली नाही. शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना फसविले आहे. या ठिकाणी फक्त माननीय मंत्र्यांकडून आश्वासने दिली जातात. परंतु त्या आश्वासनांची पूर्तता मात्र या शासनाकडून होत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. सदनात सांगितलेल्या गोष्टीवर शासनाने नकारात्मक भूमिका घेतली तर त्या भूमिकेच्या अनुषंगाने विधान परिषद सदस्यांना विशेषाधिकारभंगाची सूचना दाखल करण्यासंबंधीचे अधिकार दिलेले आहेत. परंतु तो अधिकार गुंडाळून ठेवण्याची प्रथा सुरु झालेली आहे. त्यामुळे सदनातील सदस्यांनी काय

3...



ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री. शिमग 17:05

श्री. दिवाकर रावते...

करावयाचे ? कोणाकडे दाद मागावयाची ?

श्री.मधुकर चव्हाण (बसून) : आत्महत्या करावयाची...

श्री. दिवाकर रावते : आम्ही आत्महत्या करणार नाही. आम्ही आत्मसमर्पण करण्यासाठी तुम्हाला प्रवृत्त करु. सत्ता समर्पण करण्यास प्रवृत्त करु.

डॉ. पतंगराव कदम : आपल्याला वाट बघावी लागेल.

श्री. दिवाकर रावते : आम्हाला सत्तेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी दीड वर्षे वाट पहावी लागेल. त्यात नवीन तुम्ही काय सांगितले ? डॉ. पतंगराव कदमसाहेब, तुम्ही वाट पाहून पाहून थांबलात. आम्ही तर विरोधी पक्षात आहोत. सत्ता मिळेल अशी हिंमत दाखवून आम्हाला लढावे लागणार आहे. आता तुम्हाला अडसर दादांचा आहे. चिंतेचा भाग तुमचा आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ 17:10

श्री. दिवाकर रावते .....

मला सरकारला हे सांगावयाचे आहे की, जी आश्वासने दिली जातात ती पाळली जात नाहीत. त्याप्रमाणे घडत नाही. जाहीर केलेली मदत मिळत नाही. सत्तारुढ पक्षाने अत्यंत महत्वाचा विषय आणलेला आहे. त्यांचा सरकारवर विश्वास आहे. उद्या जर विश्वासघात झाला तर ते उलटतील. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, नजर आणेवारीनुसार येत्या 15 दिवसात शेतकऱ्याला एकरी 1000,1200 किंवा 1500 रुपयांची मदत जाहीर करावी आणि त्याप्रमाणे उत्तराच्या भाषणात मंत्रिमहोदयांनी घोषणा करावी. मदतीचे जीआर यापूर्वी निघालेले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी करण्याकरिता निधी कशा प्रकारे उपलब्ध करणार हे शासनाने स्पष्ट करावे. दुर्देव्याच्या फेऱ्यात सापडलेला शेतकरी कर्जमुक्त होत असतानाच पुन्हा एकदा कर्जबाजारी होऊ नये म्हणून त्याला शासनाने आधार द्यावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

जयहिंद, जयमहाराष्ट्र.

------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी जो प्रस्ताव सभागृहासमोर आणलेला आहे त्याप्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे. गेली तीन वर्षे सतत महाराष्ट्रावर अशा प्रकारची संकटे येत आहेत. कधी अतिवृष्टी तर कधी महापुरामुळे शेतकरी अडचणीत येतो. शासनाने शेतकऱ्यांना मदतच दिली नाही असे नाही. वेळोवेळी मदत दिलेली आहे. परंतु शासनाने दिलेली ही मदत कमी वाटते. त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना मी सांगू इच्छिते की, शासनाने मदत दिलीच नाही असे नाही. मदत निश्चितपणाने दिलेली आहे परंतु जी मदत दिली आहे ती अपुरी आहे त्यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. हया सुधारणा होण्यासाठी आणि त्यादृष्टीने काही मागण्या मांडण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.

सभापती महोदय, सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब यांनी 18.7.2007 रोजी सदनात दिलेले जे उत्तर आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, महापुरात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी शासनाने 2006-07 मध्ये 1123 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. पैसा खर्च करीत असताना त्याप्रमाणे उपाययोजना करतो आणि ज्या ज्या वेळी संकटे पुन्हा पुन्हा येतात त्यावेळी या योजनांवर वारंवार तदतूद करावी लागते. उदाहरण द्यावयाचे झाले तर अतिवृष्टी झाली होती आणि गोदाकाठी पूर आला होता त्यावेळी डॉ. कदम साहेब बीड जिल्हयात आले होते. त्यांनी तालुकावार बैठका घेतल्या होत्या. ग्रामस्थ, शेतकरी, सरपंच आणि लोकप्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन त्यांची मते अजमावली होती. त्यावेळी मंत्रिमहोदयांच्या आम्ही हे लक्षात आणून दिले होते की, नदीकाठी वसलेल्या गावांना संरक्षक भिंत उभारली पाहिजे. उदाहरण द्यावयाचे झाले तर दिग्रज नावाचे गाव गोदाकाठी वसलेले आहे. यागावामध्ये मंदिराच्या बाजूला पाणी घुसून अर्धे गाव पाण्याखाली जाते. जामनेर गाव आहे त्याठिकाणी पीएचसी सेंटर कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासहित पाण्याखाली जाते. आमदार निधीतून पैसा देऊन नांव खरेदी करण्यात आली आणि नावेतून आणि ट्रकमधून माणसे पुरातून बाहेर काढण्यात आली. म्हणून बीड जिल्हयातील दिग्रज,ममदापूर,बोरखेड या गावांना संरक्षक भिंत असली पाहिजे. तरच दरवर्षी निर्माण होणाऱ्या संकटातून कायम स्वरुपी मार्ग निघू शकेल अशा प्रकारची विनंती वारंवार शासनाकडे केलेली आहे.

नंतर श्री. भोगले

गोदाकाठी असलेली गावे 100 टक्के पाण्याखाली जात नसली तरी कायमस्वरुपी पाण्याचा विळखा बसतो. म्हणून मी प्रश्न विचारला होता की, या गावांचे पुनर्वसन करणार काय आणि संरक्षण भिंत बांधणार आहात काय? पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतल्यामुळे संरक्षण भिंत बांधायची नाही आणि पुनर्वसनाच्या निर्णयाची अंमलबजावणी होईपर्यंत किती वेळा अतिवृष्टी होईल, किती वेळा अवकाळी पाऊस पडेल, नदीला पूर येईल आणि लोकांनी किती सहन करायचे, गावाबाहेर जायचे? म्हणून पुनर्वसन केले तर त्या गावांचा प्रश्न कायमस्वरुपी दूर होऊ शकतो. ममदापूर, बोरखेड, पोहणेर, दिग्रस, गेवराई, बीड ही गावे पूर्णपणे पाण्याखाली वेढली जात नाहीत. ज्या गावांचे 100 टक्के पुनर्वसन करणयची गरज नाही अशा गावांना संरक्षण भिंत उभारण्याची गरज आहे. यासाठी कशा पध्दतीने व्यवस्था करायची याचा निर्णय शासनाने घ्यावा. परंतु कायमस्वरुपी आपत्कालिन परिस्थितीसाठी निधी ठेवला जावा. प्रत्येक वेळी अशा आपत्तीसाठी वेगळया पध्दतीने सर्व्हे करावा लागतो. पूर्वी नुकसान फार कमी प्रमाणात होत असे. अशी तशी परिस्थिती राहिलेली नाही. नुकसान फार मोठया प्रमाणात होत आहे. 2005-06 ते 2007-08 या काळात पावसामुळे किती हेक्टर जमिनीचे आणि किती हेक्टर फळपिकांचे नुकसान झाले याची माहिती उपलब्ध झाली आहे. मराठवाड्यातील 13 तालुक्यांमध्ये भयानक परिणाम जाणवला आहे. ही गंभीर परिस्थिती आहे. औरंगाबाद, पैठण, जालना, अंबड, चौसाळा, औसा, कळंब, कळमनुरी, केज, सोनपेठ, पूर्णा, वैजापूर, उस्मानाबाद आणि इतर तालुक्यांमध्ये मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली. औरंगाबादमध्ये 270 हेक्टर जमिनीचे आणि 200 हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले. जालन्यामध्ये 662 हेक्टर जमिनीचे आणि 185 हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले. बीडमध्ये 2200 हेक्टर जमिनीचे आणि 280 हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले. लातूरमध्ये 320 हेक्टर जमिनीचे आणि 20 हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले. उस्मानाबादमध्ये 1270 हेक्टर जमिनीचे आणि 20 हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले. परभणीमध्ये 450 हेक्टर व हिंगोलीमध्ये 550 हेक्टर जमिनीचे नुकसान झाले. ही अंदाजित आकडेवारी असली तरी शासनाने तपासून घेणे गरजेचे आहे. सर्व्हे करीत असताना अनेक अडचणी निर्माण होतात. योग्यप्रकारे सर्वेक्षण केले जात नाही. पंचनामे व्यवस्थित न झाल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. मराठवाड्यामध्ये बाधित क्षेत्रामध्ये ज्या पिकांचे नुकसान झाले त्यामध्ये 5 हजार हेक्टरवरील गहू, 737 हेक्टरवरील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरभरा, 1237 हेक्टरवरील ज्वारी, 420 हेक्टरवरील आंबा, 225 हेक्टरवरील मोसंबी आणि 48 हेक्टरवरील द्राक्ष पिकाचे नुकसान झाले. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी कोकणातील परिस्थिती या ठिकाणी सांगितली आहे. मराठवाड्यामध्ये केशर आंब्याची मोठया प्रमाणात लागवड केली गेली आहे. केशर आंबा निर्यात करण्याची परिस्थिती निर्माण झाली तेव्हापासून केशर आंब्याची खूप मोठया प्रमाणात शेतकऱ्यांनी रोहयो अंतर्गत लागवड केली. त्या केशर आंब्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. मोसम आता लहरी झालेला आहे. काय चालले आहे हे कळत नाही. ज्या काळात पाऊस यायला पाहिजे त्या काळात तो येत नाही. नको त्या काळात पाऊस पडत आहे. त्यामुळे नियोजन बिघडून जाते. थंडीबाबत खूप चर्चा झाली. ग्लोबल वार्मिंगचा परिणाम आहे का याचीही चर्चा झाली. थंडी अवेळी आल्यामुळे ज्वारी पिकावर तिचा खूप मोठा परिणाम झाला. ज्याप्रमाणे ज्वारी पोसली पाहिजे होती, ज्वारीचे कणीस मोठे व्हायला पाहिजे होते तसे झाले नाही. काही शेतकऱ्यांचे पीक शेतात उभे होते, काही शेतकऱ्यांनी पिकाची कापणी करुन ठेवली होती, जे काही थोड्याफार प्रमाणात पीक आले होते त्यात थंडीमुळे उतार कमी झाला.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ......

ते सुध्दा फार अडचणीत सापडले आणि शेतकऱ्याच्या पदरात पडणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सुदैवाने गव्हाला खूप चांगले वातावरण यावर्षी निर्माण झाले होते. गव्हाच्या बाबतीत मी 12 गुंठ्यांमध्ये सेंद्रिय खताचा एक प्रयोग केला होता व त्यामुळे मला या 12 गुंठ्यात 12 क्विंटल गव्हाचे उत्पादन झाले. पण यावर्षी हवामानामुळे हा गहू शेतकऱ्यांच्या पदरात पडला नाही. खरे म्हणजे गव्हाचे आव्हान मोठ्या प्रमाणात यावर्षी आपण उचललेले आहे परंतु ते देखील आपण करु शकलो नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या स्वत:च्या घरचे अंदाजपत्रक पूर्णपणे कोलमडून पडले आहे, याबाबतीत गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी फार चांगला मुद्दा मांडला, त्यामुळे मी जास्त वेळ घेणार नाही पण नाशिकच्या भागात कांदा पिकाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सभागृहात आताच उल्लेख झाला की, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यामुळे हा अवेळी पाऊस पडला आहे. अशा प्रकारे आलेल्या संकटांचे ओझे निसर्गाच्या खांद्यावर टाकून आपण मोकळे होत असतो. कमी दाबाचा पट्टा तयार झाला म्हणून अतिवृष्टी झाली पण खरे तर त्याला सक्षमपणे सामोरे गेले पाहिजे. कारण वारंवार अशा आपत्तींना आपण सामोरे जातो. वास्तविक त्याचे कारण काहीही असले तरी त्यामुळे माणसे मरतात, जनावरे मरतात आणि माणसांच्या मरणाची किंमत ठरवित असतांना मात्र शासन फार कंजुषी करते. म्हणून माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, मेलेल्या माणसाची किंमत ठरवित असतांना कंजुषी करु नये. वीज पडून माणूस मेला तर आपण त्याला मदत म्हणून किती पैसे देतो ? आणि विमान अपघातात माणूस मेल्यानंतर त्याला किती मदत देण्यात येते ? या दोन्हीमध्ये फरक काय आहे ? तोही माणूस आणि हा देखील माणूस, पण मदत देतांना मात्र फरक का केला जातो ? विमान अपघातात मरण पावणाराही माणूसच आणि वीज पडून मरणारा देखील माणूसच असतो, मग त्यांना मदत देण्यात अशी कंजुषी का करावी ? वाघाने खाल्ले तर किती मदत करतो ? त्यासाठी वेगळा क्रायटेरिया आणि इतर कारणांनी माणसाचा मृत्यू झाला तर वेगळा क्रायटेरिया. खरे तर हे शासन लोकांचे, लोकाभिमूख आहे म्हणून माननीय मंत्री महोदय काहीच करीत नाही असे मी म्हणणार नाही, आपण खूप काही करता पण अजून थोडेसे करण्याची गरज आहे. म्हणून वीज पडून मेलेल्या माणसाला नुकसान भरपाई

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

देताना ती वाढवून द्यावी. माननीय मंत्री महोदयांच्या भाषणातील एका वाक्याची मी त्यांना आठवण करुन देऊ इच्छिते की, शासनाने शेळी मेली तर त्यासाठी 500 रुपये मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे, परंतु ही काही पूर्ण नुकसान भरपाई नाही. वास्तविक शेतकऱ्याच्या दारातील एक शेळी मेली तरी त्याचा संसार कायमचा बंद पडतो, परंतु शासनाला काही फरक पडत नाही. कारण शासन एका शेळीसाठी 500 रुपये एवढीच मदत देते. वास्तविक या 500 रुपयात शेळीचे साधे कोकरु सुध्दा मिळत नाही. म्हणून ही जी तुटपुंजी मदत दिली जाते त्यात वाढ करुन ती 3000 रुपये प्रती शेळी एवढी देण्यात यावी, अशी माझी सूचना आहे. मोठी जनावरे, त्यात गाय, बैल आणि म्हैस अशांचे नुकसान झाले तरी देखील अत्यंत कमी मदत दिली जाते, त्याऐवजी ही मदत 30 हजारपर्यंत वाढवून मिळावी अशी माझी विनंती आहे. मी एका बैल बाजारात गेले असता त्या ठिकाणी 1.05 लाखाचा एक बैल होता आणि दुसऱ्या एका बैलाची किंमत 60 हजार रुपये होती.....अडथळा..... शर्यतीच्या बैलाच्याच ताकदीचे बैल शेतीसाठी सुध्दा लागतात. कारण रानातली ढेकळं फोडण्यासाठी, रासायनिक खतामुळे निब्बर झालेल्या जमिनी फोडण्यासाठी अशाच ताकदीचे बैल पाहिजे असतात, त्याशिवाय शेती करु शकत नाहीत. भुसभुशीत शेणखतावरील जमीन करायची नसते किंवा नांगारावर उभे राहण्याची सुध्दा आता वेळ नाही, आता ट्रॅक्टर्स वापरुन शेती नांगरली जाते आणि ती ढेकळं फोडण्यासाठी अशा प्रकारची साधी बैलं चालत नाहीत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

त्यामुळे बैलांचे किंवा जनावरांचे नुकसान झाले असेल तर त्यासाठी शासनाने कमीतकमी 30 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे अशी सूचना मी या चर्चेच्या निमित्ताने करते. आमच्या गोदाकाठी पूर आल्यामुळे मोठया प्रमाणात साठवून ठेवलेला कडबा वाहून गेला. कडबे वाहून गेल्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन सुध्दा मी दिले होते. ज्या ठिकाणी कडबे वाहून गेले त्या ठिकाणचे पंचनामे आपण कसे करणार आहात ? त्यामुळे ज्या शेतक-यांचे कडबे वाहून गेलेले आहेत त्यांना मदत करण्याचा निर्णय शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे शेतक-याचे त्याच्या लेकरापेक्षा जनावरांवरावर आणि जमिनीवर जास्त जीव असतो. त्याच्या मुलाने एक वेळेस खाण्यास मागितले तर त्याच्या पाठीत धपाटा घालेल परंतु जनावराला भूक लागली तर तो निमूटपणे त्याच्यापुढे वैरण घालेल. इतका शेतक-याचा जीव आपल्या जनावरावर आणि जमिनीवर असतो. शेतक-यांचा कडबा वाहून गेला परंतु यासाठी शासनाने काहीही मदत केली नाही, जनावरांचे गोठे वाहून गेले त्यासाठी सुध्दा शासनाने काहीच मदत केली नाही, पंचनामे झालेच नाही तर शेतक-यांना शासन कसे काय मदत करणार आहे? ज्यावेळेस पुर आला होता त्यावेळेस नाल्याच्या काठावर 2-3 पुरष पाणी होते, ऊसाच्यावर पाणी होते त्यामुळे ऊस कोठे आहे हे शोधावे लागत होते अशी त्यावेळेस परिस्थिती होती त्यामुळे अशा परिस्थितीत गोठे कोठे राहणार आहेत? त्यामुळे यासंदर्भात कायमस्वरूपी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी मागच्या अतिवृष्टीमध्ये कोयना, सांगली, बीड तसेच नदीकाठच्या सर्व भागाची पाहणी केलेली आहे. या ठिकाणी आलेल्या पुरामुळे जी जमीन 2-3 पुरुष काळया मातीची होती त्या ठिकाणची सर्व काळी माती वाहून गेली व आता केवळ वाळू आणि खडक उरलेला आहे. आता शासन या जमिनीसाठी काय मदत करणार आहे? शासनाने कितीही मदत केली तरी या जमिनीचे नुकसान भरुन येणार नाही. या ठिकाणच्या मार्केट व्हॅल्यूने शासन शेतक-यांना मदत करु शकणार आहे काय? आंबा पिकाचे जे नुकसान झालेले आहे त्यासाठी आपण कशा प्रकारे नुकसान भरपाई देणार आहात, आब्यांच्या मार्केट व्हॅल्यू प्रमाणे शेतक-यांना आपण नुकसान भरपाई देणार आहात काय? पवनार काठचे गोठे वाहून गेले त्यांना आपण कशा प्रकारे मदत करणार आहात?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

खरे म्हणजे या ठिकाणच्या जमिनीचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. जमिनीचे नुकसान कधीही भरुन येणार नाही अशी परिस्थिती आहे. आपण काही या ठिकाणच्या शेतक-यांना 2-4 लाख रुपये प्रती एकरी नुकसान भरपाई देणार नाही. त्यामुळे शासनाने अतिवृष्टी आणि आपत्कालीन परिस्थिती, हवामान, महापूर यासाठी ठोस अशी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे अशी नम्र विनंती आहे. अशा परिस्थितीत तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना न करता शेतक-यांना भरीव निधी दिला गेला पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या भागात या पावसामुळे रस्ते वाहून गेलेले आहेत परंतु शासनाने आता काही ठिकाणी वाहून गेलेल्या रस्त्यांची दुरुस्ती केलेली आहे. परंतु या रस्त्यावरुन ट्रक काय परंतु बैलगाडी जाऊ शकत नाही आणि पायी सुध्दा चालता येत नाही अशा प्रकारचे रस्ते दुरुस्त करण्यात आलेले आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे 33 गावांमध्ये पुरामुळे नुकसान झालेले आहे असे असतांनाही या 33 गावांना शासनाने दुरुस्तीसाठी 1.5 कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. या दीड कोटी रुपयांमध्ये 33 गावचे रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा हे दुरुस्त केले जाणार आहेत . आता दीड कोटी रुपयांमध्ये ही सर्व कामे कशी काय होणार आहेत ? 10 कि.मी. च्या रस्त्याची दुरुस्तीसाठी शासनाने 9 लाख रुपये मंजूर केलेले आहे. सभापती महोदय, नवीन रस्त्यांसाठी जेवढा खर्च येईल तेवढा खर्च या ठिकाणचे रस्ते दुरुस्त करण्यासाठी येणार आहे कारण या ठिकाणी अगोदरचे जे रस्ते होते त्या रस्त्यांचे पूर्ण नुकसान झालेले आहे. हवामानामुळे, पर्यावरणामुळे जे नुकसान होते त्यासाठी शासनाने भरीव निधी देण्याची आवश्यकता आहे, भरीव आपत्कालीन उपाययोजना कायमस्वरुपी करण्याची आवश्यकता आहे. कायमस्वरुपी योजना झाली तरच शेतकरी जगू शकेल. आपत्कालीन संकट ओढवल्यामुळे त्याचा परिणाम शेतक-याच्या एकटया कुटुंबावरच होत नाही, तर पिकाच्या उत्पादन दरवाढीवर त्याचा परिणाम होतो, फळपिकाच्या दरवाढीवर त्याचा परिणाम होतो, निर्यात होणा-या वस्तूवर त्याचा परिणाम होतो, प्रक्रिया करणा-या केंद्रावर त्याचा परिणाम होतो, दूध उत्पादनावर त्याचा परिणाम होतो, माणसाच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असतो.

यानंतर श्री. गायकवाड....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

त्यांची संपूर्ण अर्थ व्यवस्था कोलमडून पडते. आपल्याला दिसते त्या पेक्षा हे संकट फार मोठे असते त्यामुळे या संकटाचा मोठेपणा लक्षात घेऊन कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी भरीव निधी देण्यात यावा अशी मी विनंती करते आणि या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपविते.

----

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत** ) : या प्रस्तावावरील चर्चेसाठी 6 वाजून 10 मिनिटापर्यंत वेळ ठरविण्यात आली होती. आता 5.30 वाजलेले आहेत. या प्रस्तावावर अजून अनेक सन्माननीय सदस्याना बोलावयाचे आहे. त्यामुळे सभागृहाची वेळ वाढवावी लागेल हे सर्व सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तेच मुद्दे पुन्हा पुन्हा मांडत आहेत त्यामध्ये नवीन मुद्दा काहीही नाही.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे .

सभापती महोदय, मी फक्त एकच मुद्दा मांडणार आहे त्यामुळे माझ्या भाषणाचा बाकीचा वेळ सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना द्यावा. या चर्चेच्या निमित्ताने मला सन्माननीय फलोत्पादन मंत्री श्री.विनय कोरे यांना फक्त एक सूचना करावयाची आहे मागच्या वेळी या ठिकाणी कोकणाच्या प्रश्नाबाबत चर्चा उपस्थित केली असतांना आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांना सभात्याग करावा लागला होता. माझी दोन्ही मंत्र्यांना असे सांगावयाचे आहे की, आपण दोघेही संवेदनशील मंत्री आहात. हे मी या ठिकाणी अत्यंत प्रामाणिकपणे बोलत आहे.आपण दोघेही या ठिकाणी अत्यंत संवेदनाने बोलत असता परंतु प्रशासनाच्या निमित्ताने सरकारी यंत्रणेमध्ये
झारीतील शुक्राचार्य बसलेले असल्यामुळे आपण घेतलेल्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम आणि सन्माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांना मला असे सांगावयाचे आहे की आपण दोघेही सभागृहात बोलत असतांना योग्य निर्णय घेत असता. मी आपल्या पक्षातील नाही त्यामुळे आपल्याला चढवून मला कोणतेही मंत्रीपद नको. माझा अनुभव असा आहे की, या ठिकणी आपण जो निर्णय घेता त्याची अंमबजावणी मात्र होत नाही. मागच्या वेळी कोकणातील शेतक-यांना 15 हजार रुपये देण्याचे मान्य केले होते परंतु त्या पैशातील काहीही पैसे दिले गेलेले नाहीत. मी माझ्या संदर्भातील एक लहानसे उदाहरण देतो. मला साडेतीन हजार रुपयांचा चेक पाठविण्यात आला होता आणि मला एक हजार रुपये भरुन कोकणामध्ये बॅन्केत खाते उघडावयास सांगितले होते. तेव्हा मी असे म्हटले की, " हे पैसे तुम्हालाच लखलाभ होवोत." सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना मला असे सांगावयाचे आहे, की निसर्गाने दिलेले हे नैसर्गिक संकट आहे त्यामध्ये तुमचा आमचा कोणाचाही काही दोष नाही. तेव्हा नैसर्गिक संकटामुळे झालेल्या नुकसानीबाबत जी काही मदत देण्याचा निर्णय घेण्यात येईल त्याबाबत सवेदनशील राहून, भान ठेवून निर्णय घ्यावा आणि बेभान होऊन त्याची अंमलबजावणी करावी. एवढीच मी आपल्याला विनंती करतो.. माझ्या भाषणाचा उर्वरित वेळ सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना द्यावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 17.30

श्री.पाशा पटेल (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आर्लेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अवेळी आलेल्या पावसामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. मी लातूर जिल्हयातून आलेलो आहे. या जिल्हयामध्ये द्राक्षाचे पीक मोठया प्रमाणावर घेतले जाते. एक रात्र जर पाऊस पडला नसता तर आमच्या जिल्हयातून 12 कोटी रुपयांच्या द्राक्षाची निर्यात झाली असती.या पावसामुळे लातूर जिल्हयातील एकूण 24 कोटी रुपयांच्या द्राक्ष पिकाचे नुकसान झालेले आहे. त्यापैकी 12 कोटी रुपये निर्यात होणा-या द्राक्षाचे आणि देशातंर्गत बाजारपेठेत विकल्या जाणा-या द्राक्षाचे 12 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.आठ दिवसापूर्वी गावातील बागवान द्राक्षवाल्याच्या द्राक्ष मळयाच्या बाहेरुन फिरत होते आणि त्या शेतक-याला सांगत होते की," तुझ्या मळयातील द्राक्षे चांगली आहेत आम्हाला 20 रुपये, 25 रुपये भावाने दे ." परंतु पाऊस पडल्यानंतर सगळे शेतकरी त्या बागवानाकडे गेले आणि आमचे द्राक्ष विकत घेण्यासंबंधी त्याला सांगू लागले तेव्हा तो बागवान असे म्हणाला की, " मला माफ करा ही द्राक्षे मी पाच रुपये भावानेसुध्दा घेऊ शकत नाही." जी द्राक्षे 25 रुपये भावाने विकली जाणार होती ती द्राक्षे पाच रुपये भावानेसुध्दा विकली जात नव्हती.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्र्यांना खाजगीमध्ये भेटून मी ही गोष्ट त्यांना सांगितली तेव्हा त्यांनी असे सागितले की, " एखाद्या घरात एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर घरातील इतर व्यक्ती ज्याप्रमाणे हंबरडा फोडतात तसे आपले पीक गेल्यानंतर शेतकऱ्यांनी हंबरडा फोडला होता. "सभापती महोदय, प्रा.नागनाथ कराने नावाचे माझे एक प्राध्यापक आहेत. त्यांनी शाहू महाविद्यालयातील नोकरी सोडून इतर शेतक-याच्या अडीच हजार हेक्टर जमिनीमध्ये द्राक्षाची लागवड करुन दिली होती. त्याचप्रमाणे त्यांची सहा एकर द्राक्षाची बाग असून त्या बागेतील द्राक्षे एक्सपोर्ट करावयाची होती. सहा एकर द्राक्षाच्या बागेतून सहा किलोसुध्दा द्राक्ष निघणार नाहीत अशी स्थिती पावसामुळे निर्माण झालेली आहे. याबाबतीत मी त्यांना असे विचारले की," आपल्या पिकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तेव्हा पिकाचा विमा का काढला नाही ?" तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, "एका एकरसाठी दहा हजार रुपये विम्याचा हप्ता भरावा लागतो. त्याचप्रमाणें विमा काढल्यानंतर पिकाचे जर नुकसान झाले तर नुकसान भरपाई मिळेल याची शाश्वती नाही " .हे पैसे न मिळण्याची कारणे अशी आहेत की,बागेला आग लागली तर पैसे

मिळतील. परंतु द्राक्षाच्या बागेचा आणि आगीचा काही सबंध नाही. परंतु विम्याचे पैसे मिळविण्यासाठी अशी अट टाकण्यात आलेली आहे की, आग लागल्यानंतर पैसे मिळतील, त्यानंतर दुसरी अट अशी टाकण्यात आलेली आहे की, सोसाटयाच्या वारा सुटून नुकसान झाले तर पैसे मिळतील. म्हणजेच यामध्ये अशी कल्पना आहे की, सोसाटयाचा वारा सुटून संपूर्ण बाग उन्मळून पडली तरच पैसे मिळतील. आग लागली किंवा संपूर्ण बाग उन्मळून पडली किंवा गारा पडल्या तर विम्याची मदत मिळेल. परंतु पाऊस पडून जर पिकाचे नुकसान झाले असेल तर काहीही मदत मिळत नाही. पाऊस पडल्यामुळेच द्राक्षाचे मणी खराब झाले व संपूर्ण बागेचे नुकसान झाले आहे.

.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ...

ज्या गोष्टी व्हायला पाहिजे होत्या त्या झाल्याच नाहीत. खरे तर द्राक्षाचा विमा काढल्यानंतर .. यांचे वर्ष जानेवारी ते जानेवारी असे असते आणि द्राक्षाची छाटणी ही एप्रिलमध्ये होते म्हणून एप्रिल ते एप्रिल असे वर्ष द्राक्षाच्या बाबतीत धरले गेले पाहिजे. परंतु तसे न होता जानेवारी ते जानेवारी असे वर्ष धरले गेले आहे. त्यामुळे आता परिस्थिती अशी झाली आहे की, 12 वर्षांपासून परकीय चलन मिळवून देणारे हे द्राक्षाचे पीक, एका अर्थाने देशाची अर्थव्यवस्था मजबूत करणारे हे पीक. त्यात दोन-दोन, अडीच-अडीच लाख रूपये भागभांडवल उभे करून हे पीक करावे लागते, इतके काही हे सोपे नाही. बाजारातून एक किलोची पिशवी आणली आणि पेरले व पीक आले इतके काही हे सोपे नाही. आले तर आले आणि गेले तर गेले असे नाही. कित्येकदा अशा अवकाळी पावसामुळे वा निसर्गाच्या कोपामुळे हातातील पीक तर जातेच पण त्यात एवढी मोठी गुंतवणूक जी करावी लागते. त्यासाठी 50-60 हजार रूपयांची नुसती औषध फवारणी करावी लागते. ती सारी गुंतवणूक देखील मातीमोल होते. म्हणजे हाती काहीच येत नाही. अशा वेळी ते पीक घेणाऱ्या शेतकऱ्याच्या घरातील अडचण काय असेल हे आपणच जाणून घ्या. म्हणून माझी या निमित्ताने एक विनंती आहे. या गोष्टीने गंभीरतेने पाहण्याची गरज आहे. आदरणीय मंत्री महोदय, डॉ.कदम साहेब तसेच श्री.थोरात साहेब, मी आपल्याला आणखी एक गंमत सांगतो. परवाच टीव्ही वर एक बातमी आली की, डाळींचे भाव 40 रूपये किलो झाले. मग केंद्रातील आमच्या अत्यंत कर्तव्यदक्ष सरकारने डाळीचे भाव 40 रूपये किलो झाले अशी बातमी टीव्हीवर आल्याबरोबर, म्हणजे ही बातमी रात्री 11 वाजता आली आणि रात्री 12 वाजता टीव्ही वर ब्रेकींग न्यूज म्हणून सांगण्यात आले की, आता एक वर्षभर डाळींवर निर्यातबंदी सरकारने घातली आहे. म्हणजे या वर्षी डाळीचे भाव वाढले हे लोकांना कळले तर लोकांनी, शेतकऱ्यांनी पुढील वर्षी अधिक प्रमाणात तूर पेरली असती, उडीद पेरले असते, मूग पेरले असते आणि आपल्या देशाला डाळींच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले असते आणि तुम्हाला भरपूर डाळ खायची सोय केली असती. इतकेच नाही तर परदेशातून डाळी आणूच द्यायची गरज ठेवली नसती. परंतु टीव्हीवर डाळीचे भाव वाढल्याची बातमी आली आणि लगेच केंद्रातील आमच्या कर्तव्यदक्ष सरकारने साऱ्याची माती करू टाकली. दुर्दैव एका गोष्टीचे आहे की, आम्हाला शेती खूप कळते असे सांगितले जात असताना ... मला माफ करा,

.......3जे 2 .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

मला कोणावर आरोप करावयाचे नाहीत पण आता पाम तेल, सोया तेल डायरेक्ट परदेशातून आपल्याकडे येणार आणि त्याला कोणीही अडविणार नाही. सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मला कमाल वाटली की, एवढे केंद्रातील कार्यक्षम सरकार कसे काय झाले ? इकडे लोक मरू लागले आहेत त्यावर कोणी काही बोलायला तयार नाहीत, मात्र ज्याची कोणी चर्चा केली नाही, जे कोणी मागितले देखील नाही ते कसे काय सरकार देऊ लागले. म्हणजे परदेशातून येणारे खाद्यतेल, जे रिफाईंड केलेले आहे त्याला 7.5 टक्के आयात कर आहे आणि जे कच्चे तेल आहे ते मात्र मोकळेच ठेवले गेले. ही कमालच झाली. आता हे कच्चे तेलच का आणायचे ? तर येथे जे मोठ मोठे प्लँटचे कारखानदार आहेत त्यांच्या प्लँटला काही काम तर मिळाले पाहिजे ना ? म्हणून त्यांच्यासाठी हे, आणि ह्यांच्यासाठी ते. सभापती महोदय, मी आपल्याला सांगतो की, आपण एक गोष्ट लक्षात ठेवा की, काल रात्री 11 वाजता डाळींचे भाव वाढले म्हणून घोषणा झाली आणि लगेच डाळ निर्यातीवर बंदी आणली गेली. त्या संदर्भात सकाळीच मला एका व्यापाऱ्याचा फोन आला. सभापती महोदय, विदर्भामध्ये आता कापसाची जागा सोयाबीनने घेतली आहे. अटलबिहारी बाजपेयीच्या सरकार असताना 75 टक्के आयात कर केल्या मुळे 2001 मध्ये 700 रूपये असलेले सोयाबीन 2004 मध्ये 2100 रूपये झाले होते. तेच सोयाबीन आता तुमच्यामुळे पार 1100 रूपयावर गेले होते. पण या वर्षी आता त्याचा 2400 रूपये भाव झाला होता. आता यामुळे सोयाबीन शेतकऱ्याला हात देईल असे वाटले होते पण आता लगेच सरकारने खाद्यतेलावरील आयात कर पूर्णच्या पूर्ण काढून टाकला. सभापती महोदय, माझ्या लातूर सारख्या शहरात याचा परिणाम किती झाला याची आपल्याला कल्पना आहे का ? याचा परिणाम म्हणून सोयाबीनला क्विंटलला 400 रूपये कमी झाले. आता सीझनला 800 रूपये क्विंटलमागे कमी होणार आहेत. ज्या गोष्टीसाठी घसा खरवडून, ओरडून ओरडून देखील आता शेतकऱ्याला काय मिळेल याची मला माहिती नाही पण आता आम्ही काही मागितले की, सरकारकडून सांगितले जाईल की, आम्ही याचा सर्व्हे करतो. मग सर्व्हे होईल पाहणी करतील आणि मग आता आमच्या मित्रांनी म्हटल्याप्रमाणे 300 रूपये भरपाई मिळेल आणि त्यासाठी 500 रूपयाचे बँकेत खाते उघडावे लागेल. हे सारे `नाटक होईल. परंतु ज्या गोष्टीत कोणी हस्तक्षेप केला नाही ते तर तुम्ही

...... 3जे 3 .....



KBS/ KTG/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 17:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

मारूनच टाकले. भाताच्या बाबतीत तर सरकारने काय कमाल केली आहे पहा. भातावरील निर्यातबंदी केली ती पण कशी ? तर केवळ बासमती तांदूळाची निर्यात करता येईल आणि बाकीच्या तांदूळावर मात्र निर्यातबंदी. डाळीवर देखील अशीच निर्यातबंदी. तेलाचेही असेच. महागाई वाढली, महागाई वाढली म्हटल्यावर कधी नव्हे ते शेतकऱ्याला दोन पैसे मिळणार होते पण त्या शेतकऱ्याच्या नरडीचा घोट घेण्याचे पाप या सरकारने केलेले आहे. महागाई ही केवळ डाळी आणि तेलाचीच वाढली का ? डिझेलमध्ये वोढली, पेट्रोलमध्ये वाढली, सहावा वेतन आयोग आला आणि 40 टक्के महागाई वाढली. त्याला काहीही नाही. ते कोणीही बघत नाही. पण केवळ उठले की सुटले ते गरीब माणसावर आले. जो गावातील गरीब माणूस आहे त्याची महागाई वाढली म्हणून त्याच्यावर जर तुम्ही अन्याय करणार असाल तर ती अत्यंत वाईट गोष्ट आहे. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

माझी विनंती अशी आहे की, आता जे नुकसान झाले आहे त्याबाबत बऱ्याच माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावर कायमस्वरुपी सोल्यूशन काढले पाहिजे. विम्याची पध्दत आपण बदलली पाहिजे. हे कुणाच्या हातामध्ये आहे? हे मला माहीत नाही. वरुन निसर्गाचा कोप झाल्यानंतर आणि आमचे पिक गेल्यानंतर आम्ही तुमच्याकडे भीक मागत फिरावयाचे. "थूक चाटण्याने भूक जात नाही". खरे तर ही गोष्ट आलीच नसती. दर वर्षी कांद्याच्या भावासाठी बोंबलावे लागते. जागतिक बाजारपेठेमध्ये कांद्याची निर्यात कायम चालू राहिली असती तर जगात आपल्या कांद्याची एक चांगली बाजारपेठ तयार झाली असती. याठिकाणी कमी पडो किंवा जास्त पडो आपल्याला कांदा हा मिळणारच आहे. आणि आपले दुकान चालू राहिले असते. आपण स्वार्थी माणसे आहोत. आपले असे आहे की, या देशात कुणी खात नाही म्हटले की, निर्यात करावयाचे. अशाप्रकारचे आपले धोरण आहे.

सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची गोष्ट आहे. आज शेतकरी वैतागला आहे. याचे कारण असे की, चार वर्षामधून एक वर्षाचे त्याचे पिक हातचे जातेच. कधी अतिवृष्टी होऊन कधी पाऊस कमी पडल्यामुळे तर कधी पिकावर रोग पडल्यामुळे वाया जाते. अशाप्रकारे काही ना काही कारणांनी चार वर्षातील एक वर्षाचे पिक वाया जाते. हे गृहीत घरुन गेल्या 60 वर्षामध्ये एका वर्षात गेलेले पिकाचे नुकसान गेल्या तीन वर्षामध्ये राहिलेल्या पिकावर लादले गेले असते तर शेतकरी कमजोर झालाच नसता. आणि थोडया थोडया कारणांनी आत्महत्त्या केल्याच नसत्या.

सभापती महोदय, म्हणून मी आपणामार्फत शासनाला विनंती करतो की, नैसर्गिक परिस्थिती अस्थिर झालेली आहे. कधी पाऊस जास्त पडेल, कधी गारा पडतील, कधी दुष्काळ पडेल याबाबत कुणीही अंदाज वर्तविणार नाही. या सर्व गोष्टी अन्‌बॅलन्स झालेल्या आहेत. यांना पर्याय नाही. म्हणून याठिकाणी ही पिक विम्याची जी पध्दत आहे, ती बदलली पाहिजे. ती बदलण्याकरिता मला शासनाच्या माध्यमातून काही सूचना करावयाच्या आहेत की, आपण एकरी 3 हजार रुपये विमा काढा. दुसरे असे की, द्राक्ष पिकांचे नुकसान थंडीमुळे होते. त्यामुळे नुकसान भरपाई देतांना आपण निकषामध्ये थंडीची अट घालावी. तसेच, अवेळी पडलेल्या पावसाची अट घालावी. आज आपल्याकडे जर पिकाचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले तरच विम्याची भरपाई मिळेल. असे करण्यापेक्षा 20 टक्क्यापेक्षा जास्त पिकाचे नुकसान झाले तरच विम्याची भरपाई मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. पाशा पटेल...

अशाप्रकारचे निकष आपण लावले तर शेतकरी वाचणार आहे, अन्यथा वाचणार नाही. नाही तर दरवर्षी मार्च महिन्यामध्ये अर्थसंकल्पिय अधिवेशन आले की, अवेळी पडलेल्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीबाबत चर्चा करणे, आणि पावसाळी अधिवेशन आले की, जास्त पाऊस पडल्यामुळे झालेले शेतीचे नुकसान याबाबतची चर्चा करणे. या चर्चा आपल्याला कायम स्वरुपी बंद करावयाच्या असतील तर आपल्याला कायम स्वरुपी एक नियोजन करण्याची आवश्यकता आहे. ते नियोजन आपल्या माध्यमातून व्हावे अशी माझी इच्छा आहे. या विषयावर विरोधी पक्षाकडून मते मांडण्यापूर्वी सत्ताधारी पक्षाकडून चांगली मते मांडण्यात आली याबद्दल मला खूप बरे वाटले. विरोधी पक्षाचे माननीय सदस्य बोलण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे सदस्य बोलावयास लागले. त्यांच्या भाषणांना आपण सुध्दा टाळया वाजवू लागलात. आपण जर लोकांच्या हिताचे बोलला असता तर रात्री 11 वाजता टी.व्ही. वर ब्रेकींग न्यूज आलीच नसती. आपण कोण आहात ते रात्रीच्या ब्रेकींग न्यूजमध्ये आम्हाला समजले. माननीय सहकार मंत्र्यांना माझी विनंती आहे की, दामदुप्पटीच्या कायध्यातील कलम 44 अ प्रमाणे आपण लोकांना कर्जाची वसूली करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आपण आपल्या अधिकाऱ्यांच्या हातात कापर कापायला सूरी करण्यास परवानगी दिली आहे. म्हणजे "बोक्याचे कर्ज साराया मडक्याचे बळी देण्याचे पाप झाले आहे". आपण जर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या बाजूचे असाल तर यामधून काहीतरी मार्ग काढा. परवा आपण वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारला आहे. त्या संदर्भात सहकार मंत्री या नात्याने या विषयाकडे आपण गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे. आणि या समस्येमधून परमनंट सोल्यूशन काढावे अशी पुन्हा एकदा विनंती करुन आणि सत्ताधारी बाजूकडून हा ठराव मांडण्यात आल्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मैं सिर्फ 2 मिनट का समय लूँगा. हमारे माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी एवं अन्य माननीय सदस्य नियम 260 के अन्तर्गत जो प्रस्ताव लाए हैं, मैं उसका समर्थन करता हूँ. बेमौसम बारिश की वजह से महाराष्ट्र के अलग अलग क्षेत्रों में, अलग अलग विभागों में जो नुकसान हुआ है, उसका जायजा हमारे बाकी साथियों ने पेश किया है. मैं ज्यादा समय नहीं लूँगा. मैं माननीय मंत्री महोदय से अनुरोध करुंगा कि जब किसानों को तकलीफ होती है, उनकी फसल नष्ट हो जाती है, उनका नुकसान होता है, उनके घर गिर जाते हैं, घर के सदस्यों की मृत्यु हो जाती है तो उनको सहायता करने की दृष्टि से डिजास्टर मेनेजमेंट की मशीनरी परमानेंटली एक्टिव होनी चाहिए. नैसर्गिक आपत्ति के समय फसल का नुकसान होता है, विशेष रुप से जो गरीब किसान है, जो पिछड़े हुए क्षेत्रों में रहते हैं, ऐसे लोगों की सहायता करने के लिए परमानेंट मशीनरी क्रिएट होनी चाहिए. आजकल हम आई.टी. के युग में हैं. तालुका स्तर से, पटवारी के स्तर से सरकार तक तुरन्त जानकारी आ सकती है. आज आवश्यकता इस बात की है कि नैसर्गिक आपत्ति की वजह से जो तकलीफ होती है, उसको दूर करने के लिए जल्दी से राहत पहुँचानी चाहिए. आप सर्वे करेंगे, स्टडी करेंगे, वह बाद की बात है. लेकिन उसको तुरन्त राहत मिलनी चाहिए, इस प्रकार के आदेश शासन की तरफ से कलक्टर को दिए जाने चाहिए.

सभापति महोदय, हमें कभी कभी इस बात से बहुत दुख होता है कि जिले के पालक मंत्री या संपर्क मंत्री अपने क्षेत्र में जाना भी गवारा नहीं करते हैं. विदर्भ में जहां पर आत्महत्याएं अधिक होती हैं, वहां पर विशेष रुप से ऐसे प्रश्नों से निपटने के लिए सरकार की मशीनरी ज्यादा सेंसिटिव और प्रभावी होनी चाहिए. प्रधान मंत्री पेकेज और मुख्य मंत्री पेकेज के द्वारा किसानों के कर्ज माफी की बात हुई है, योजना बनी है, लेकिन अभी नीचे तक आनी बाकी है. विदर्भ में किसानों की आत्महत्या की टेंडेंसी को ध्यान में रखते हुए उनको अविलंब राहत पहुँचानी चाहिए और इस बात की घोषणा सरकार को अविलंब करनी चाहिए. इतना कहते हुए मैं इस प्रस्ताव का समर्थन करता हूँ और अपनी बात समाप्त करता हूँ.

-----------

. . . 3L 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यामध्ये अवेळ पडलेला पाऊस आणि त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान यासंबंधात जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये आंबा, काजू, रातांबा, फणस इ.उत्पादन होत असते. परंतु अवेळी पाऊस पडल्यामुळे या पिकांचे नुकसान झालेले आहे. अशा वेळी आंब्याच्या बरोबरच या बाकीच्या पिकांच्या बाबतीत देखील नुकसान भरपाई देण्याची गरज आहे. कारण तेथे या पिकांवर आधारित छोटे-छोटे उद्योगधंदे करणारे अनेक शेतकरी आहेत. उदाहरण द्यावयाचे तर रातांब्या पासून कोकम, कोकमाचे सरबत केले जाते. काजू बी पासून काजू रस तयार केला जातो. या सर्व बाबी विचारात घेऊन आंब्याबरोबरच इतर पिकांचे जे नुकसान झालेले आहे, त्यासाठी देखील नुकसान भरपाई देण्याची गरज आहे. गेल्या वेळेला आंब्याच्या पिकाचे नुकसान झाले होते, त्यावेळी 15 हजार रुपये मदत देण्याच्या बाबतीत घोषणा केली होती. परंतु उत्पादन क्षमतेचा निकष लावून 9 हजार रुपयेच देण्यात आले. खरे म्हणजे आता आंब्याच्या पिकाचे जे नुकसान झाले आहे, त्यासाठी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई दिली पाहिजे. कारण या पिकावर औषधांची फवारणी केली होती. परंतु पावसामुळे सर्व औषधे वाहून गेली आहेत, मोहोर गळून पडलेला आहे. त्यामुळे यावेळी आंब्याचे उत्पादन कमी प्रमाणात येणार आहे. म्हणून माझी अशी सूचना आहे की, इतर कोणत्याही प्रकारचे निकष न लावता, अन्य पिकांना ज्याप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते, त्या प्रमाणेच दिली पाहिजे. तसेच कोकणामध्ये कुंभार समाजामार्फत मोठया प्रमाणात वीटभट्टीचा व्यवसाय केला जातो. एका बाजूने शासनाने मातीवर असलेली रॉयल्टी रद्द केलेली आहे. अशा वेळी वीटभट्टीचे जे नुकसान झालेले आहे, त्याची मोजणी करीत असताना, त्यांना नुकसान भरपाई देत असताना काळजीपूर्वक पाहणी करावयास पाहिजे. कारण शासनाने मातीची रॉयल्टी रद्द केलेली असल्याने एकंदर किती नुकसान झाले आहे ? संबंधितांना किती नुकसान भरपाई द्यावयास पाहिजे? याबाबतीत योग्य प्रकारे तपासणी करुन निकष ठरविण्याची गरज आहे. जेणेकरुन कुंभार समाजाला दिलासा मिळेल. कोकणामध्ये पावसाळयापूर्वी वीटभट्टया तयार केल्या जातात आणि त्या व्यवसायाच्या माध्यमातून मिळालेल्या पैशातून ते उपजिविका करीत असतात. परंतु अवेळी झालेल्या पावसामुळे वीटभट्टयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्या लोकांना मोठया प्रमाणात भरीव मदत देण्याची गरज आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

श्री. परशुराम उपरकर.......

अवेळी पाऊस पडण्याची अनेक कारणे आहेत. वन क्षेत्रातील झाडांची मोठया प्रमाणात वृक्ष तोड होत आहे. वृक्षतोडीवर आळा न घातल्यामुळे व यावर लक्ष न केंद्रीत केल्यामुळे, आज अवेळी पाऊस पडत आहे. यामुळे पर्यावरणाचा असंतुलन होत आहे. त्यामुळे, शासनाने बेकायदा वृक्षतोड बंद करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक ओह. सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये वन संहितेची साधारण 42 हेक्टर जमीन आहे. ही जमीन पुष्कळ आहे, ती काही कमी नाही. ही जमीन वन संहितेची असल्यामुळे या जमिनीवर कायद्याप्रमाणे तेथे काही लागवड करता येत नाही किंवा कोणतेही काम करता येत नाही. या संबंधी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनेक वेळा लक्षवेधी सूचना सभागृहात मांडलेली आहे. 42 हेक्टटपैकी काही जमीन वजा करुन ही जमीन 18 हेक्टर करण्याचे शासनाने या पूर्वी कबूल केले होते. तसेच मुख्य सचिवांमार्फत यासंदर्भात दोन महिन्यामध्ये प्रतिज्ञापत्र देण्याचे देखील मंजूर केले होते. परंतु बराच कालावधी होऊन देखील अजूनही प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले नाही. मला असे कळाले आहे की, शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी काही चुका केलेल्या आहेत व त्या चुकांवर पांघरुण घालण्याकरिता प्रतिज्ञापत्र सादर करण्यास विलंब केला जात आहे. त्यामुळे सिंधुदूर्ग जिल्हयामधील 42 हेक्टर जमिनीपैकी काही जमीन शासनाने रिलीज करावी तसेच माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या कबुलीप्रमाणे या संबंधी लवकरात लवकर निर्णय शासनाने घ्यावा अशी मी या ठिकाणी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

...................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये शेतकऱ्यांची अतिशय हालाखीची परिस्थिती आहे. या शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्य हे निसर्गावर व शासनाच्या धोरणावर अवलंबून असते. नाशिक जिल्हयामध्ये द्राक्ष व कांदा या पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असते. निफाड तालुक्यातील शिंगणे येथे वादळामुळे संपूर्ण मळा जमीनदोस्त झालेला आहे. आता या नुकसानीचे पंचनामे होऊन त्या शेतकऱ्याला किती नुकसान भरपाई केव्ही व किती मिळणार ही शंकाच आहे.सन 2006 साली राज्यामध्ये गारासह पाऊस पडला होता. त्या वेळी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय आता शासनाने घेतलेला आहे. परंतु या घटनेस आता दोन वर्षे होऊन देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई प्राप्त झालेली नाही. त्या दृष्टीने देखील शासनाने कार्यवाही करावी अशी माझी शासनास विनंती आहे. माननीय पुनर्वसन मंत्री महोदय श्री. पतंगराव कदम, माननीय फलोत्पादन मंत्री श्री. विनय कोरे व माननीय कृषि मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे अतिशय संवेदनशील मंत्री आहेत. सामान्य जनतेचे प्रश्न कसे दूर होऊ शकतील व जास्तीत जास्त लोकांना मदत कशी देता येईल हाच त्यांच्या कामकाजाचा हेतू असतो. आता सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात उपस्थित नाहीत. प्रत्येक पिकाला ग्रँट देण्याचे काम त्यांच्या विभागाकडून केले जाते असे दिसत आहे. ही कायमस्वरुपी उपाययोजना होऊ शकत नाही. त्यामुळे विम्याची पॉलिसी चांगल्याप्रमाणे व्हावी हे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी कर्ज घेतल्यानंतर प्रत्येक वेळी कर्जमाफीची त्याने मागणी करायची हे काही बरोबर नाही . त्यामुळे या संदर्भात स्टँडर्ड नॉर्म्स आपण तयार केले पाहिजेत. डिझॅस्टर मॅनेजमेंट विभाग व त्या विभागाचे मंत्री यांच्याकडे ही मागणी नेहमीच केली जाते. गारपीट, पूर, वादळीवारा, पाऊस यामुळे नुकसान होणाऱ्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देता यावी याकरिता या प्रस्तावाला मी पाठिंबा देत आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान अधिक चांगल्या प्रकारचे कसे होईल याकरिता याची आपणा सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे ही या निमित्ताने मागणी करतो. धन्यावाद.

--------------

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या प्रस्तावावर थोडक्यात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. कदाचित सत्तारुढ पक्षाला असे वाटले असेल की, आपले काही तरी चुकत आहे त्यामुळेच कदाचित हा प्रस्ताव आला असावा अशी माझी धारणा आहे. आंब्याच्या संदर्भात या सभागृहामध्ये आम्ही कोकणातील एकंदर 14 सन्माननीय सदस्यांनी कंठशोष केला होता. त्यावेळी सभागृहाचे कामकाज बंद पाडले होते. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे मोठमोठ्याने बोलले होते. तरी देखील या सरकारवर कोणताही परिणाम झाला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आता कोकणातील आमदारांची संख्या वाढली आहे तरी देखील सरकार आंब्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यास तयार नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. कोरे साहेब यांना विचारु इच्छितो की, माननीय उपसभापतींच्या दालनात बैठक घेण्याचे ठरले होते त्याबाबत काय झाले ? आठ दहा दिवस झाले तरी ती बैठक होत नाही. आपण अधिवेशन असेच रेटून नेणार आणि आंब्याला नुकसान भरपाई देणार नाही हे निर्विवाद सत्य आहे असे आम्ही मानावयाचे काय ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तर मिळेल अशी मी अपेक्षा करतो. हेक्टरी मदत देण्यापेक्षा झाडामागे नुकसान भरपाई द्यावी. लमसम आणि एकरकमी नुकसान भरपाई द्यावी. नाही तर माननीय मंत्रिमहोदय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे जुनाच विषय काढतील की, 7/12 वर किती नावे आहेत आणि त्याची फोड कशी करावयाची, ॲफिडेव्हिट करावयाचे किंवा काय ? हे सर्व करण्यापेक्षा एकत्रित नुकसान भरपाई द्यावी. आंब्याबरोबरच काजूचेही नुकसान झालेले आहे. रातांब्याचे नुकसान झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी त्याबाबत सांगितले. रातांबा हे दुर्लक्षित पीक आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर रातांबा होतो. रातांब्यापासून कोकम आणि कोकमापासून कोकम सरबत तयार होते आणि त्याला परदेशात मागणी आहे. याकडे देखील राज्य शासनाने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आंब्याला जपानमध्ये भाव होता. त्या ठिकाणी आंब्याला प्रचंडमागणी आहे परंतु त्या ठिकाणी आंबा पाठवू शकलो नाही तर त्यामुळे कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन जाणार आहे. याचाही शासनाने विचार करावा.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, कोकणाची कशी उपेक्षा केली जाते याबाबत मी वाचून दाखवतो. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत कोकण व तापी खोरे विकास मंडळाचा निधी अन्यत्र वळविल्याबाबतचा प्रश्न अनुक्रमांक 48 वर आहे. कोकणाचा 334 कोटी रुपयांचा निधी या शासनाने हडप केला आणि कोकणाला फक्त 61 कोटी रुपये दिले. हा अन्याय नाही का ? यामध्ये असे उत्तर दिले आहे की, "सन 2004-05 व 2005-06 मध्ये तरतुदीच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाचा विचार करता कोकण विभागातून केलेली अतिरिक्त कपात पुनर्स्थापित करण्यात आली आहे. त्यानुसार रु. 61 कोटी इतका निधी कोकण विभागास उपलब्ध करण्यात आला आहे." त्यानंतर अनुक्रमांक 49 वर भातशेतीच्या व घरांच्या झालेल्या नुकसानीबाबतचा प्रश्न आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गतवर्षी भातपिकाचे जे नुकसान झाले त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. माहे जून, 2007 मध्ये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले होते परंतु आजतागायत भातशेतीच्या नुकसानीचे पैसे दिलेले नाहीत. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये आपण "शेतकऱ्यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे" असे उत्तर दिलेले आहे.जून 2007 नंतर आता 2008 साल आलेले आहे. दुसरा पावसाळा जवळ आला तरी शासनाचे वाटप चालूच आहे. कोकणच्या बाबतीत हे सरकार कोणत्याही प्रश्नावर गंभीर नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, मी आणखी एक प्रश्न वाचून दाखवतो. आजच्याच प्रश्नोत्तराच्या यादीत अनुक्रमांक 42 वर देवगडच्या संदर्भात एक प्रश्न आहे. आम्ही प्रश्नोत्तराची यादी पूर्ण वाचत असतो आणि शासनाने काय उत्तरे दिलेली आहेत ते पाहात असतो. देवगड (जि. सिंधुदुर्ग) येथील शेतकऱ्यांना अनुदानावर कंपन्यांकडून पुरविण्यात आलेली भातबियाणे तसेच अवजारे निकृष्ट दर्जाची निघाली असून आंबा बागायतींचे नुकसान झालेल्या बागायतदारांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक सभापतींनी शासनाकडे दिनांक 4 डिसेंबर, 2007 रोजी केली होती त्यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, भात बियाणाचा निकृष्ट दर्जाचा पुरवठा झालेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

त्याच्याच खाली असे उत्तर दिले आहे की, अवजारांमध्ये एचटीपी पॉवर स्प्रे पंप, ग्रासकटर, फूट स्प्रे पंप, पॉवर लिटर, 30 भात मळणी यंत्रे अनुदानावर पुरविण्यात आली. यापैकी 10 भात मळणी यंत्रे खराब झालेली आहेत. आंब्याच्या नुकसानीचे वितरण करण्यासाठी 9.45 कोटी रुपये प्राप्त झाले असून त्यापैकी 187.70 लाख रुपये वितरित केले आहेत. त्यापैकी देवगड तालुक्यासाठी 3 कोटी रुपये वितरित झाले असून प्रत्यक्षात 1.12 कोटी रुपयांचे वितरण झाले आहे, याबाबतची कारणे सांगणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, वीट भट्टी व्यवसायिक आज संकटात आहेत. त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. कारण त्यांनी सरकारला रॉयल्टी दिलेली आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयाला कालच्या पावसाचा प्रचंड तडाखा बसला आहे. भाटकर वाडा या परिसरामध्ये चक्री वादळाचा तडाखा बसल्यामुळे नौका, शौचालये आणि घरांचे नुकसान झालेले आहे. ज्यांना चक्री वादळाचा तडाखा बसला आहे त्यांना शासन वेगळी मदत देणार आहे काय हा प्रामुख्याने प्रश्न आहे. या पावसामुळे 2 गाई, 2 बैल, 1 म्हैस अशी 5 जनावरे जागीच ठार झाली आहेत, चिपळूणमध्ये 1 मुलगा दगावला आहे. अशा नुकसानीची पूर्तता कशी करणार आहे ?

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी मी ग्लोबल वार्मिंगचा विषय काढला होता, त्या चर्चेला उत्तर देत असताना माननीय अर्थमंत्र्यांनी हा विषय राज्य सरकारचा नाही, केंद्र सरकारचा आहे असे म्हटले होते. परंतु हा सर्व ग्लोबल वार्मिंगचाच परिणाम आहे. परवा डी.एन.ए.मध्ये अहवाल आला आहे. त्यात असे म्हटले आहे की, मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया पाण्याखाली जाणार आहे. ते सर्व हवामानातील बदल आहेत आणि ग्लोबल वार्मिंगमुळे होत आहेत. त्यामुळे आताच जागे व्हावे. अन्यथा सन 2020 मध्ये मुंबई बुडेल त्याच्याबरोबर कोकणही बुडणार आहे. कारण कोकणातील सर्व गावे समुद्र किना-यावर आहेत. यासंबंधी लक्ष ठेवून एक समिती गठित करुन शांत डोके ठेवून, विचारवंताची बैठक घेऊन यावर अभ्यास करावा, विचार करावा अशी विनंती करतो आणि या प्रस्तावावरील माझे विचार येथेच पूर्ण करतो. धन्यवाद.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.विनय कोरे (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान व त्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही या अनुषंगाने नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला आणला आहे. या सभागृहाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेऊन या अवकाळी पावसामुळे शेतक-यांसमोर निर्माण झालेली परिस्थिती, अनेक पिकांवर, फळांवर याचा झालेला परिणाम याबद्दल आपापली मते मांडून सभागृहाला अवगत केले आहे. ज्यावेळी पाऊस सुरु होता त्याच वेळी या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा सर्व्हे घ्यावा, तातडीने त्यासंबंधीचा अहवाल शासनाला सादर करावा अशा सूचना फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून, कृषी विभागाच्या माध्यमातून सर्व विभागीय अधिका-यांना दिल्या होत्या. प्राथमिक अंदाजानुसार संपूर्ण महाराष्ट्रात साधारणपणे 40,471 हेक्टर फळबागांचे नुकसान झालेले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

(श्री. विनय कोरे पुढे सुरु...)

31957 हेक्टर शेतपिकाचे नुकसान झाले अशा प्रकारची आकडेवारी विभागाकडून प्राप्त झालेली आहे. अजून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. ज्या ज्या वेळी अशा प्रकारचे नुकसान झाले त्या त्या वेळी महाराष्ट्राचे सरकार शेतक-यांना दिलासा देण्यामध्ये कधीही मागे पडलेले नाही. फळपिकाच्या बाबतीत प्रामुख्याने आंबा आणि द्राक्ष या दोन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. एका विषयाचा या सभागृहामध्ये उल्लेख झालेला नाही. तो म्हणजे द्राक्षा पासून जो बेदाणा तयार केला जातो त्या बेदाण्याचेही फार मोठे नुकसान या अवकाळी पावसामुळे झालेले आहे. म्हणून या तीनही पिकांच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारच्या मदत आणि पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून शेतक-याला दिलासा मिळेल अशी मदत मिळावी यासंबंधीचा अहवाल तातडीने मंत्रिमंडळापुढे आम्ही आणणार आहोत. माझे सहकारी मंत्री डॉ. पतंगराव कदम हे याबाबतीत अधिकृत घोषणा या सभागृहामध्ये करणार आहेत. या नुकसानीचा आढावा घेताना ज्याचा संबंध आम्ही लावत नव्हतो असे प्रश्न या सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चिकू असेल, नारळ असेल, मिरची असेल, सुपारी असेल, रसआंबा असेल, काजू असेल, अशा विविध प्रकारच्या फळपिकांचे नुकसान झालेले असून त्याचाही शासनाने विचार करावा अशा प्रकारची भूमिका सन्माननीय सदस्यांनी मांडली. अशा प्रकारच्या फळ पिकांना नुकसान देता येईल का ही बाब विचारात घेत आहोत. म्हणून अशा प्रकारचे फळपिक घेणा-या शेतक-यांच्या नोंदी आणि नुकसानीचे सर्वेक्षण करुन नुकसानीचा अहवाल मागविण्याच्या सूचना विभागाला देत आहोत. ही चर्चा या ठिकाणी होत असताना मागील काही मुद्यांची चर्चा देखील करण्यात आली. त्याही बाबतीत सभागृहामध्ये खुलासा होण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी सांगितले की, मागच्या वर्षाची नुकसान भरपाई अजून मिळालेली नाही. केवळ आंब्याच्या बाबतीत नुकसान भरपाई देत असताना 50 टक्के नुकसान भरपाईचा निकष लावला गेला. मला प्रामुख्याने हे सांगितले पाहिजे की, कोकणातील आंब्याला नुकसान भरपाई देत असताना आंबा हे एकमेव असे फळपिक असेल की ज्याला 50 टक्क्याचा निकष कधीही लावलेला नाही. सरसकट क्षेत्रावर नुकसान भरपाई देण्याचे ठरविले. कोकणातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

(श्री. विनय कोरे....)

शेतक-यांचे  अनेक प्रश्न आहेत ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. काही ठिकाणी वनसंज्ञा आहेत, 7/12वर अनेक शेतक-यांची नावे आहेत, त्यामुळे प्रत्यक्षात पैसे वाटताना  अनेक नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणून पैसे वाटपाच्या दृष्टीने ज्या ज्या अडचणी असतील त्या सोडविण्याच्या दृष्टीने दोन-तीन प्रकारचे सुधारित आदेश आपण काढलेले आहेत. 31.3.2008ची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्या माहिप्रमाणे ठाणे जिल्हयामध्ये 2.36 कोटी रु. वितरित करण्यात आले, त्यापैकी 1.57 कोटी रु.चे वाटप करण्यात आलेले आहे. रायगडमध्ये वितरित केलेल्या 4.90 कोटी रु. पैकी 4.51 कोटी रु.चे वाटप झालेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 17.20 कोटी रु. वितरित करण्यात आले त्यापैकी 114 कोटी रु.चे वाटप झालेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 9.23 कोटी रु. वितरित करण्यात आले, त्यापैकी 2.60 कोटीचे रु.चे वाटप करण्यात आलेले आहे. हे निधीचे वाटप करीत असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये काही प्रश्न असल्याचे या आकडेवारीवरुन दिसून येते. परवा केळीच्या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देत असताना, या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने काही धोरणात्मक बदल करावे लागतील आणि त्या दृष्टीने कोकणातील आंबा उत्पादक क्षेत्रातील सर्व विधानसभा आणि विधान परिषदेतील आमदारांची बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी घेतली जाईल अशा प्रकारचे आश्वासन मी दिलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे..

परंतु ही बैठकच मी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात घेण्याचे ठरविले आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयापर्यंत आंबा पिकाच्या अनुषंगाने आणखी दुस-या कोणत्या समस्या उपस्थित होतील याबाबतीत संपूर्णपणे आढावा घेतल्यानंतर त्यासंदर्भात सविस्तरपणे चर्चा करता येईल म्हणून अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात आमदारांची बैठक घेतली जाणार आहे. या ठिकाणी अजून काही प्रश्नांची चर्चा झाली. दापोली कृषि विद्यापीठात आंबा पिकाच्या बाबतीत आम्ही बैठक घेतली होती, त्यावेळी सगळया सदस्यांच्या समोर मी एक भावना मांडली होती. आंबा हे सेन्सेटीव्ह पीक आहे. आंबा पिकाची अनेक वर्षापूर्वी कोणी तरी झाडे लावली आहेत आणि ती झाडे आज आपल्याला उत्पादन देत आहेत. आपण नवीन आंबा पिकाची लागवड करीत आहोत. आज ग्लोबल वार्मीग असेल, वातावरणातील बदल असेल, त्यामुळे आंबा पिकासमोर दरवर्षी नवीन आव्हान उभे राहते आहे. यासंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्यादृष्टीने आंबा झाडास पुनर्जिवनाची नवीन योजना नॅशनल हॉल्टीकल्चरल मिशनच्या माध्यमातून राबविली जाते. त्या झाडांमधील रोग प्रतिकारात्मक शक्ती वाढविण्याच्या दृष्टीने आपण काही काम करु शकलो तर ते निश्चितपणे उपयोगाचे ठरेल. म्हणून तुम्ही 15 हजार रुपयांची मदत मागू नका. सदर 15 हजार रुपयांची रक्कम शेतक-यांचा सहभागाची रक्कम म्हणून आपण ग्राहय धरुन त्या योजनेत घेऊ. राहिलेले 50 टक्के पैसे आपण एन.एच.एम..मधून त्या ठिकाणी आणू. राहिलेले 20 हजार प्रत्यक्ष शेतक-यांनी करावयाचे काम आहे. असे हेक्टरी 50 हजार रुपयांचे पॅकेज आंबा पिकासाठी देऊ अशी भावना मी सर्व सदस्यांना पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने त्यावर एकमत होऊ शकले नाही. सर्व सदस्यांनी मागणी केली की, आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई म्हणून 15 हजार रुपये तात्काळ देण्यात यावे. त्यानंतर पॅकेजच्या अनुषंगाने तुम्ही विचार करा. शेतक-याचे 15 हजार रुपये त्यात येणार नसतील तर केंद्र सरकारकडे अशा प्रकारच्या पॅकेजचा प्रस्ताव सादर करण्यास अडचणी येतात. अशा अडचणींमुळे आपण केंद्र सरकारकडे पॅकेज संबंधीचा प्रस्ताव पाठवू शकलो नाही. आंबा पिकाच्या नुकसान भरपाईच्या संदर्भात बैठक घेणार आहोत, त्यावेळेला सर्व सन्माननीय सदस्यांनी माझ्या सूचनेचा गांभीर्याने विचार करावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे..

सभापती महोदय, खरे तर आजच्या प्रस्तावाचा वेगळा विषय असताना समुद्राच्या लाटांमधून वीज निर्मिती प्रकल्पाचे काय झाले यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला गेला. गुहागर तालुक्यातील भुदल या ठिकाणी पहिलाच एक धाडसी प्रयोग अपारंपारिक ऊर्जा विभाग त्या ठिकाणी करीत आहे. मला सांगितले पाहिजे की, या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. हा नवीन तंत्रज्ञानावर आधारित असलेला प्रकल्प आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी लागणारा प्रत्येक स्पेअर पार्ट नव्याने तयार करुन घ्यावा लागतो आहे. या प्रकल्पासाठी लागणारे रेडी मेटेरिअल बाजारात उपलब्ध नाही. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या कामास विलंब होत आहे ही वस्तुस्थिती आहे. येत्या एक महिन्याच्या आत त्या प्रकल्पाचे उद्‌घाटन करता येईल अशी आजची वस्तुस्थिती आहे. अमेरिका येथील एका कंपनीने आणि इझ्राईल येथील एका कंपनीने महाराष्ट्र सरकारकडे महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील समुद्राच्या लाटांपासून आणि समुद्राच्या खाली असलेल्या करंट पासून वीज निर्मिती करण्यासंबंधीचा करार महाराष्ट्र सरकारने आमच्याशी करावा अशा प्रस्ताव दिला आहे. हा विषय रुल्स ऑफ बिझ ीनेस प्रमाणे समुद्रात कोणतीही गोष्ट करावयाची असेल तर केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते. या कंपन्या बरोबर करार करण्यास मंजुरी द्यावी अशा प्रकारची शिफारस करुन केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. त्याही बाबतीत लवकरच आम्हाला काही तरी करता येईल अशी आशा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी तिसरा जट्रोफाचा विषय उपस्थित केला गेला. कोकणासाठी 100 टक्के अनुदानातून रो.ह.यो.हॉल्टीकल्चरमधून जट्रोफाला परवानगी देण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. कोकणात जट्रोफा यशस्वी होऊ शकतो यासाठी टिनो ऑईल नावाच्या उद्योजकाला 150 एकर जमिनीवर जट्रोफाची प्रायोगिक लागवड करावयास लावली आहे. ही लागवड यशस्वी झाल्याचे उदाहरण कोकणातील शेतक-यांसमोर ठेवण्याचा प्रयत्न या विभागाने केलेला आहे. त्याही दिशेने आम्ही पाऊले उचलीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या. कृषि विमा योजना अतिशय महत्वकांक्षी योजना आहे. परंतु काही लोकांना ती योजना पटली नाही. ऊस उत्पादक विभागातील लोकांनी सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन त्या योजनेस स्थगिती मिळविली.

यानंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे....

मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, आंब्यासारखे नगदी पैसा देणारे पीक असेल किंवा द्राक्षासारखे नगदी पैसा देणारे पीक असेल या पिकांचे जे नुकसान झाले आहे त्याबाबतीत पुन्हा एकदा चर्चा करुन नैसर्गिक आपत्तीमध्ये फार मोठे नुकसान झालेले आहे त्याबाबतीत निर्णय घेता येणे शक्य होईल. मी सांगू इच्छितो की, फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून कायम स्वरुपी उपाययोजना म्हणून फळबागांसाठी ही योजना लागू करण्याची शासन प्रयत्न करील. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भावना व्यक्त करताना 2006 मध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई मार्च 2008 मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर देण्यात आली असे सांगितले आणि ही वस्तुस्थिती खरी आहे. नुकसान भरपाई दोन प्रकारे देण्याचा प्रयत्न करतो. ज्यावेळी अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळी स्थायी आदेशाप्रमाणे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी अशा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्टॅडींग ऑर्डर्स आहेत. नुकसान भरपाई ही हेक्टरी 2500 रुपये इतकी मर्यादित असल्यामुळे बऱ्याच वेळी ही रक्कम सगळयांना मान्य नसते. म्हणून विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई मिळावी अशी सगळयांचीच अपेक्षा असते. म्हणून विशेष बाब म्हणून मदत करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जात असताना एखादी घटना घडते आणि मग विभागाला माहिती संकलित करण्यासाठी वेळ लागतो त्यामुळे हा उशीर झालेला आहे. पुढील काळात अशा प्रकारची वेळ येणार नाही याची काळजी शासन घेईल. महाराष्ट्र हे देशात उत्पादित होणाऱ्या फळांचे नेतृत्व करणो राज्य म्हणून राज्यातील फळउत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम त्याला शक्ती देण्याचे काम पुढील काळात या विभागामार्फत आणि सरकारमार्फत केले जाईल इतकीच भावना मी याठिकाणी व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-------

.....2

श्री. बाळासाहेब थोरात (कृषीमंत्री) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेताना चांगल्या पध्दतीने आपले विचार व्यक्त केलेले आहेत. गेल्या 2/3 वर्षांची परिस्थिती पाहिली तर यावर्षी राज्यामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारचे पीक आले होते. गव्हाचे पीक चांगले होते. अशी परिस्थिती असतानाच अवेळी पाऊस आल्यामुळे मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागले ही वस्तुस्थिती आहे. एकंदर 72428 हेक्टरचे नुकसान झालेले आहे असा प्राथमिक अंदाज आहे. अजून याबाबतची डिटेल माहिती शासनाकडे आलेली नाही. परंतु 72428 हेक्टरमध्ये फळबागा आणि इतर पीके यांचे नुकसान झालेले आहे. 50 टक्क्यांपेक्षा कमी आणि 50 टक्क्यांपेक्षा जास्त किती क्षेत्राचे नुकसान झाले आहे हे अजून समजू शकले नाही. 2005 सालापासून राज्यामध्ये ज्या वेगवेगळया घटना घडलेल्या आहेत त्यामध्ये वेळोवेळी शेतकऱ्यांना शासनाने मदत केलेली आहे. त्यामध्ये जे काही बाकी होते त्यांना मार्चमध्ये खास बाब म्हणून नुकसान भरपाई देण्याचा निर्णय झाला. अलिकडच्या काळामध्ये म्हणजे 2000 पासून 2008 पर्यंत विचार केला तर ग्लोबल वॉर्मिंगचा निश्चितपणाने परिणाम झालेला आहे. दुष्काळाच्या परिस्थितीचा विचार केला तर 2002,2003 आणि 2004 तसेच 2005 आणि 2006 मध्ये शाश्वत पाऊस पडतो अशा भागामध्ये देखील दुष्काळ पडला. विदर्भामध्ये जेथे दुष्काळाची परिस्थिती असते तेथै 2005 आणि 2006 मध्ये अतिवृष्टी झाली. गारपीट आणि वादळाचे प्रमाण देखील वाढलेले आहे हे मान्य करावे लागेल. पहिल्यापेक्षा म्हणजे 2000 सालानंतर 2008 मध्ये हे प्रमाण जास्त आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात चर्चा करीत असताना कशा पध्दतीने या परिस्थितीला सामोरे जाणार हा देखील विचार मांडला गेला आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.........

राष्ट्रीय पातळीवर हा विचार सुरु झालेला आहे. ग्लोबल वॉर्मिंगमधील शेती हा विषय घेऊन काही मंडळी काम करीत आहेत. परंतु राज्य पातळीवर सुध्दा बदलते वातावरण विचारात घेऊन महाराष्ट्रातील शेती कशी पुढे नेणार याबाबत उच्चस्तरीय समिती स्थापन करणार आहोत. ग्लोबल वॉर्मिंगचे होणारे परिणाम आणि आपली शेती यावर शासनाचे धोरण निश्चित करण्यासाठी ही समिती काम करणार आहे हे या निमित्ताने सांगू इच्छितो. आपण हा विचार स्वीकारला आहे, तो कसा असावा याबाबत विचारपूर्वक समिती स्थापन करुन त्या समितीचा जो अहवाल तयार होईल तो सर्वांना मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा केली तर ती वावगी ठरु नये. प्रत्येक वेळी शेतीचे नुकसान झाल्यानंतर सरकारकडे मदतीची अपेक्षा केली जाते. वास्तविक सरकारकडून नुकसानभरपाई दिली जात नाही, ती आर्थिक मदत असते. त्या आर्थिक मदतीतून शेतकऱ्याला फार मोठी मदत होते असा माझा दावा नाही. 1995 साली शासनाने शेतीसाठी 1 ते 2 हजार रुपये, फळपिकांसाठी 2.5 हजार रुपये 2 हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला होता. 2005 मध्ये जी अतिवृष्टी झाली त्यावेळी झालेल्या नुकसानीबाबत ही मदत कशी वाढवून देता येईल हा विचार करुन शासनाने हेक्टरी 1 हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेतला. कापूस पिकाबाबत हेक्टरी अनुक्रमे 5 हजार रुपये व आणि भात व इतर भूसार पिकासाठी 3.5 हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला. 2005 मध्ये 242 कोटी रुपये नुकसान भरपाई देण्यात आली. 2006 च्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत 485 कोटी रुपये मदत देण्यात आली. मदत कमी दिली असे नाही. परंतु शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना मदतीसाठी सरकारकडे येण्याची पाळी येता कामा नये ही मागणी योग्य आहे. विमा योजना 1985 पासून सुरु केल्यानंतर आतापर्यंतची वाटचाल पाहिली तर शाश्वत विमा योजना, ज्यामध्ये दोष नाही अशी योजना आणू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्रीय पातळीवर याची चर्चा झाली आहे. यातून मार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे. पीक विमा योजना स्वीकारण्यात आली, त्यामध्ये सर्कलनिहाय उंबरठा उत्पन्न काढले जाते. त्या उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न आले तर मदत मिळते ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये बारकाईने पाहण्याचा प्रयत्न केला जातो. व्यक्तिगत नुकसान असते त्याबाबत कशी मदत देता येईल यासंबंधी क्रॉप कटिंगचा अंदाज घ्यावयाचे ठरले तर त्या प्रयोगासाठी राज्यात 100 कोटी रुपये खर्च येईल अशी अपेक्षा आहे. राष्ट्रीय फळ पीक विमा योजना आहे त्या योजनेचे प्रिमीयम भरण्याचे धाडस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:20

श्री.बाळासाहेब थोरात.........

शेतकऱ्यांना होत नाही. या सगळयातून मार्ग काढला पाहिजे असे मला वाटते. राष्ट्रीय पातळीवर याची चर्चा चालू आहे. राज्यात देखील आपण चर्चा करीत आहोत. शेतकऱ्यांना सरकारकडे येण्याची पाळी येऊ नये, ज्यांचे नुकसान होईल त्यांना आधार असला पाहिजे अशी अपेक्षा केली तर ती वावगी ठरु नये.

सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सांगितले की, माहिती केंद्राद्वारे सर्वेक्षण होऊन वेबसाईटवर माहिती उपलब्ध करुन दिली पाहिजे. ज्यावेळी एखादी घटना घडते त्या घटनेचे सर्वेक्षण करण्यासाठी निश्चितपणे वेळ लातो. ती माहिती केंद्राकडून वेबसाईटवर लगेच उपलब्ध होणे असे अपेक्षित असले तरी माहिती केंद्राचा उपयोग कसा करता येईल ही कल्पना निश्चित विचारात घेण्याजोगी आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. ग्लोबल वॉर्मिंग व बदलते हवामान याचा पिकावर होणारा परिणाम आपल्याला जाणवत आहे. एखादी घटना घडल्यानंतर तेवढयापुरता विचार करुन चालणार नाही. नारळ पिकावर कोळी रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. कृषि विद्यापीठाकडून याबाबत सतत संशोधन सुरु आहे. कशा पध्दतीने हा रोग दूर करता येईल याचे प्रयत्न सुरु आहेत. केरळपासून संपूर्ण किनारपट्टीवर या रोगाने थैमान घातले आहे. हा रोग दूर करण्यासाठी आंतरप्रवाही औषध सोडण्याचा प्रयत्न केला. चिकूवर आलेल्या अळीमुळे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्यावर देखील संशोधन करीत आहोत. बदलत्या हवामानामुळे पिकांना नवनवीन रोगाची लागण होत आहे. त्यावर संशोधन करण्यासाठी कृषि विद्यापीठे निश्चितपणे प्रयत्नशील आहेत एवढीच ग्वाही देतो.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ......

शेतकऱ्यांचे नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे. त्यात मग अशा अवेळी पावसामुळे फळबागांचे गारपीट होऊन नुकसान झाल्यानंतर त्या कुटुंबाची काय परिस्थिती असते ते स्वत: जाऊन पाहणाऱ्याच्याच लक्षात येते. केळीसारखे पीक, छोटे शेतकरी असतात, ज्यांनी कर्ज काढलेले असते त्यांना आपण मदत करतो पण त्याला शाश्वत स्वरुपात भक्कम अशी मदत पीक विमा योजनेच्या माध्यमातूनच होऊ शकते, याबाबत शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील. ही धोरणात्मक बाब असल्यामुळे तसेच ज्येष्ठ मंत्री महोदय सभागृहात उपस्थित असल्यामुळे मी जास्त न बोलता कृषी विभागाच्या मुद्यांना थोडक्यात जी माहिती द्यावयाची होती ती देण्याचा प्रयत्न केला. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (पुनर्वसन मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य चंद्रकांत रघुवंशी व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये अत्यंत महत्वाचा प्रस्ताव सभागृहासमोर चर्चेसाठी आणला आहे, त्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, कपिल पाटील, भास्करजाधव, दिवाकर रावते, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. पाशा पटेल, सय्यद जामा आणि परशुराम उपरकर यांनी आपले विचार व्यक्त केले. त्या प्रस्तावावर माझे सहकारी व फलोत्पादन मंत्री श्री. विनय कोरे यांनी आपापल्या विषयाबाबत उत्तर दिलेले आहे. फलोत्पादनाच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण केले त्यासंबंधी स्वतंत्रपणे बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. त्यानंतर माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांनी कृषी विभागाच्या वतीने माहिती दिलेली आहे.

महोदय, मदत आणि पुनर्वसन विभागाचे काम म्हणजे एक प्रकारे को-ऑर्डिनेशनचे काम आहे. निरनिराळया विभागात जे घडते त्यासंबंधी मदत करणे हे शासनाचे कर्तव्य आहे, मेहेरबानी नाही. आपल्याला आठवत असेल की, महाराष्ट्रात ॲबनॉर्मल अतिवृष्टी दोन वर्षे झाली आणि महाराष्ट्र शासनाने अतिशय तडफेने त्यासंबंधीचे निर्णय घेतले आहेत. परंतु सरकारची मदत कधी शेवटपर्यंत पोहचत नाही आणि पोहचली तरी पैसा मिळत नाही अशा अनेक अडचणी असतात. याबाबतीत आम्ही निर्णय घेतला आहे. त्यासाठी माझ्याच अध्यक्षतेखाली कॅबिनेट सब कमिटी नेमली आणि महिन्याच्या दर मंगळवारला त्या समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत जे निर्णय घेतले त्यानुसार ताबडतोब जी.आर. काढण्यात आले आणि जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत डायरेक्टली पैसा पोहचविला. त्यात पहिल्या वर्षी 1150 कोटी आणि नंतरच्या वर्षी 1200 कोटी एवढा खर्च करण्यात आला व जास्तीत जास्त लोकांना सर्व प्रकारची मदत करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या म्हणण्यानुसार काही गोष्टी राहून गेल्या म्हणून पुन्हा 130 कोटी रुपये देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यानंतर केळी, आंब्याला कुठल्या प्रकारे मदत करावयाची असाही प्रश्न उपस्थित झाला. म्हणून त्या भागातील कृषी विद्यापीठांना सांगितले की, त्या भागातील परिस्थितीचा अभ्यास करुन माहिती घ्यावी. म्हणून यासंदर्भात आणखी माहिती देण्याची गरज नाही, कारण आवश्यक ते सर्व निर्णय शासनाने घेतलेले आहेत. आणि त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत की, या परिस्थितीचा ताबडतोब सर्व्हे करावा आणि कॅबिनेट सब कमिटीमध्ये त्यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्यानुसार विशेष बाब म्हणून जे आदेश होते ते फक्त दोन वर्षांसाठीच राबविले....यानंतर श्री. जुन्नरे .....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ...

या परिस्थितीमुळे शेतक-यांचे भयानक नुकसान झालेले आहे, द्राक्ष पिकांचे तसेच इतर पिकांचे देखील फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. नगदी पिकांवर मोठया प्रमाणात शेतक-याला खर्च करावा लागत असतो. नगदी पीक घेणा-या शेतक-यांचे अवकाळी पावसामुळे फार मोठया प्रमाणात नुकसान नुकसान झाल्यामुळे हा शेतकरी भरडून निघाला आहे. शासनाला भरडून निघणा-या शेतक-यांची चांगली जाणीव आहे. यासाठी शासन स्पेशल जी.आर. काढणार असून लवकरात लवकर स्पेशल सर्व्हे करुन कॅबिनेट समोर विषय घेऊन निश्चितपणे शेतक-यांना मदत दिली जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी वीटभट्टीच्या नुकसानीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. खरे म्हणजे शासन छोटया लोकांकडून रॉयल्टी घेत नाही. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी वीज का पडते, भुकंप का होतो? त्सुनामी का होते ?याची अगाऊ माहिती मिळण्याची आवश्यकता आहे अशी मागणी केलेली आहे. परंतु अमेरिकेसारख्या देशांना, प्रगत देशांना सुध्दा याचा शोध लागला नाही. कावळे, कुत्रे, जनावरे यांच्या ओरडण्याने आपण अंदाज बांधतो परंतु तो शास्त्रशुध्द नाही. रायगड जिल्हयामध्ये मागील काळात डोंगर हालत होते त्यासंदर्भात शास्त्रज्ञांना असे का होते याची विचारणा करण्यात आली होती परंतु ते सुध्दा यासंदर्भात माहिती देऊ शकले नाही. भारत सरकारच्या मिनीस्ट्री ऑफ सायन्स विभागाला यासंदर्भात अभ्यास करण्यास सांगण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी नॅशनल धोरणावर विचार मांडलेले आहेत. डाळी, गहू अशा विषयावर त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. आपण या ठिकाणी ज्या सूचना मांडलेल्या आहेत त्या संदर्भात केंद्रसरकारशी जरुर बोलण्यात येईल व आपल्या भावना कळविण्यात येतील. शेतक-यांचे नुकसान हा विषय तुमचा आमचा असून या राजकारण करण्याचा हा विषय नाही. शेतक-यांना मदत करणे हा आपला मुख्य विषय आहे. त्यामुळे शेतक-यांच्या नुकसान भरपाईच्या संदर्भात स्थायी आदेश काढले जातील. स्थायी आदेशाची अंमलबजावणी जिल्हाधिकारी त्वरीत करीत असतात. गेल्या दोन वर्षापूर्वी जसे स्पेशल आदेश काढण्यात आले होते तसे स्थायी आदेश काढण्यासाठी आपल्याला कॅबिनेट समोर जाऊन माननीय मुख्यमंत्र्यांची परवानगी घ्यावी लागेल. स्थायी आदेशासाठी सर्व्हे करण्यास सांगण्यात आले असून

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ...

सर्व्हे कृषी खात्याकडून केले जाणार असून सर्व्हे झाल्यानंतर कॅबिनेटच्या सब कमिटीसमोर हा विषय जाईल. कबिनेटच्या सब कमिटीचा मी अध्यक्ष आहे त्यामुळे यासंदर्भात स्पेशल जी.आर. काढून तो राबविला जाईल व शेतक-यांना आवश्यक ती मदत केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : शासन शेतक-यांना किती दिवसात मदत देणार आहे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सर्व्हे झाल्यानंतर हा रिपोर्ट ताबडतोब सब कमिटी समोर घेण्यात येईल. एक महिन्याच्या आत कॅबिनेटच्या सब कमिटीची बैठक घेण्यात येऊन त्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कृषी विभागाकडून सर्व्हे केला जाणार असून कृषी खात्यावर माननीय मंत्रीमहोदय अवलंबून आहेत ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

मंत्री महोदय वेळेवर बैठकीत येत नाहीत त्यामुळे तुम्हीसुध्दा निर्णय घेऊ शकत नाही. मंत्रिमंडळाच्या सब कमिटीच्या बैठकीला काही वेळा मंत्री हजर राहत नाहीत.

डॉ.पतंगराव कदम : अनेक मंत्री या सब कमिटीचे मेंबर आहेत त्यामुळे एखादे मंत्री जर बैठकीला आले नाहीत तर बैठकीचे कामकाज थांबत नाही. नुकसानीच्या संदर्भातील सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर निश्चितपणे एक महिन्याच्या आज सब कमिटीसमोर जाऊन निर्णय घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : विदर्भामध्ये लाल्या रोगामुळे झालेल्या नुकसानीसंबंधीचे पैसे जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन पाच ते सहा महिने पडून राहिले आहेत परंतु त्या पैशाचे वाटप झालेले नाही. ही आपल्या कामाची गतीशीलता आहे काय ? दोन कोटी चार कोटी रुपये जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन शेतक-यांना वाटले नाहीत . तेव्हा ही गतीशीलता अधिक वाढविएण्यात आली पाहिजे.

डॉ.पतंगराव कदम :सभापती महोदय, गेल्या दोन वर्षात अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांना जी मदत करावयाची आहे त्या संदर्भात इफेक्टीव्ह ॲडमिनिस्ट्रेशन करुन जे काम केलेले आहे त्याच पध्दतीने लाल्या रोगाचे पैसे जिल्हाधिकारी कार्यालयात का पडून राहिले होते त्या पैशाचे वाटप का केले नाही याची ताबडतोब चौकशी करुन त्यासबंधी निर्णय घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज आम्ही आनंदी आहोत. कारण मी या सदनात आल्यापासून 21 मिनिटे डॉ.पतंगराव कदम प्रथमच न थांबता बोलले आहेत त्यामुळे मी त्यांना प्रथम धन्यवाद देतो.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विधेयक केव्हा घेण्यात येणार आहे ?

**उपसभापती** : उद्या सकाळी बैठक घ्यावयाची काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाजाच्या संदर्भात मी अशी सूचना करतो की, विधेयकावर अजून चर्चा व्हावयाची आहे. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर या विधेयकावरील चर्चा सुरु करण्यात यावी तसेच लक्षवेधी आणि नियम 93 च्या सूचना विशेष बैठकीमध्ये घेण्यात याव्यात तसे करण्यात आले तर त्यांना न्याय मिळेल. विधेयकावर सविस्तर चर्चा नंतर घेण्यात यावी. विशेष बैठक जर घ्यावयाची असेल तर 10.00 वाजता बैठक घ्यावी लागेल आणि दीड तासामध्ये लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना घ्याव्या लागतील.

**उपसभापती** : ठीक आहे.

डॉ.दीपक सावंत : अर्धा तास चर्चा केव्हा घेण्यात येणार आहे ?

**उपसभापती** : उद्या घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्या बाबतीत मी माननीय सभापतीं बरोबर चर्चा करतो . त्यांच्याशी विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 2 एप्रिल 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 38 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 2 एप्रिल 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही